# प्रेषितांची कृत्ये

१ अहो थिओफिल, येशूने जे प्रेषित निवडले होते,
त्यांना पवित्र आत्म्याद्वारे त्याने आज्ञा दिल्यानंतर तो
जेव्हा वर घेतला गेला [२]त्या दिवसापर्यंत त्याने जे
करण्यास व शिकविण्यास प्रारंभ केला त्या सर्वांविषयी मी
पहिला ग्रंथ केला. [३]त्याने मरण सोसल्यानंतरही आपण
जिवंत आहो हे पुष्कळ प्रमाणांनी त्यांना दाखवले, आणि
चाळीस दिवस त्यांना दर्शने देऊन देवाच्या राज्याच्या
गोष्टी सांगितल्या. [४]आणि तो त्यांच्याबरोबर एकत्र असता
त्याने त्यांना आज्ञा दिली की,

"यरुशलेम सोडून जाऊ नका; पण तुम्ही माझ्याकडून
ज्याविषयी ऐकलं आहे त्या पित्याच्या वचनाची वाट
पहात रहा. [५]कारण योहान, खरोखर, पाण्यानं बाप्तिस्मा
करी, पण फार दिवस जाण्याअगोदर तुमचा बाप्तिस्मा
पवित्र आत्म्यानं केला जाईल."

[६]म्हणून ते एकत्र आले असता त्यांनी त्याला प्रश्न करून
म्हटले,

"प्रभू, ह्या काळात, तू इस्राएलाचं राज्य पुन्हा
प्रस्थापित करणार काय?"

[७]आणि तो त्यांना म्हणाला,

"पित्यानं जे काळ आणि समय आपल्या स्वतःच्या
सत्तेत ठेवलेत ते कळणं तुमच्यासाठी नाही. [८]पण पवित्र
आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य मिळेल;
आणि यरुशलेमात, सर्व यहुदियात, शोमरोनात आणि
पृथ्वीच्या शेवटच्या भागापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."

[९]आणि, त्याने ह्या गोष्टी सांगितल्यावर, ते पहात
असता, तो वर घेतला गेला व एका ढगाने त्याला त्यांच्या
दृष्टीआड केले. [१०]आणि त्यांनी, तो जात असता,
आकाशाकडे टक लावली, तेव्हा बघा, शुभ्र वस्त्रे परिधान
केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे होते. [११]आणि ते
म्हणाले,

"अहो गालीलकरांनो, तुम्ही असे आकाशाकडे टक
लावून उभे का राहिला? हा जो येशू तुमच्यामधून वर
आकाशात घेतला गेला, तो जसा आकाशात गेला हे तुम्ही
पाहिलंत तसाच तो येईल."

[१२]मग, ज्याला जैतुनांचा डोंगर म्हणतात त्या
डोंगरावरून ते यरुशलेमास परत आले. तो यरुशलेमपासून
शब्बाथ दिवसाच्या प्रवासाइतका दूर आहे. [१३]आणि ते
आत आल्यावर त्या माडीवरच्या खोलीत वर गेले; तेथे
पेत्र, याकोब, योहान, आणि अंद्रिया, फिलिप, थोमा,
बर्थलमय व मत्तय, आणि अल्फीचा याकोब, शिमोन
जिलोत व याकोबाचा यहुदा हे रहात होते. [१४]हे सर्व जण,
आणि त्यांच्याबरोबर आलेल्या स्त्रिया, येशूची आई मरिया
व त्याचे भाऊ, हे एकमनाने प्रार्थनेत ठाम राहिले.

[१५]तेव्हा त्या दिवसांत पेत्र बांधवांत (म्हणजे सुमारे
एकशे वीस जणांच्या जमलेल्या गटात) उभा राहिला व
त्यांना म्हणाला,

[१६]"अहो बंधूंनो, येशूला ज्यांनी धरून नेलं त्यांना
मार्गदर्शक होणाऱ्या यहुदाविषयी पवित्र आत्म्यानं
दाविदाच्या मुखावाटे, जे अगोदर सांगितलं आहे त्याचा
हा शास्त्रलेख पूर्ण होणं जरूर आहे. [१७]कारण त्याला
आपल्याबरोबर गणलं होतं आणि त्याला ह्या सेवेचा वाटा
दिलेला होता.
([१८]त्याने आपल्या अनीतीच्या वेतनाने एक शेत
मिळवले; तो तोंडावर पडला, त्याचे पोट फुटले आणि
त्याची सगळी आतडी बाहेर निघाली. [१९]आणि
यरुशलेमात राहणाऱ्या सर्वांना हे माहीत होऊन त्या
शेताला त्यांच्या भाषेत हकलदमा म्हणजे रक्ताचे शेत हे
नाव मिळाले आहे.)

[२०]"कारण स्तोत्रांच्या पुस्तकात लिहिलं आहे की,

'त्याचा वाडा ओसाड होवो,
त्यात कोणी न राहो,'

आणि

'त्याचे अधिकारपद दुसरा घेवो.'

[२१-२२]म्हणून जेव्हा प्रभू येशू आपल्यात येत जात होता,
त्या सर्व काळात, म्हणजे योहानाच्या बाप्तिस्म्यानं प्रारंभ
झाला तेव्हापासून तो आपल्यामधून घेतला गेला त्या
दिवसापर्यंत जे लोक आपल्याबरोबर राहिले त्यांच्यातला
एक जण आमच्याबरोबर त्याच्या पुनरुत्थानाचा साक्षी
होणं जरूर आहे."

२३तेव्हा त्यांनी युस्तस हे उपनाव असलेला योसेफ
ऊर्फ बर्सबा, आणि मत्थिया ह्या दोघांना पुढे आणले. २४-
२५तेव्हा त्यांनी प्रार्थना करून म्हटले,

"हे सर्वांची अंतःकरणे जाणणाऱ्या प्रभू, तू आम्हाला हे दाखव की, यहुदा आपल्या स्थानी जायला जिथून निघाला ते ह्या सेवेचे आणि अधिकारपदाचे स्थान घ्यायला तू ह्या दोघांतून कोणाला निवडलं आहेस?"

२६मग त्यांनी त्यांच्यासाठी चिठ्या टाकल्या व मत्थियावर
चिठी पडली; आणि त्याला अकरा प्रेषितांबरोबर गणण्यात
आले.

२ **मग पन्नासाव्या दिवसाचा सण** आला तेव्हा
ते सगळे एकमनाने एकत्र असता, २अकस्मात्
सुसाट्याचा वारा सुटल्यासारखा आकाशातून आवाज
आला; आणि त्याने ते जेथे बसले होते ते सर्व घर भरले.
३आणि त्यांना ज्वालेसारख्या वेगळ्या होत असलेल्या
जिभा दिसल्या; आणि ती त्यांच्यातील प्रत्येक जणावर
एक बसली. ४आणि ते सगळे पवित्र आत्म्याने भरले
जाऊन त्यांना आत्म्याने जशी वाचा दिली, तसे ते अन्य
भाषांत बोलू लागले.

५त्यावेळी, आकाशाखालच्या प्रत्येक राष्ट्रातील
यहुदी, भक्तिमान लोक, यरुशलेमात रहात होते, ६आणि
हा आवाज झाला तेव्हा लोक एकत्र जमले आणि गोंधळून
गेले, कारण प्रत्येकाने ज्याच्या त्याच्या स्वतःच्या भाषेत
त्यांना बोलताना ऐकले.

७तेव्हा सर्व चकित झाले व त्यांनी आश्चर्य करीत
म्हटले,

"बघा, हे सगळे बोलणारे गालिली आहेत ना? ८मग
आपण जन्मलो तिथल्या आपल्या स्वतःच्या भाषेत
आपण, प्रत्येक जण, ऐकत आहो हे कसे? ९पार्थी, मेदी
आणि एलामी, आणि मेसापोटेम्या, यहुदिया, कपद्दुकिया,
पंत, आणि आसिया येथील राहणारे, १०फ्रुगियातले,
पंफुलियातले, मिसरातले, आणि कुरेनेकडच्या
लिबुवातील भागातले, तसेच रोमकडून आलेले यहुदी
आणि यहुदीय मतानुसारी, ११क्रेती आणि अरबी असे
आपण हे देवाच्या महान कृत्यांविषयी आपल्याच भाषांत
बोलत आहेत हे ऐकत आहो."

१२तेव्हा ते सगळे चकित झाले व साशंक होऊन ते
एकमेकांस म्हणाले,

"ह्याचा अर्थ काय?"

१३पण दुसरे हसून म्हणाले,

"ह्यांना नवा द्राक्षारस भरपूर झालाय."

१४**पण पेत्र इतर अकरांबरोबर** उभा राहिला व त्याने
आपला आवाज चढवून त्यांना म्हटले,

"अहो तुम्ही यहुदियाचे लोक, आणि यरुशलेमात
राहणारे तुम्ही सर्व जण, तुम्हाला हे विदित होऊ द्या,
आणि माझ्या शब्दांकडे कान द्या. १५कारण तुम्हाला
वाटतं तसे हे प्यालेले नाहीत, कारण हा दिवसाचा तिसरा
तास आहे.

१६"पण योएल संदेष्ट्यानं सांगितलं होतं ते हे आहे,

१७'आणि देव म्हणतो,
त्या शेवटच्या दिवसांत असे होईल की,
मी सर्व मनुष्यांवर
माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन;
आणि तुमचे मुलगे आणि तुमच्या मुली
संदेश देतील.
तुमचे तरुण दृष्टान्त पाहतील,
आणि तुमचे वृद्ध स्वप्ने पाहतील.
१८आणि मी, त्या दिवसांत,
माझ्या दासांवर आणि माझ्या दासींवर
माझ्या आत्म्याचा वर्षाव करीन,
आणि ते संदेश देतील.
१९आणि, मी वर आकाशात अद्भुते,
आणि खाली पृथ्वीवर चिन्हे दाखवीन;
रक्त, आणि अग्नी आणि धुराची वाफ!
२०परमेश्वराचा तो मोठा, प्रसिद्ध दिवस
येण्याअगोदर,
सूर्य अंधकारमय आणि चंद्र रक्तमय होईल.
२१आणि असे होईल की,
जो कोणी परमेश्वराच्या नावाने धावा करील
तो तारला जाईल.'

२२"अहो इस्राएलाचे लोकहो, हे शब्द ऐका. नासोरी
येशू हा तुम्ही जाणता त्याप्रमाणं, देवानं तुमच्यात
त्याच्याकडून चमत्कार, अद्भुतं आणि चिन्हं केल्यामुळं
देवानं तुमच्यात खातरी पटवलेला मनुष्य २३देवाच्या
नियोजित संकल्पानुसार आणि पूर्वज्ञानानुसार धरून दिला
गेल्यामुळं, तुम्ही त्याला घेऊन, दुष्टांच्या हातून त्याला
वधस्तंभावर खिळलं आणि ठार मारलं. २४त्याला देवानं

मृत्यूच्या यातनांतून सोडवून उठवलं आहे; कारण मृत्यूनं
त्याला धरावं हे शक्य नव्हतं. [२५]कारण त्याविषयी दावीद
म्हणतो,

'मी सदोदित परमेश्वराला
माझ्या तोंडापुढे पाहिले;
कारण मी ढळू नये
म्हणून तो माझ्या उजव्या हाताशी आहे.
[२६]म्हणून माझे मन आनंदित झाले,
आणि माझी जीभ हर्षित झाली.
शिवाय, माझा देह पण आनंदित राहील.
[२७]कारण तू माझा जीव
अधोलोकात राहू देणार नाहीस,
आणि तू आपल्या पवित्र पुरुषाला
कुजण्याचा अनुभव घेऊ देणार नाहीस.
[२८]जीवनाचे मार्ग तू मला कळविले आहेस;
तू आपल्या समक्षतेने मला आनंदाने भरशील.'

[२९]"अहो बंधूंनो, कुलपिता दावीद ह्याच्याविषयी मला
तुमच्याशी हे उघडपणे बोलू द्या; तो मेला आणि त्याला
पुरलं आणि त्याचं थडगं, ह्या दिवसापर्यंत आपल्यात
आहे. [३०]आता, तो संदेष्टा होता, आणि जाणत होता की,
त्याच्या पोटच्या फळांतून एक त्याच्या राजासनावर
बसेल; असं देवानं त्याला शपथेवर वचन दिलं होतं.
[३१]म्हणून त्याला आधी दिसल्यामुळं, ख्रिस्ताच्या
पुनरुत्थानाविषयी तो हे बोलला की, त्याला अधोलोकात
राहू दिलं नाही, किंवा त्याच्या देहाला कुजण्याचा अनुभव
आला नाही.

[३२]"ह्या येशूला देवानं पुन्हा उठवलं आहे, आणि
आम्ही सगळे ह्याचे साक्षी आहो. [३३]म्हणून तो देवाच्या
उजव्या हाताशी, वर चढविला गेला असून, त्याला
पित्याकडून पवित्र आत्म्याविषयी वचन मिळालं
असल्यामुळं तुम्ही आता जे पाहता आणि ऐकता त्याचा
त्यानं वर्षाव केला आहे. [३४-३५]कारण दावीद स्वर्गात वर
गेला नाही पण तो म्हणतो,

'परमेश्वर माझ्या प्रभूला म्हणाला,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बस.'

[३६]"म्हणून इस्राएलाच्या सगळ्या घराण्यानं हे
निश्चित समजावं की, तुम्ही ज्या येशूला वधस्तंभावर
खिळलं त्यालाच देवानं प्रभू आणि ख्रिस्त केलं आहे."

[३७]आणि हे ऐकल्यावर त्यांच्या मनाला टोचणी
लागली, आणि ते पेत्राला व इतर प्रेषितांना म्हणाले,

"अहो बंधूंनो, आम्ही काय करावं?"

[३८]तेव्हा पेत्र त्यांना म्हणाला,

"पश्चात्ताप करा, आणि येशू ख्रिस्ताच्या नावानं
तुम्ही, प्रत्येक जण, पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा घ्या.
आणि तुम्हाला पवित्र आत्म्याचं दान मिळेल. [३९]कारण हे
वचन तुमच्यासाठी, तुमच्या मुलांसाठी आणि जे दूर
आहेत त्या सर्वांसाठी, म्हणजे आपला देव परमेश्वर हा
जितक्यांना आपल्याकडे बोलवील तितक्या सर्वांसाठी
आहे."

[४०]आणि, आणखी पुष्कळ शब्दांनी त्याने निक्षून साक्ष
दिली व बोध करून म्हटले,

"तुम्ही ह्या कुटिल पिढीपासून स्वतःला वाचवा."

[४१]तेव्हा ज्या लोकांनी त्याच्या वचनाचे स्वागत केले
त्यांचा बाप्तिस्मा झाला; आणि सुमारे तीन हजार जीव, त्या
दिवशी, त्यांच्यात मिळवले गेले. [४२]आणि ते प्रेषितांच्या
शिक्षणात व सहवासात भाकर मोडण्यात व प्रार्थनेत ठाम
राहिले.

[४३]तेव्हा प्रत्येक मनुष्यावर दहशत आली आणि
प्रेषितांकडून पुष्कळ चिन्हे व अद्भुते झाली. [४४]तेव्हा सर्व
विश्वासणारे एकत्र असत व त्यांचे सर्व समाईक असे.
[४५]ते आपली जमीन आणि मालमत्ता विकीत आणि
प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे ते सर्वांना वाटून देत.

[४६]आणि, ते प्रत्येक दिवशी, एकमताने मंदिरात
जाण्यात व घरोघर भाकर मोडण्यात ठाम राहिले. ते हर्षाने
व सालस मनाने आपले अन्न खात, [४७]आणि देवाचे स्तवन
करीत; आणि ते सर्व लोकांत मान्यता पावले आणि जे जे
तारले जात होते त्यांना प्रभू दररोज त्यांच्यात मिळवीत
होता.

## ३

आता पेत्र व योहान हे एकत्र मिळून प्रार्थनेच्या
वेळी, नवव्या ताशी वर मंदिरात गेले. [२]तेव्हा,
आईच्या उदरापासून पांगळा असलेल्या एका मनुष्याला
नेत होते; ते त्याला मंदिरात जाणाऱ्यांजवळ भिक्षा
मागायला सुंदर वेस नावाच्या मंदिराच्या वेशीजवळ
दररोज ठेवीत असत. [३]आणि पेत्र आणि योहान हे मंदिरात

जात आहेत हे बघून त्याने भिक्षा मागितली. ४तेव्हा पेत्राने योहानाबरोबर त्याच्याकडे टक लावून म्हटले,

"आमच्याकडे पहा."

५त्याला त्यांच्याकडून काही मिळेल असे वाटून त्याने त्यांच्याकडे लक्ष लावले.

६पण पेत्र त्याला म्हणाला,

"माझ्याजवळ चांदी आणि सोनं काही नाही; पण माझ्याजवळ जे काही आहे ते मी तुला देतो; नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावानं चाल."

७मग त्याने त्याच्या उजव्या हाताला धरून त्याला उठवले. आणि, लगेच, त्याच्या पायांत व घोट्यांत शक्ती आली. ८तेव्हा त्याने उडी मारली व तो उभा राहिला आणि चालला; आणि चालत, उड्या मारीत व देवाचे स्तवन करीत त्यांच्याबरोबर मंदिरात गेला.

९आणि, तो चालत होता व देवाचे स्तवन करीत होता हे सर्व लोकांनी बघितले. १०आणि हाच मंदिराच्या सुंदर वेशीजवळ भिक्षेसाठी बसत असे हे त्यांनी ओळखले. आणि त्याला असे झालेले पाहून ते आश्चर्याने व अत्यानंदाने भरून गेले.

११**तो पेत्राला व योहानाला** बिलगला असता, सर्व लोक फार आश्चर्यचकित होऊन, शलमोनाची देवडी म्हणत त्या ठिकाणी, त्यांच्याकडे एका घोळक्याने धावत आले. १२आणि हे बघून पेत्राने लोकांना उत्तर दिले,

"अहो इस्राएलाचे लोकहो, तुम्ही आश्चर्य का करता? किंवा अशी आमच्याकडे टक का लावता? जणू आम्ही आमच्या स्वतःच्या सामर्थ्यानं किंवा सुभक्तीनं ह्या मनुष्याला चालतं केलं? १३अब्राहामाचा, इसहाकाचा आणि याकोबाचा जो देव त्या आपल्या पूर्वजांच्या देवानं आपला सेवक येशू ह्याला गौरव दिलं आहे. तुम्ही त्याला धरून दिलं; आणि त्याला सोडून द्यावं असं पिलातानं ठरवलं असता, तुम्ही त्याच्यासमोर त्याला नाकारलं. १४पण तुम्ही जो पवित्र आणि नीतिमान त्याला नाकारलं, आणि तुम्ही तुमच्यासाठी एक खुनी सोडला जावा, अशी मागणी केली. १५आणि जीवनाच्या नेत्याला तुम्ही मारलं; त्याला देवानं मेलेल्यांतून उठवलं आहे ह्याचे आम्ही साक्षी आहो. १६आणि त्याच्या नावानं, त्याच्या नावावरील विश्वासाद्वारे, ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता आणि ओळखता त्याला सुदृढ केलं आहे; आणि त्याच्याकडून प्राप्त होणाऱ्या विश्वासानं त्याला तुमच्या सर्वांच्या तोंडापुढं हा सुदृढपणा दिला आहे.

१७"आणि बंधूंनो, मी हे जाणतो की, तुम्ही आणि तुमच्या अधिकाऱ्यांनी हे अज्ञानामुळं केलं. १८पण देवानं जे जे काही त्याच्या ख्रिस्तानं सोसलं पाहिजे, हे त्याच्या सर्व संदेष्ट्यांच्या मुखातून आधी विदित केलं होतं ते अशा प्रकारे पूर्ण केलं आहे. १९तर तुमची पापं पुसली जावीत म्हणून पश्चात्ताप करा आणि वळा. म्हणजे परमेश्वराकडून विश्रांतीचे समय यावेत २०आणि तुमच्यासाठी पूर्वी नेमलेला ख्रिस्त येशू ह्याला त्यानं पाठवावं. २१आणि देव युगादीपासून त्याच्या पवित्र संदेष्ट्यांच्या मुखाद्वारे ज्या गोष्टींविषयी बोलला, त्या सर्व पूर्वीप्रमाणं प्रस्थापित करायचे काळ येईपर्यंत त्याला स्वर्गानं स्थान देणं आवश्यक आहे.

२२"मोशेही म्हणतो की, 'परमेश्वर देव तुमच्या बांधवांतून माझ्यासारखा एक संदेष्टा तुमच्यासाठी उभा करील. तो तुम्हाला सांगेल त्या सर्व गोष्टींत त्याचं ऐका. २३आणि असं होईल की, जो त्या संदेष्ट्याचं ऐकणार नाही असा प्रत्येक जीव प्रजेतून सर्वस्वी नष्ट केला जाईल.' २४हो, आणि शमुवेलापासून, परंपरेनं, जे जे सर्व संदेष्टे बोलले त्यांनीदेखील ह्या दिवसांविषयी सांगितलं आहे.

२५"तुम्ही संदेष्ट्यांचे पुत्र आहा; आणि, 'तुझ्या संतानाच्या द्वारे पृथ्वीवरील सर्व वंशांना आशीर्वाद मिळेल', असं अब्राहामाला सांगून, देवानं तुमच्या पूर्वजांबरोबर केलेल्या कराराचेही पुत्र आहा. २६आणि देवानं आपला सेवक उभा करून त्याला तुमच्याकडे प्रथम पाठवलं, म्हणजे त्यानं तुम्हाला, तुमच्यातील प्रत्येकाला, तुमच्या कुकर्मांपासून फिरवून आशीर्वाद द्यावा."

# ४

**आणि ते लोकांशी बोलत** असता, तेथे याजक आणि मंदिराचा सरदार व सदोकी त्यांच्यावर चालून आले, २कारण ते लोकांना शिकवीत होते व येशूच्या द्वारे मेलेल्यांतून पुनरुत्थान आहे, असे ते गाजवीत होते, म्हणून ते चिडले होते. ३आणि त्यांनी त्यांच्यावर हात टाकले व त्यांना दुसऱ्या दिवसापर्यंत अटकेत ठेवले कारण तेव्हा संध्याकाळ झाली होती. ४परंतू ज्यांनी वचन ऐकले त्यांच्यातील पुष्कळांनी विश्वास ठेवला आणि अशा पुरुषांची संख्या सुमारे पाच हजार होती.

५आणि असे झाले की, यरुशलेमात, दुसऱ्या दिवशी,
त्यांचे अधिकारी, वडील व शास्त्री एकत्र जमले; ६तेथे श्रेष्ठ
याजक हन्ना व कयफा, योहान व अलेक्झांदर आणि श्रेष्ठ
याजकाच्या कुळातले सगळे जमले होते. ७आणि त्यांना
मध्यभागी उभे केल्यावर त्यांनी विचारले,

"तुम्ही हे कोणत्या सामर्थ्यानं किंवा कोणत्या नावानं
केलंत?"
८तेव्हा पवित्र आत्म्याने भरलेला पेत्र त्यांना म्हणाला,

"अहो तुम्ही लोकांचे अधिकारी आणि वडीलहो,
९ह्या अधू मनुष्यावर झालेल्या उपकाराविषयी, हा कसा
बरा झाला म्हणून, आज आमची चौकशी केली जात
असेल, १०तर तुम्हा सर्वांस आणि इस्राएलाच्या सर्व
लोकांस हे विदित व्हावं की, तुम्ही ज्याला वधस्तंभावर
खिळलं आणि देवानं ज्याला मेलेल्यांमधून उठवलं त्या
नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावामुळं, हा मनुष्य बरा झालेला
तुमच्यापुढं उभा आहे. ११तुम्ही बांधणाऱ्यांनी जो दगड
नाकारला तोच कोपऱ्याचा मुख्य चिरा झाला आहे.
१२आणि दुसऱ्या कोणाकडून तारण नाही; कारण ज्यानं
आपलं तारण झालं पाहिजे असं दुसरं कोणतंही नाव
मनुष्यांत, आकाशाखाली, दिलेलं नाही."

१३आणि त्यांनी पेत्राचे व योहानाचे धैर्य पाहिले,
आणि हे अज्ञ व अशिक्षित आहेत हे त्यांना दिसले तेव्हा
त्यांनी आश्चर्य केले; आणि त्यांनी ओळखले की, ते
येशूच्या सोबतीत असत.

१४आणि, तो बरा झालेला मनुष्य त्यांच्याबरोबर उभा
होता हे त्यांनी पाहिले तेव्हा त्यांना त्याविरुद्ध काही
बोलता येईना. १५पण त्यांनी त्यांना न्यायसभेतून बाहेर
जायची आज्ञा दिल्यावर त्यांनी आपसात विचार केला.
१६ते म्हणाले,

"आपण ह्या माणसांना काय करावं? कारण खरोखर
ह्यांच्याकडून एक प्रख्यात चिन्ह झालं आहे, हे
यरुशलेमात राहणाऱ्या सर्वांना माहीत आहे, आणि आपण
नाकारू शकत नाही. १७पण हे लोकांत अधिक पसरू नये
म्हणून आपण त्यांना धमकावणी देऊ की, त्यांनी ह्या
नावानं कोणाशी ह्यापुढं बोलू नये."

१८मग त्यांनी त्यांना बोलावले व त्यांना अशी आज्ञा
दिली की, त्यांनी ह्यापुढे येशूच्या नावाने बोलू नये किंवा
शिकवू नये. १९पण पेत्राने व योहानाने उत्तर देऊन त्यांना
म्हटले,

"देवापेक्षा तुमचं ऐकणं हे देवाच्या दृष्टीपुढं उचित
आहे काय? तुम्हीच न्याय करा. २०कारण आम्ही ज्या
गोष्टी बघितल्या आहेत आणि ऐकल्या आहेत त्या न
सांगणं आम्हाला शक्य होणार नाही."

२१म्हणून त्यांनी त्यांना पुन्हा धमकावणी देऊन त्यांना
जाऊ दिले. कारण त्यांना शिक्षा द्यायला त्यांना लोकांपुढे
काहीच मिळेना. कारण, हे जे झाले त्यामुळे सर्व लोक
देवाचे गौरव करीत होते. २२कारण हे बरे करण्याचे चिन्ह
ज्या माणसावर केले गेले तो चाळीस वर्षांहून अधिक
मोठ्या वयाचा होता.

२३**मग त्यांना सोडल्यावर** ते आपल्या सोबत्यांकडे
गेले व त्यांना वरिष्ठ याजक आणि वडील जे काही बोलले
होते ते सर्व त्यांनी सांगितले. २४आणि त्यांनी हे ऐकल्यावर
एकमताने देवाकडे आपला आवाज चढवला व म्हटले,

"हे स्वामी, आकाश, पृथ्वी आणि समुद्र, आणि
त्यांतले सर्व उत्पन्न करणारा तूच एक आहेस, २५आणि
आमचा पिता, तुझा सेवक दावीद ह्याच्या मुखातून तू
पवित्र आत्म्याच्या द्वारे म्हटलेस की,

'राष्ट्रे का खवळली?
आणि लोकांनी व्यर्थ गोष्टी का योजल्या?
२६परमेश्वराविरुद्ध,
आणि त्याच्या अभिषिक्ताविरुद्ध,
पृथ्वीचे राजे उभे राहिले,
आणि अधिकारी एकत्र जमले.'

२७कारण तुझा पवित्र सेवक येशू, ज्याला तू अभिषेक
केलास, त्याच्याविरुद्ध खरोखर ह्या नगरात, हेरोद आणि
पंतय पिलात हे परजनांबरोबर आणि इस्राएलाच्या
प्रजेबरोबर २८जे करायला एकत्र जमले होते, ते जे काही
व्हावं असं तुझ्या हातानं आणि संकल्पानं पूर्वनियोजित
केलं होतं तसंच होतं. २९-३०आणि प्रभू, आता त्यांच्या
धमकावण्यांकडे बघ, आणि तुझ्या दासांना असं दे की, तू
बरं करायला तुझा हात पुढं करीत असता, त्यांनी पूर्ण
धैर्यानं तुझं वचन सांगावं आणि तुझा पवित्र सेवक येशू
ह्याच्या नावानं चिन्हं आणि अद्भुतं केली जावीत."

३१आणि त्यांनी प्रार्थना केली तेव्हा ते जेथे एकत्र
जमले होते ती जागा हादरली, ते सर्व जण पवित्र आत्म्याने
भरले आणि धैर्याने देवाचे वचन सांगत गेले.

३२**आणि ज्यांनी विश्वास ठेवला** होता त्यांचा
समुदाय एकभावाचा व एकजिवाचा झाला होता, आणि
आपल्याजवळ असेल त्यातील काही आपले स्वतःचे
आहे असे कोणी म्हणत नसे, तर त्यांचे सर्व समाईक
असे. ३३आणि प्रेषित मोठ्या सामर्थ्याने प्रभू येशूच्या
पुनरुत्थानाची साक्ष देत होते आणि त्या सर्वांवर मोठी कृपा
होती. ३४आणि त्यांच्यात कोणाला काही कमी असेल
असे कोणी नव्हते; कारण त्यांच्यात जितके कोणी शेतांचे
किंवा घरांचे मालक होते ते ती विकीत आणि ज्यांची
विक्री होई त्यांच्या किंमती ते घेऊन येत ३५व प्रेषितांच्या
पायांशी ठेवीत असत; आणि प्रत्येक जणाला जशी गरज
असेल तशी वाटणी केली जाई. ३६म्हणून बर्णबा (म्हणजे
बोधपुत्र) हे दुसरे नाव ज्याला प्रेषितांनी दिले होते, तो
जन्माने कुप्राचा, लेवी योसेफ ३७ह्याची जमीन
असल्यामुळे त्याने ती विकली आणि पैसा आणून
प्रेषितांच्या पायांशी ठेवला.

५ **पण हनन्या नावाचा** एक मनुष्य आणि त्याची
बायको सफीरा ह्यांनी आपली एक जमीन विकली.
२त्याने किंमतीतला काही भाग मागे ठेवला हे त्याच्या
बायकोला माहीत होते; आणि काही भाग आणून
प्रेषितांच्या पायांशी ठेवला. ३पण पेत्र म्हणाला,

"हनन्या, तू पवित्र आत्म्याशी लबाडी करावीस,
आणि तुझ्या जमिनीच्या किंमतीमधून काही भाग ठेवावास
हे सैतानानं तुझ्या मनात का भरवलं? ४ती होती तेव्हा तुझी
स्वतःची नव्हती काय? आणि विकल्यावर ती तुझी
सत्तेची नव्हती काय? तू आपल्या मनात हे का ठरवलंस?
तू माणसांशी नाही, पण देवाशी लबाडी केलीस."
५हनन्याने हे शब्द ऐकले तेव्हा तो पालथा पडला व त्याने
प्राण सोडला; आणि ह्या गोष्टी ज्यांनी ऐकल्या त्यांच्यावर
मोठी दहशत आली. ६तेव्हा तरुण लोक उठले, त्यांनी
त्याला गुंडाळले, बाहेर नेले आणि पुरले.

७आणि सुमारे तीन तासांच्या अवधीनंतर असे झाले
की, त्याची बायको आत आली; तेव्हा काय झाले होते हे
तिला माहीत नव्हते. ८आणि, पेत्राने तिला उत्तर दिले,

"मला सांग, तुम्ही एवढ्यालाच जमीन विकली
काय?"
आणि ती म्हणाली,

"हो, एवढ्यालाच."
९तेव्हा पेत्र तिला म्हणाला,

"प्रभूच्या आत्म्याची परीक्षा करायला तुम्ही सहमत
का झाला? बघ, तुझ्या नवऱ्याला ज्यांनी पुरलं आहे
त्यांचे पाय दाराशी आहेत, आणि ते तुला घेऊन जातील."
१०तेव्हा लगेच ती त्याच्या पायांशी पालथी पडली व तिने
प्राण सोडला. मग तरुण आले तेव्हा त्यांना ती मेलेली
आढळली; आणि त्यांनी तिला नेऊन तिच्या नवऱ्याजवळ
पुरले. ११तेव्हा सर्व मंडळीवर आणि जितक्यांनी ह्या गोष्टी
ऐकल्या त्या सर्वांवर मोठी दहशत आली.

१२**आणि प्रेषितांच्या हातून** लोकांत पुष्कळ चिन्हे व
अद्भुते होत होती; आणि ते सर्व एकमताने शलमोनाच्या
देवडीत असत. १३पण बाहेरचा कोणीही त्यांच्यात
मिसळायला धजत नसे; पण लोक त्यांना थोर मानीत.
१४शिवाय, ज्यांनी विश्वास ठेवला अशा पुरुषांचे व
स्त्रियांचे समुदाय प्रभूकडे अधिक मिळवले गेले.
१५त्यामुळे ते आजाऱ्यांना बाहेर रस्त्यांवर नेऊन, त्यांना
खाटल्यांवर आणि अंथरुणांवर ठेवीत, म्हणजे पेत्र
चालला असता, त्यांच्यामधील काही जणांवर निदान
त्याची सावली पडावी. १६शिवाय तेथे यरुशलेमला,
आसपासच्या नगरांतील लोकांचा एक घोळका
आजाऱ्यांना, आणि ज्यांना अशुद्ध आत्म्यांनी पछाडले
होते अशा लोकांना घेऊन आला; आणि ते सर्व जण बरे
झाले.

१७**तेव्हा श्रेष्ठ याजक** आणि त्याच्याबरोबर असलेले
(सदोकी पंथाचे) सर्व जण ईर्ष्येने भरून उठले; १८आणि
त्यांनी प्रेषितांवर हात टाकले व त्यांना अटकेत ठेवले.
१९पण प्रभूच्या दूताने रात्री बंदिशाळेची दारे उघडून त्यांना
बाहेर आणले व म्हटले,

२०"जा, आणि मंदिरात उभे रहा; आणि ह्या जीवनाची
सर्व वचनं लोकांना सांगा."
२१त्यांनी हे ऐकल्यावर ते पहाटेस मंदिरात जाऊन शिकवू
लागले. आता, श्रेष्ठ याजक व त्याच्याबरोबर असणारे
लोक आले, त्यांनी न्यायसभा व इस्राएलाच्या वंशजांची
संपूर्ण वडीलसभा एकत्र बोलावली, आणि त्यांना घेऊन
यायला कामदारांना तुरुंगाकडे धाडले. २२पण जेव्हा
कामदार आले व त्यांना ते बंदिशाळेत आढळले नाहीत,
तेव्हा ते परत गेले आणि त्यांनी तसे सांगितले; २३ते
म्हणाले,

"आम्हाला खरोखर, पूर्ण संरक्षणाखाली तुरुंग बंद असलेला आढळला; आणि बाहेर दारापुढं रखवालदार उभे होते. [२३]पण आम्ही उघडल्यानंतर आत आम्हाला कोणी मनुष्य सापडला नाही."

[२४]त्यांनी ह्या गोष्टी ऐकल्यावर, ह्याचे काय होईल म्हणून मंदिराचा सरदार आणि वरिष्ठ याजक साशंक झाले. [२५]तेव्हा कोणी मनुष्य आला आणि त्याने त्यांना सांगितले व म्हटले,

"बघा, तुम्ही ज्या माणसांना बंदिशाळेत टाकलंत ते मंदिरात उभे आहेत आणि लोकांना शिकवीत आहेत."

[२६]मग सरदार कामदारांबरोबर गेला व त्यांनी त्यांच्यावर जुलूम न करता त्यांना आणले. कारण आपल्यावर दगडमार केला जाऊ नये म्हणून ते लोकांना भीत होते. [२७]आणि त्यांनी त्यांना आणून न्यायसभेपुढे उभे केले. मग श्रेष्ठ याजकाने त्यांना प्रश्न करून [२८]म्हटले,

"ह्या नावानं शिकवू नका अशी आम्ही तुम्हाला निक्षून आज्ञा दिली नाही काय? आणि बघा, तुम्ही तुमच्या शिकवणीनं यरुशलेम भरलं आहे. आणि ह्या माणसाचं रक्त तुम्ही आमच्यावर आणू इच्छिता."

[२९]पण पेत्राने व इतर प्रेषितांनी उत्तर देऊन म्हटले,

"आम्ही मनुष्यांपेक्षा देवाची आज्ञा मानली पाहिजे. [३०]तुम्ही ज्या येशूला झाडावर टांगून मारलंत त्याला आपल्या पूर्वजांच्या देवानं पुन्हा उठवलं. [३१]त्यानं इस्राएलाला पश्चात्ताप आणि पापांची क्षमा ही देणगी द्यावी म्हणून देवानं त्याला नेता आणि तारणारा करून आपल्या उजवीकडे उच्चपद दिलं; [३२]आणि आम्ही ह्या गोष्टींचे साक्षी आहो. आणि देवाची आज्ञा मानणाऱ्यांना त्यानं दिलेला पवित्र आत्माही साक्षी आहे."

[३३]त्यांनी हे ऐकले तेव्हा त्यांना चटका लागला, आणि ते त्यांना ठार मारायचा विचार करू लागले. [३४]पण गमलिएल नावाचा एक परोशी न्यायसभेत उभा राहिला; तो एक शास्त्राध्यापक होता, आणि सर्व लोक त्याला मान देत; त्याने अशी आज्ञा केली की, ह्या माणसांना थोडा वेळ बाहेर काढा. [३५]मग तो त्यांना म्हणाला,

"अहो इस्राएलाचे लोकहो, तुम्ही ह्या माणसांना काय करणार आहात ह्याची काळजी घ्या. [३६]कारण ह्या दिवसांपूर्वी थुदास उठला, आणि तो स्वतः कोणी आहे असे सांगू लागला, आणि त्याला जे लोक चिकटून राहिले त्यांची संख्या सुमारे चार हजार होती. तो मारला गेला, आणि त्याचं ऐकणारे होते तितके सगळे पांगले, आणि नाहीसे झाले. [३७]त्याच्यानंतर नावनिशीच्या दिवसात गालिलातला यहुदा उठला, आणि त्यानं पुष्कळ लोक आपल्याकडे ओढले. तो नष्ट झाला, आणि त्याचं ऐकणारे होते तितके सगळे जण पांगवले गेले.

[३८]"आणि, आता तुम्हाला मी सांगतो की, ह्या माणसांपासून दूर रहा, आणि त्यांना सोडा. कारण ही योजना किंवा ही कृती मनुष्यांची असल्यास नष्ट होईल, [३९]पण ती देवाची असल्यास तुम्ही ह्यांना नष्ट करू शकणार नाही; उलट तुम्ही देवाला विरोध करणारे व्हाल." [४०]आणि त्यांनी त्याचे ऐकले, आणि प्रेषितांना आत बोलवून मार दिल्यावर त्यांनी त्यांना आज्ञा दिली की, त्यांनी येशूच्या नावाने बोलू नये, आणि त्यांना जाऊ दिले.

[४१]आणि ते त्याच्या नावाकरता अपमान सोसायला लायक गणले गेले म्हणून ते आनंद करीत न्यायसभेपुढून निघून गेले. [४२]आणि त्यांनी मंदिरात व प्रत्येक घरी दररोज शिकवून, येशू हा ख्रिस्त आहे ही सुवार्ता सांगणे थांबवले नाही.

६ आणि त्या दिवसांत शिष्यांची संख्या बहुगुणित होत असता, इब्री भाषा बोलणाऱ्यांविरुद्ध हेल्लेणी बोलणाऱ्यांची कुरकुर होऊ लागली; कारण रोजच्या वाढण्यात त्यांच्या विधवांकडे दुर्लक्ष होत असे. [२]तेव्हा त्या बारांनी शिष्यसमुदायास आपल्याकडे बोलवून म्हटले,

"आम्ही देवाचं वचन सोडून पंगती वाढणं हे बरोबर नाही. [३]म्हणून बंधूंनो, तुम्ही आपल्यातले नावाजलेले, आत्म्यानं आणि ज्ञानीपणानं भरलेले सात जण शोधून काढा. म्हणजे आम्ही त्यांना ह्या कामावर नेमू; [४]पण आम्ही प्रार्थनेत आणि वचनाच्या सेवेत ठाम राहू."

[५]आणि ह्या म्हणण्याने सर्व लोक संतुष्ट झाले; तेव्हा त्यांनी विश्वासाने व पवित्र आत्म्याने भरलेला स्तेफन, तसेच फिलिप, प्रखोरस, निकानूर, तिमोन, पारमिनास आणि अंत्युखियाचा यहुदीय धर्मानुयायी निखोलाव ह्यांना निवडले, [६]आणि त्यांना प्रेषितांपुढे उभे केले. आणि त्यांनी प्रार्थना केल्यावर त्यांनी त्यांच्यावर हात ठेवले. [७]मग देवाच्या वचनाची वाढ झाली, आणि यरुशलेमात शिष्यांची संख्या मोठ्या प्रमाणात बहुगुणित झाली. आणि याजकांमधील एक मोठा गट विश्वासाचे आज्ञापालन करू लागला.

८आता, कृपेने आणि सामर्थ्याने भरलेला स्तेफन
हा लोकांत मोठी अद्भुते व चिन्हे करीत होता. ९पण
ज्याला लिबर्टीन लोकांचे सभास्थान म्हणत त्या
सभास्थानातील कित्येक जण, त्यांच्यातलेच कुरेनेचे व
अलेक्झांद्रियाचे काही जण, आणि किलिकियातले व
आसियातले कित्येक जण स्तेफनाबरोबर वाद करायला
उठले. १०आणि तो ज्या ज्ञानीपणाने व आत्म्याने बोलला
त्याला ते तोंड देऊ शकले नाहीत.

११तेव्हा त्यांनी काही लोक मिळवून उभे केले; आणि
त्यांनी आरोप केला की, त्यांनी त्याला मोशेविरुद्ध आणि
देवाविरुद्ध दुर्भाषणपर शब्द बोलताना ऐकले होते. १२मग
त्यांनी लोकांना आणि वडिलांना व शास्त्र्यांना चिथवले,
आणि त्याच्यावर चाल करून त्याला धरले, आणि
न्यायसभेपुढे आणले. १३आणि त्यांनी खोटे साक्षी उभे
केले; आणि ते म्हणाले,

"हा मनुष्य ह्या पवित्र स्थानाविरुद्ध आणि
नियमशास्त्राविरुद्ध दुर्भाषणपर शब्द बोलायचं थांबवीत
नाही. १४कारण आम्ही ह्याला बोलताना ऐकलं आहे की,
नासोरी येशू हे स्थान मोडील, आणि मोशेनं आपल्याला जे
परिपाठ नेमून दिलेत ते तो बदलील."

१५आणि जे सर्व जण न्यायसभेत बसले होते त्यांनी
त्याच्याकडे टक लावली आणि त्यांनी त्याची चर्या
देवदूताच्या चर्येसारखी झालेली बघितली.

७ तेव्हा श्रेष्ठ याजक म्हणाला,
"ह्या गोष्टी अशाच आहेत काय?"
२आणि तो म्हणाला,

"अहो बंधूहो, आणि पितेहो,

"आपला पूर्वज अब्राहाम हा हारानास जाऊन
राहण्याअगोदर, मेसापोटेम्यात होता तेव्हा गौरवाचा देव
त्याला प्रगट झाला. ३आणि तो त्याला म्हणाला, 'तू ह्या
देशातून, आणि तुझ्या नातलगातून बाहेर नीघ; आणि मी
तुला दाखवणार आहे त्या देशात जा.' ४मग तो
खास्द्यांच्या देशातून बाहेर जाऊन हारानात राहिला,
आणि, त्यानं त्याचा बाप मेल्यावर, त्याला तेथून आता
तुम्ही रहात आहा त्या देशात आणलं. ५आणि त्यानं
त्याला काही वतन दिलं नाही. हो, चवडाभरदेखील नाही;
पण तेव्हा त्याला मूल नसताना त्यानं त्याला आणि
त्याच्यामागून त्याच्या संतानाला तो वतन द्यायचं वचन
दिलं. ६आणि देव असं म्हणाला की, 'त्याच्या संतानाला
परदेशात उपरी होऊन रहावं लागेल; ते त्यांना आपले दास
करतील आणि चारशे वर्षं त्यांना जाचतील.' ७आणि देव
म्हणाला की, 'ते ज्या राष्ट्राच्या दास्यात राहतील त्याचा मी
न्याय करीन, आणि त्यानंतर ते बाहेर येतील आणि ह्या
ठिकाणी माझी सेवा करतील.' ८आणि त्यानं त्याला
सुनतविधीचा करार दिला; आणि तो अशा प्रकारे
इसहाकाचा जनक झाला; आणि त्याने त्याची आठव्या
दिवशी सुनत केली. आणि इसहाक याकोबाचा, आणि
याकोब बारा कुलपतींचा जनक झाला.

९"कुलपतींनी ईर्ष्या धरून योसेफाला मिसरात विकलं
पण देव त्याच्याबरोबर होता. १०त्यानं त्याच्या सर्व
संकटांतून त्याला सोडवलं आणि मिसरात फारो राजापुढं
त्याला कृपा आणि सुज्ञता पुरवली. तेव्हा त्यानं त्याला
मिसरावर आणि आपल्या सर्व घरावर अधिकारी नेमलं.

११"आता, सर्व मिसर देशात आणि कनान देशात
दुष्काळ पडल्यामुळं मोठं संकट आलं; आणि आपल्या
पूर्वजांना अन्न मिळेना. १२पण याकोबानं जेव्हा ऐकलं की,
मिसरात धान्य आहे तेव्हा त्यानं आपल्या पित्यांना
पहिल्या वेळी पाठवून दिलं. १३मग दुसऱ्या वेळी योसेफानं
आपल्या भावांना ओळख दिली; आणि फारोला योसेफाचं
कुळ माहीत झालं. १४मग योसेफानं त्यांना पाठवून
आपल्या पित्याला म्हणजे याकोबाला, आणि सर्व
नातलगांना तिकडे बोलावलं; ते पंचाहत्तर जीव होते.
१५अशा प्रकारे याकोब मिसरात गेला, आणि मेला; आणि
तसेच आपले पितेही मेले. १६तेव्हा त्यांना शखेमात नेलं,
आणि शखेमात अब्राहामानं हमोराच्या पुत्रांकडून रुप्याच्या
मोबदल्यात विकत घेतलेल्या थडग्यात ठेवलं.

१७"पण देवानं अब्राहामाला ज्याचं आश्वासन दिलं
होतं त्या वचनाचा काळ जेव्हा जवळ आला तेव्हा ते
लोक मिसरात वाढले आणि बहुगुणित झाले, १८तेव्हा
ज्याला योसेफ माहीत नव्हता असा दुसरा राजा मिसरात
झाला. १९तो आपल्या लोकांशी कपटानं वागला, आणि
त्यानं आपल्या पूर्वजांवर अशी सक्ती केली की, त्यांनी
आपल्या नवजात बालकांना बाहेर टाकावं; हेतू हा की, ती
जगू नयेत.

२०"आणि त्या काळात मोशे जन्मला; तो देवाच्या
दृष्टीपुढं सुंदर होता, आणि त्याच्या बापाच्या घरात त्यांनी
त्याला तीन महिने संभाळलं. २१आणि त्याला बाहेर टाकलं
तेव्हा फारोच्या कन्येनं उचलून घेतलं, आणि तिनं त्याला

आपला मुलगा म्हणून संभाळलं. [२२]आणि, मिसऱ्यांच्या सर्व ज्ञानात मोशेला शिक्षण दिलं गेलं; तो शब्दांत आणि कृतीत पराक्रमी होता.

[२३]"आणि जेव्हा त्याचं चाळीस वर्षांचं वय होत आलं तेव्हा त्याच्या मनात आलं की, आपण आपल्या बांधवांची, इस्राएलाच्या वंशजांची भेट घ्यावी; [२४]आणि एकावर अन्याय केला जात होता हे बघितल्यावर ज्याच्यावर जुलुम होत होता त्याची कड घेऊन त्यानं त्याचा न्याय केला; आणि त्या मिसऱ्याला मारलं; [२५]कारण त्याला असं वाटलं की, त्याच्या हातानं देव त्यांना अशा प्रकारे सोडवील, हे त्याच्या बांधवांना समजेल; पण ते त्यांना समजलं नाही. [२६]दुसऱ्या दिवशी ते भांडत असताना तो त्यांच्यापुढं उभा राहिला आणि त्यांची समजूत घडवून आणायला त्यांना म्हणाला, 'गड्यांनो, तुम्ही भाऊ आहा; तुम्ही एकमेकांवर अन्याय का करता?' [२७]पण, जो आपल्या सोबत्यांवर अन्याय करीत होता त्यानं त्याला दूर लोटून म्हटलं, 'कोणी तुला आमच्यावर अधिकारी आणि न्यायाधीश नेमलं? [२८]काल त्या मिसऱ्याला ठार मारलंस, तसंच मला ठार मारावं अशी तुझी इच्छा आहे काय?' [२९]तेव्हा ह्या बोलण्यामुळं मोशे पळाला आणि मिद्यानात उपरी झाला; तेथे त्याला दोन मुलगे झाले.

[३०]"आणि चाळीस वर्षं पूर्ण झाल्यावर त्याला सिनाय डोंगराच्या रानात, एका झुडपात, अग्नीच्या ज्वालेत एक देवदूत दिसला. [३१]मोशेनं ते बघितलं तेव्हा त्यानं त्या दृश्याविषयी आश्चर्य केलं; आणि तो ते न्याहाळायला जवळ जात असता परमेश्वराचा आवाज तो होता तेथवर आला, [३२]'मी तुझ्या पूर्वजांचा देव, अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव, आणि याकोबाचा देव आहे.' तेव्हा मोशे भयभीत झाला, आणि तो ते न्याहाळायला जवळ जायला धजला नाही. [३३]तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, 'तू आपल्या वहाणा आपल्या पायांतून काढ, कारण, तू ज्या जागेवर उभा आहेस ती पवित्र भूमी आहे. [३४]मी मिसरात असलेल्या माझ्या लोकांची गांजणूक बघितली आहे, खरोखर बघितली आहे, त्यांचं कण्हणं ऐकलं आहे, आणि मी त्यांना सोडवायला उतरलो आहे. आणि आता चल, मी तुला मिसरात पाठवीन.'

[३५]" 'कोणी तुला आमच्यावर अधिकारी आणि न्यायाधीश नेमलं?', असं म्हणून त्यांनी ज्याला नाकारलं त्या ह्या मोशेला, त्याला झुडपात प्रगट झालेल्या देवदूताकरवी, देवानं अधिकारी आणि मुक्तिदाता करून पाठवलं. [३६]ह्यानं त्यांना, मिसर देशात, तांबड्या समुद्रात आणि अरण्यात, चाळीस वर्षं, अद्भुतं आणि चिन्हं दाखवून बाहेर आणलं.

[३७]" 'आणि देव तुमच्या बांधवांतून माझ्यासारखा एक संदेष्टा तुमच्यासाठी उभा करील', असं जो इस्राएलाच्या वंशजांना म्हणाला, तो हा मोशे होय. [३८]रानातल्या मंडळीत, सिनाय डोंगरावर त्याच्याशी बोलणाऱ्या देवदूतांबरोबर आणि आपल्या पूर्वजांबरोबर जो होता तो हा होय. आणि त्याला आपल्याला द्यायला जिवंत वचनं मिळाली. [३९]त्याच्या अधीन रहावं अशी आपल्या पूर्वजांची इच्छा नव्हती. त्यांनी त्याला आपल्यापासून दूर लोटलं, ते आपल्या मनांत मिसराकडे फिरले, [४०]आणि अहरोनाला म्हणाले, 'तू आमच्यासाठी जे आमच्यापुढं चालतील असे देव कर कारण, ज्यानं आपल्याला मिसर देशातून बाहेर आणलं त्या ह्या मोशेचं काय झालं ते आम्हाला माहीत नाही.' [४१]मग त्यांनी, त्या दिवसांत, एक वासरू घडवून त्या मूर्तीपुढं बलिदान आणलं; आणि, त्यांनी आपल्या हातांच्या कामांत आनंद केला. [४२]तेव्हा देव फिरला, आणि त्यानं त्यांना आकाशातल्या सेनागणाची उपासना करायला सोडून दिलं; कारण संदेष्ट्यांच्या ग्रंथात असं लिहिलं आहे की,

'हे इस्राएलाच्या घराण्या,
तुम्ही मला रानात, चाळीस वर्षे,
मारलेले पशू आणि बली
अर्पण केलेत काय?
[४३]पण तुम्ही मोलोखाचा मंडप
आणि रेफान देवाचा तारा
उचलून घेतला.
ते त्यांची उपासना करायला
तुम्ही केलेले नमुने होते.
आणि मीही तुम्हाला बाबेलाच्या
पलीकडे घेऊन जाईन.'

[४४]आपल्या पूर्वजांना रानात साक्षीचा मंडप होता. तो देवानं मोशेला त्यानं पाहिलेल्या नमुन्याप्रमाणं करायला सांगतेवेळी आज्ञा दिल्याप्रमाणं होता. [४५]आणि, त्यांच्या मागून ज्यांना मिळाला त्या आपल्या पूर्वजांनी, यहोशवाबरोबर, परजनांच्या देशात आणला. देवानं त्यांना आपल्या पूर्वजांपुढून बाहेर लोटले. [४५]दाविदाच्या दिवसांपर्यंत तो तसाच होता. [४६]त्यानं देवाच्या दृष्टीपुढं

कृपा संपादली; आणि याकोबाच्या देवासाठी एक
वसतिस्थान मिळवता यावं म्हणून याचना केली. ४७पण
शलमोनानं त्याच्यासाठी मंदिर बांधलं; ४८तरी जो परात्पर
आहे तो हातांनी बांधलेल्या मंदिरात रहात नाही. कारण
संदेष्टा म्हणतो की,

> ४९'परमेश्वर म्हणाला,
> आकाश माझे आसन आहे,
> आणि पृथ्वी माझे पदासन आहे;
> तुम्ही माझ्यासाठी कोणते घर बांधणार?
> किंवा माझ्या विसाव्याचे स्थान कोणते?
> ५०माझ्या हाताने ह्या सगळ्या गोष्टी
> केल्या नाहीत काय?'

५१"अहो तुम्ही ताठ मानेचे! मनाचे आणि कानांचे
बेसुनत! तुम्ही सतत पवित्र आत्म्याला विरोध करता.
तुमच्या पूर्वजांनी जसं केलं तसंच तुम्ही करता. ५२तुमच्या
पूर्वजांनी संदेष्ट्यांतल्या कोणाचा पाठलाग केला नाही?
आणि तो 'एक नीतिमान' येणार आहे असं ज्यांनी आधी
सांगितलं त्यांना त्यांनी ठार मारलं; आणि तुम्ही त्याला
धरून देणारे आणि ठार मारणारे झाला आहात.
५३देवदूतांच्या सेवेद्वारे तुम्हाला नियमशास्त्र मिळालं, पण
तुम्ही ते पाळलं नाही."

५४त्यांनी हे सर्व ऐकले तेव्हा त्यांच्या मनाला चटका
लागला. आणि ते त्याच्यावर दात खाऊ लागले. ५५पण,
तो पवित्र आत्म्याने भरला असता, त्याने आकाशाकडे
टक लावली तेव्हा त्याला देवाचे तेज, आणि देवाच्या
उजवीकडे येशू उभा आहे असे दिसले. ५६आणि तो
म्हणाला,

"बघा, मी पहात आहे की, आकाश उघडलं आहे,
आणि, मनुष्याचा पुत्र देवाच्या उजव्या हाताजवळ उभा
आहे."

५७तेव्हा ते मोठ्या आवाजात ओरडले आणि त्यांनी
आपले कान दाबले; आणि ते एकमताने त्याच्यावर
धावले. ५८आणि त्यांनी त्याला नगरातून बाहेर नेऊन
दगडमार केला. तेव्हा साक्षींनी शौल नावाच्या एका
तरुणाच्या पायांजवळ आपले कपडे टाकले. ५९आणि, ते
स्तेफनाला दगडमार करीत असता, तो धावा करीत
म्हणाला,

"प्रभू येशू, माझ्या आत्म्याचा स्वीकार कर."

६०आणि त्याने गुडघे टेकले व तो मोठ्या आवाजात
ओरडून म्हणाला,

"प्रभू, हे पाप ह्यांच्या हिशोबी मांडू नको."
आणि एवढे बोलून तो निजला.

८ आणि शौल त्याच्या मृत्यूला संमती देत
होता. आणि, त्या दिवशी, यरुशलेममधील
मंडळीचा मोठा छळ सुरू झाला. आणि, प्रेषितांखेरीज ते
सर्व जण यहुदियाच्या व शोमरोनाच्या प्रांतात पांगले. २पण
भक्तिमान लोकांनी स्तेफनाला नेले आणि त्यांनी
त्याच्याकरता मोठा शोक केला. ३पण इकडे शौलाने
मंडळीला सतावले. आणि प्रत्येक घरात शिरून पुरुषांना व
स्त्रियांना ओढून नेऊन बंदिशाळेत घातले.

४ह्या कारणांमुळे जे लोक पांगले ते प्रत्येक
ठिकाणी वचनाची सुवार्ता सांगत गेले. ५तेव्हा फिलिप
खाली, शोमरोन नगरात गेला व त्याने त्यांना ख्रिस्ताची
घोषणा केली. ६आणि लोकांनी त्याचे ऐकले व त्याने
केलेली चिन्हे बघितली, तेव्हा त्यांनी, एकमताने, फिलिप
त्यांना सांगत असलेल्या गोष्टींकडे लक्ष दिले. ७कारण
पछाडलेल्या पुष्कळ लोकांतून अशुद्ध आत्मे मोठ्या
आवाजात ओरडून निघाले. आणि पुष्कळ पक्षघाती व
पांगळे बरे झाले. ८आणि त्या नगरात मोठा आनंद झाला.

९पण तेथे शिमोन नावाचा एक मनुष्य होता; तो त्या
नगरात पूर्वी जादुगिरी करीत असे. तो शोमरोनी लोकांना
भुलवीत असे, आणि तो कोणी मोठा होता असे दाखवीत
असे. १०ते लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळे त्याच्याकडे
लक्ष देत, आणि म्हणत की, 'देवाची महाशक्ती म्हणतात
तो हाच आहे.' ११आणि ते त्याला मानीत असत, कारण
त्याने आपल्या जादूंनी त्यांना दीर्घकाळ भुलवले होते.
१२पण फिलिप देवाच्या राज्याविषयी व येशू ख्रिस्ताच्या
नावाविषयी त्यांना सुवार्ता सांगत असता त्यांनी त्याच्यावर
विश्वास ठेवला. तेव्हा त्यांनी, पुरुषांनी व स्त्रियांनी,
बाप्तिस्मा घेतला. १३मग स्वतः शिमोनानेही विश्वास
ठेवला, आणि त्याचा बाप्तिस्मा झाल्यावर तो
फिलिपाजवळ ठाम राहिला; आणि चिन्हे व मोठे चमत्कार
होत असता तो पहात असे व चकित होत असे.

[१४]**आता, जे प्रेषित यरुशलेमात** होते त्यांनी ऐकले की, शोमरोनानेदेखील वचन स्वीकारले आहे, तेव्हा त्यांनी पेत्र व योहान ह्यांना त्यांच्याकडे पाठवले. [१५]आणि ते खाली आल्यावर, त्यांनी त्यांना पवित्र आत्मा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना केली. ([१६]कारण तोपर्यंत तो त्यांच्यातल्या कोणावर उतरला नव्हता; केवळ प्रभू येशूच्या नावाने त्यांचा बाप्तिस्मा झाला होता.) [१७]मग त्यांनी त्यांच्यावर हात ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला.

[१८]आणि शिमोनाने बघितले की, प्रेषितांचे हात वर ठेवले गेल्याने पवित्र आत्मा दिला जातो तेव्हा त्याने त्यांच्यापुढे पैसे ठेवले, [१९]आणि तो त्यांना म्हणाला,

"मला पण हा अधिकार द्या, म्हणजे मी ज्या कोणावर माझे हात ठेवीन त्याला पवित्र आत्मा मिळावा."

[२०]तेव्हा पेत्र त्याला म्हणाला,

"तुझ्या पैशाचा तुझ्याबरोबर नाश होवो; कारण तू विचार केलास की, पैशानं देवाचं दान मिळवता येईल. [२१]तुला ह्या गोष्टीत भागी नाही किंवा वाटा नाही, कारण देवाच्या दृष्टीपुढं तुझं मन सरळ नाही. [२२]तर तू आपल्या ह्या कुवृत्तीचा पश्चात्ताप कर, आणि प्रभूची प्रार्थना कर; म्हणजे, तुझ्या मनातल्या कल्पनेची तुला, कदाचित्, क्षमा केली जाईल. [२३]कारण मी पाहतो, तू कडूपणाच्या कडू मुळात, आणि अनीतीच्या बंधनात आहेस."

[२४]तेव्हा शिमोनाने उत्तर देऊन म्हटले,

"तुम्ही म्हटलेल्या गोष्टींपैकी कोणतीच माझ्यावर येऊ नये म्हणून तुम्हीच माझ्याकरता प्रभूची प्रार्थना करा."

[२५]आणि तेथे त्यांनी निक्षून साक्ष देऊन प्रभूचे वचन सांगितल्यावर ते यरुशलेमकडे परत निघाले; आणि त्यांनी शोमरोन्यांच्या पुष्कळ खेड्यांत सुवार्ता सांगितली.

[२६]**तेव्हा परमेश्वराचा दूत** फिलिपाशी बोलला व त्याला म्हणाला,

"ऊठ आणि दक्षिणेकडे जा, आणि यरुशलेमकडून गज्जास जाणाऱ्या वाटेस लाग."

(तेथे वाळवंट आहे.) [२७]आणि तो उठला आणि गेला; आणि बघा, एक हबशी मनुष्य, हबशी लोकांची राणी कांदके हिच्या सर्व भांडारावर अधिकारी असलेला एक षंढ यरुशलेमला उपासना करायला आला होता; [२८]तो परत जात होता, आणि आपल्या रथात बसून यशया संदेष्ट्याचे वाचन करीत होता.

[२९]तेव्हा आत्मा फिलिपाला म्हणाला,

"जवळ जा आणि तो रथ गाठ."

[३०]फिलिप त्याच्याकडे धावत गेला तेव्हा तो यशया संदेष्ट्याचे वाचन करीत होता हे त्याने ऐकले, आणि तो त्याला म्हणाला,

"आपण काय वाचता ते आपल्याला समजतं काय?"

[३१]तेव्हा तो म्हणाला,

"मला कोणी मार्गदर्शन केल्याशिवाय कसं समजू शकेल?"

आणि त्याने फिलिपाला वर येऊन आपल्याजवळ बसायची विनंती केली.

[३२]आणि तो जो शास्त्रलेख वाचीत होता तो भाग असा होता,

'मेंढराप्रमाणे त्याला वधासाठी नेण्यात आले,
आणि कोकरू जसे कातरणाऱ्यापुढे
मुके असते
तसे त्याने आपले तोंड उघडले नाही.
[३३]त्याचा न्याय त्याच्या दीन अवस्थेत
हिरावला गेला.
आणि कोण त्याच्या पिढीचे वर्णन करील?
कारण पृथ्वीवरून त्याचा जीव
घेतला गेला आहे.'

[३४]आणि षंढाने फिलिपाला उत्तर देऊन म्हटले,

"मी आपल्याला सादर विचारतो की, संदेष्टा हे कोणाविषयी म्हणतो? स्वतःविषयी किंवा दुसऱ्या कोणाविषयी?"

[३५]तेव्हा फिलिपाने आपले तोंड उघडले व त्याच शास्त्रलेखापासून सुरुवात करून त्याला येशूची सुवार्ता सांगितली.

[३६]आणि ते वाटेने पुढे जात असता एका पाणवठ्याजवळ आले; तेव्हा षंढ म्हणाला,

"बघा, हे पाणी; मला बाप्तिस्मा घेता यायला काय आडकाठी आहे?"

[३७-३८]आणि त्याने रथ थांबवायची आज्ञा दिली. मग फिलिप व षंढ असे ते दोघे पाण्यात उतरले; आणि त्याने त्याचा बाप्तिस्मा केला. [३९]आणि ते पाण्यातून वर येताच परमेश्वराच्या आत्म्याने फिलिपाला उचलले; त्यामुळे त्यानंतर षंढाने त्याला बघितले नाही, आणि तो आपल्या वाटेने आनंद करीत गेला. [४०]पण फिलिप अजोत येथे

आढळला; आणि तो कैसरियास येईपर्यंत त्याने सर्व नगरांत सुवार्ता गाजवीत प्रवास केला.

९ आणि शौल, अजून प्रभूच्या शिष्यांविरुद्ध धमकावण्यांचे व ठार मारणाऱ्यांचे फूत्कार काढीत, श्रेष्ठ याजकाकडे गेला; [२]आणि त्याने त्याच्याकडून दिमिष्कातल्या सभास्थानांना अशी पत्रे मागितली की, त्याला कोणीही, पुरुष किंवा स्त्रिया, हा मार्ग अवलंबीत आहेत असे आढळल्यास त्याने त्यांना अटक करून यरुशलेमास आणावे.

[३]आणि तो प्रवास करीत दिमिष्काजवळ आला असता, त्याच्या सभोवती आकाशातून, अकस्मात्, एक प्रकाश चमकला; [४]आणि तो जमिनीवर पडला; तेव्हा त्याने एक आवाज ऐकला आणि तो त्याला म्हणाला,

"शौला, शौला, तू माझा छळ का करतोस?"

[५]तेव्हा तो म्हणाला,

"प्रभू, तू कोण आहेस?"

आणि प्रभू म्हणाला,

"तू ज्याचा छळ करतोस तो येशू मी आहे. [६]तर ऊठ, आणि नगरात जा; आणि तू काय केलं पाहिजे ते तुला सांगण्यात येईल."

[७]तेव्हा जे लोक त्याच्याबरोबर जात होते ते स्तब्ध उभे राहिले; कारण त्यांनी आवाज ऐकला पण कोणाला पाहिले नाही. [८]आता, शौल जमिनीवरून उठला; आणि त्याचे डोळे उघडले. तेव्हा त्याला काही दिसेना; पण त्यांनी त्याला, हाताला धरून चालवीत, दिमिष्कात आणले. [९]त्याला तीन दिवस दिसत नव्हते, आणि तो काही खात पीत नव्हता.

[१०]तेव्हा दिमिष्कात हनन्या नावाचा एक शिष्य होता; आणि प्रभू त्याला दृष्टान्तात म्हणाला,

"हनन्या,"

आणि तो म्हणाला,

"प्रभू, पहा, मी इथं आहे."

[११]आणि प्रभू त्याला म्हणाला,

"ऊठ, आणि नीट नावाच्या रस्त्यावर जा; आणि तिथं यहुदाच्या घरी तार्स इथल्या शौल नावाच्या मनुष्याचा शोध कर, कारण बघ, तो प्रार्थना करीत आहे; [१२]आणि त्याला दृष्टी यावी म्हणून हनन्या नावाचा एक जण आत येऊन त्याच्यावर हात ठेवीत आहे असं त्यानं दृष्टान्तात बघितलं आहे."

[१३]तेव्हा हनन्याने उत्तर दिले,

"प्रभू, ह्या मनुष्यानं यरुशलेमात तुझ्या पवित्र जनांचं किती वाईट केलं आहे, हे मी त्याच्याविषयी पुष्कळांकडून ऐकलं आहे; [१४]आणि त्याला वरिष्ठ याजकांकडून, इथंदेखील जे तुझ्या नावाचा धावा करतात अशा सर्वांना अटक करायचा अधिकार आहे."

[१५]पण प्रभू त्याला म्हणाला,

"जा, कारण तो परजनांपुढं, राजांपुढं आणि इस्राएलाच्या वंशजांपुढं माझं नाव घेऊन जायला माझं निवडलेलं पात्र आहे. [१६]कारण माझ्या नावावरून त्याला किती मोठ्या गोष्टी सोसल्या पाहिजेत हे मी त्याला प्रगट करीन."

[१७]तेव्हा हनन्या निघून त्या घरात गेला; त्याने त्याच्यावर आपले हात ठेवले व तो त्याला म्हणाला,

"बंधू शौल, तू येत असताना तुझ्या वाटेवर ज्या प्रभूनं म्हणजे येशूनं तुला दर्शन दिलं, त्यानं तुला दृष्टी यावी आणि तू पवित्र आत्म्यानं भरावंस म्हणून मला पाठवलं आहे."

[१८]आणि तेव्हाच त्याच्या डोळ्यांवरून खपल्यांसारखे काही पडले. आणि लगेच त्याला दृष्टी आली; आणि तो उठला व त्याने बाप्तिस्मा घेतला.

[१९]आणि त्याने अन्न घेतल्यावर त्याला शक्ती आली. त्यानंतर तो कित्येक दिवस दिमिष्कातल्या शिष्यांबरोबर आढळला. [२०]आणि, लगेच, त्याने सभास्थानातून येशूविषयी अशी घोषणा केली की, 'तो देवाचा पुत्र आहे.' [२१]आणि हे ऐकणारे सर्व चकित झाले व म्हणू लागले की,

"जे ह्या नावाचा धावा करणारे यरुशलेमात होते त्यांचा ज्यानं नाश केला तो हाच ना? आणि इथं त्यांना अटक करावी आणि वरिष्ठ याजकांकडे न्यावं एवढ्याच हेतूनं हा आला होता ना? "

[२२]पण शौल अधिक प्रबळ होत गेला, आणि, हाच ख्रिस्त आहे, हे प्रस्थापित करून, त्याने दिमिष्कात राहणाऱ्या यहुद्यांना कुंठित केले.

[२३]आता, पुष्कळ दिवस झाल्यावर यहुद्यांनी त्याला ठार मारायचा आपसात विचार केला; पण शौलाला त्यांचा कट कळला. [२४]ते त्याला ठार मारायला दिवसा व रात्री वेशीवर टेहळणी करीत होते. [२५]पण शिष्यांनी त्याला रात्री नेले व पेटाऱ्यात घालून तटावरून खाली सोडले.

[२६]**तो यरुशलेमात आल्यानंतर** त्याने शिष्यांत मिसळण्याचा प्रयत्न केला. पण ते सगळे त्याला भीत होते, कारण तो एक शिष्य होता ह्यावर त्यांनी विश्वास ठेवला नव्हता. [२७]पण बर्णबाने त्याला घेऊन प्रेषितांकडे आणले, आणि त्याने वाटेत प्रभूला कसे बघितले, प्रभू त्याच्याशी कसा बोलला, आणि तो दिमिष्कात येशूच्या नावाने कसा धैर्याने बोलला हे त्याने त्यांना सविस्तर सांगितले. [२८]मग तो यरुशलेमात त्यांच्याबरोबर येत जात राहिला. [२९]तो प्रभूच्या नावाने धैर्याने बोलला, आणि त्याने हेल्लेणी यहुद्यांशी वादविवाद केला. पण ते त्याला मारायचा प्रयत्न करू लागले. [३०]हे बांधवांना समजले तेव्हा त्यांनी त्याला कैसरियास आणले, आणि तार्सला पाठवून दिले.

[३१]तेव्हा सर्व यहुदियात, गालिलात आणि शोमरोनात मंडळीला सर्वत्र स्वास्थ्य लाभून तिची उभारणी झाली आणि परमेश्वराच्या भयात व पवित्र आत्म्याच्या सांत्वनात ती पुढे जात असता बहुगुणित झाली.

[३२]**आणि असे झाले की,** पेत्र चहुकडे फिरत असता, लोद येथे रहात असलेल्या पवित्र जनांकडेही आला. [३३]तेथे त्याला ऐनियास नावाचा एक मनुष्य आढळला. तो आठ वर्षे आपले अंथरूण धरून होता आणि पक्षघाताने आजारी होता. [३४]आणि पेत्र त्याला म्हणाला,

"ऐनियास, येशू ख्रिस्त तुला बरं करीत आहे; ऊठ, तुझं अंथरूण नीट कर."

आणि तो लगेच उठला. [३५]आणि लोद व शारोन येथे राहणाऱ्या सर्वांनी त्याला बघितले व ते प्रभूकडे वळले.

[३६]**ह्यावेळी यापो येथे टबिया** (म्हणजे दुर्कस) नावाची एक शिष्या होती. ती करीत असलेल्या चांगल्या कामांत व परोपकारांत गढलेली असे. [३७]आणि असे झाले की, त्या दिवसांत ती आजारी झाली आणि मेली; आणि त्यांनी तिला स्नान घालून माडीवरच्या खोलीत ठेवले.

[३८]आणि यापोपासून लोद जवळ असल्यामुळे आणि पेत्र तेथे होता हे शिष्यांनी ऐकल्यामुळे त्यांनी त्याच्याकडे दोघा जणांस पाठवून त्याला विनंती केली की, 'तुम्ही आमच्याकडे विनाविलंब या.' [३९]तेव्हा पेत्र उठला आणि त्यांच्याबरोबर निघाला, आणि तो आला तेव्हा त्यांनी त्याला माडीवरच्या खोलीत नेले; आणि सर्व विधवा रडत त्याच्याजवळ उभ्या राहिल्या; आणि दुर्कस त्यांच्यात होती तेव्हा तिने केलेले झगे व अंगरखे त्याला दाखवू लागल्या.

[४०]पण पेत्राने त्या सर्वांना बाहेर काढले आणि गुडघे टेकून प्रार्थना केली; आणि शरिराकडे मागे वळून तो म्हणाला, 'टबिया, ऊठ'. तेव्हा तिने आपले डोळे उघडले आणि पेत्राला बघताच ती उठून बसली. [४१]तेव्हा त्याने तिला हात दिला आणि उठवले. मग त्याने पवित्र जनांना आणि विधवांना आत बोलवून तिला जिवंत सादर केले. [४२]हे सर्व यापोत माहीत झाले आणि पुष्कळांनी प्रभूवर विश्वास ठेवला.

[४३]आणि असे झाले की, तो यापो येथे कातडी कमावणाऱ्या शिमोनाजवळ पुष्कळ दिवस राहिला.

# १०

**आणि कैसरियात कर्नेल्यस** नावाचा एक मनुष्य होता. तो 'इटलिक पलटण' म्हटलेल्या एका पलटणीचा शतपती होता. [२]तो एक धार्मिक मनुष्य असून तो व त्याच्या घरचे सर्व जण देवाचे भय धरणारे होते. तो लोकांना पुष्कळ दाने देत असे व देवाची नित्य प्रार्थना करीत असे. [३]आणि, त्याला दिवसाच्या नवव्या तासाच्या सुमारास, दृष्टान्तात असे दिसले की, देवाचा एक दूत त्याच्याकडे आला आणि त्याला म्हणाला,

"कर्नेल्यस,"

[४]तेव्हा त्याने त्याच्याकडे टक लावली आणि तो भयभीत होऊन म्हणाला,

"प्रभू, काय आहे?"

आणि तो त्याला म्हणाला,

"तुझ्या प्रार्थना आणि दयेच्या देणग्या वर देवासमोर स्मरणात आल्या आहेत. [५]आणि, आता कुणाला यापोला धाड, आणि शिमोन नावाच्या मनुष्याला बोलाव; त्याचं दुसरं नाव पेत्र आहे. [६]तो कातडी कमावणाऱ्या शिमोनाच्या घरी उतरला आहे. त्याचं घर समुद्राच्या किनाऱ्याजवळ आहे."

[७]मग, त्याच्याशी बोलणारा देवदूत गेल्यावर, त्याने त्याच्या दोन नोकरांना आणि त्याच्या तैनातीत राहणाऱ्या एका धार्मिक शिपायाला बोलावले; [८]आणि त्यांना सर्व गोष्टी सांगून त्याने त्यांना यापोस पाठवले.

[९]दुसऱ्या दिवशी ते आपल्या मार्गाने प्रवास करून, त्या नगराच्या जवळ येत असता, पेत्र सहाव्या तासाच्या

सुमारास प्रार्थना करायला धाब्यावर गेला. १०आणि त्याला
फार भूक लागली होती व त्याची जेवायची इच्छा होती;
पण ते तयारी करीत असता तो तंद्रीत गेला ११आणि त्याने
पाहिले की, आकाश उघडले, आणि जणू मोठ्या झोळीसारखे, चार कोपरे बांधून पृथ्वीवर सोडलेले एक
पात्र त्याच्यापुढे उतरले. १२त्यात पृथ्वीवरील सगळ्या
प्रकारचे चतुष्पाद प्राणी, आणि सरपटणारे जीव, आणि
आकाशातील पक्षी होते. १३आणि त्याला बोलण्याचा
आवाज आला,

"पेत्रा, ऊठ, मार आणि खा."

१४पण पेत्र म्हणाला,

"नको, प्रभू, कारण मी कधीच, काही निषिद्ध किंवा अशुद्ध खाल्लेलं नाही."

१५आणि त्याला पुन्हा, दुसऱ्या वेळी, तो आवाज आला,

"देवानं शुद्ध केलं आहे त्याला निषिद्ध मानू नको."

१६असे तीनदा झाले, आणि ते पात्र पुन्हा आकाशात घेतले गेले.

१७आता, पेत्राला जो दृष्टान्त दिसला होता त्याचा
अर्थ काय असावा असा तो मनात विचार करीत असता,
बघा, कर्नेल्यसाने धाडलेले इसम शिमोनाचे घर शोधीत
फाटकाजवळ आले होते. १८आणि त्यांनी हाक मारून
विचारले की,

"इकडे कोणी शिमोन पाहुणे आलेत काय? त्यांना पेत्र म्हणतात."

१९पण पेत्र त्या दृष्टान्तावर विचार करीत असता आत्मा त्याला म्हणाला,

"बघ, तीन इसम तुला शोधीत आहेत. २०म्हणून ऊठ,
खाली उतर, आणि कशाचा संशय न धरता त्यांच्याबरोबर
जा; कारण मी त्यांना पाठवलं आहे."

२१तेव्हा पेत्र त्या इसमांकडे खाली गेला आणि त्यांना म्हणाला,

"बघा, तुम्ही ज्याला शोधीत आहा तो मी आहे, तुमच्या येण्याचं कारण काय?"

२२आणि ते म्हणाले,

"शतपती कर्नेल्यस एक नीतिमान मनुष्य असून देवाला भिणारे आहेत; आणि यहुद्यांच्या सर्व राष्ट्रांत त्यांची ग्वाही दिली जाते. त्यांना पवित्र देवदूताकडून अशी सूचना मिळाली की, त्यांनी आपल्याला घरी बोलवून आपली वचनं श्रवण करावीत."

२३मग त्याने त्यांना बोलवून त्यांचा पाहुणचार केला आणि दुसऱ्या दिवशी तो त्यांच्याबरोबर निघाला; आणि यापोतले काही बंधू त्याच्याबरोबर गेले.

२४आणि दुसऱ्या दिवशी ते कैसरियात आले तेव्हा
कर्नेल्यस त्यांची वाट पहात होता, आणि त्याने आपल्या
नातलगांना व जवळच्या मित्रांना एकत्र बोलावले होते.
२५आणि पेत्र आत येत होता तेव्हा कर्नेल्यस त्याला
भेटला, त्याच्या पायांशी पालथा पडला व त्याने त्याला
नमन केले. २६पण पेत्राने त्याला वर उचलून म्हटले,

"उभे रहा; कारण मीपण एक मनुष्य आहे."

२७मग तो त्याच्याशी बोलत असता तसाच आत गेला; आणि तेथे पुष्कळ जण जमले होते हे त्याला दिसले.

२८तेव्हा तो त्याला म्हणाला,

"आपण जाणता की, यहुदी मनुष्यानं परराष्ट्रीय
मनुष्याशी संबंध ठेवणं किंवा त्याच्याकडे येणं हे त्याला
कसं निषिद्ध आहे; पण देवानं मला दाखवलं की, मी
कोणाही मनुष्याला निषिद्ध किंवा अशुद्ध मानू नये.
२९म्हणून मला बोलावलं तेव्हाच मी काही एक हरकत न
घेता आलो; आणि म्हणून मी विचारतो की, आपण मला
कोणत्या हेतूनं बोलावलं आहे?"

३०तेव्हा कर्नेल्यस म्हणाला,

"मी चार दिवसांपूर्वी सुमारे ह्याच घटकेला म्हणजे
नवव्या ताशी, माझ्या घरात प्रार्थना केली, आणि बघा,
एक मनुष्य झगझगीत वस्त्रांत माझ्यापुढं उभा होता.
३१आणि तो म्हणाला, 'कर्नेल्यस, तुझी प्रार्थना ऐकलेली
आहे, आणि तुझ्या दयेच्या देणग्या देवाच्या दृष्टीपुढं
स्मरणात आणल्या गेल्या आहेत. ३२म्हणून कोणाला
यापोला धाड, आणि शिमोनाला इकडे बोलाव; त्याचं
दुसरं नाव पेत्र आहे. तो समुद्राच्या किनाऱ्याजवळ,
कातडी कमावणाऱ्या शिमोनाच्या घरी उतरला आहे.'
३३म्हणून, लगेच, मी आपल्याला बोलावणं धाडलं आणि
आपण आलात हे बरं केलं म्हणून प्रभूनं ज्या गोष्टींविषयी
आपल्याला आज्ञा दिली आहे, त्या सर्व ऐकायला आम्ही
सर्व जण आता देवासमोर उपस्थित आहोत."

३४तेव्हा पेत्राने तोंड उघडले आणि म्हटले,

"मला हे सत्य दिसत आहे की, देव पक्षपाती नाही.
३५पण प्रत्येक राष्ट्रातील जो कोणीही त्याला भितो आणि
नीती आचरतो तो त्याला मान्य आहे. ३६त्यानं
इस्राएलाच्या वंशजांकडे आपलं वचन पाठवलं, आणि

येशू ख्रिस्ताच्या द्वारे शांतीच्या सुवार्तेची घोषणा केली. तो सर्वांचा प्रभू आहे. [३७]योहानानं गाजविलेल्या बाप्तिस्म्यानंतर जी गोष्ट गालिलापासून सुरू होऊन सर्व यहुदियात झाली ती तुम्हाला माहीत आहे. [३८]देवानं कसा नासरेथच्या येशूला पवित्र आत्म्यानं आणि सामर्थ्यानं अभिषेक केला! तो चांगल्या गोष्टी करीत, आणि सैतानाकडून जे जाचले जात होते त्या सर्वांना बरं करीत फिरला; कारण देव त्याच्याबरोबर होता.

[३९]"आणि त्यानं यहुद्यांच्या प्रांतात आणि यरुशलेमात जे सर्व केलं त्याचे आम्ही साक्षी आहो. त्यांनी त्याला झाडावर टांगून मारलं. [४०-४१]देवानं त्याला तिसऱ्या दिवशी उठवलं आणि, सर्व लोकांना नाही, पण देवानं ज्यांना आधीपासून निवडलं होतं अशा साक्षींना म्हणजे आम्हाला प्रगट होऊ दिलं; आणि तो मेलेल्यांतून पुन्हा उठल्यावर आम्ही त्याच्याबरोबर खात पीत होतो. [४२]आम्ही लोकांना त्याची घोषणा करावी आणि देवानं निवडलेला, जिवंतांचा आणि मृतांचा न्यायाधीश हाच आहे अशी निक्षून साक्ष द्यावी, अशी आम्हाला आज्ञा दिली. [४३]सर्व संदेष्टे त्याच्याविषयी साक्ष देतात की, जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्या प्रत्येकाला त्याच्या नावाद्वारे क्षमा मिळेल."

[४४]**आणि, पेत्र हे शब्द बोलत** असता ज्या सर्वांनी वचन ऐकले त्यांच्यावर पवित्र आत्मा उतरला. [४५]आणि सुनत झालेल्यांपैकी जे विश्वास ठेवणारे लोक पेत्राबरोबर आले होते ते चकित झाले; कारण, पवित्र आत्म्याच्या दानाचा वर्षाव परजनांवरही झाला होता; [४६]कारण, ते अन्य भाषांत बोलून, देवाला थोरवी देत होते हे त्यांनी ऐकले. तेव्हा पेत्राने उत्तर दिले,

[४७]"आपल्याप्रमाणं ज्या ह्यांना पवित्र आत्मा मिळाला आहे त्यांचा बाप्तिस्मा केला जाऊ नये म्हणून कोणी पाणी मना करू शकेल काय?"

[४८]आणि त्याने आज्ञा दिली की, येशू ख्रिस्ताच्या नावात त्यांचा बाप्तिस्मा केला जावा. मग त्याने काही दिवस रहावे म्हणून त्यांनी त्याला विनंती केली.

११ आणि प्रेषितांनी व यहुदियातील बांधवांनी ऐकले की, परजनांनीही देवाचे वचन स्वीकारले आहे. [२]आणि पेत्र यरुशलेमास वर आला तेव्हा जे सुनत झालेल्यांपैकी होते त्यांनी त्याच्याशी वाद करून [३]म्हटले,

"तू बेसुनत लोकांत गेलास आणि त्यांच्याबरोबर जेवलास."

[४]पण पेत्राने प्रारंभ करून त्यांना क्रमाने स्पष्टीकरण करून म्हटले,

[५]"मी यापो नगरात प्रार्थना करीत होतो; आणि मी माझ्या तंद्रीत एक दृष्टान्त बघितला; आकाशातून जणू एखाद्या मोठ्या झोळीसारखं, चार कोपऱ्यांनी खाली सोडलेलं एक पात्र खाली उतरलं, आणि माझ्यापुढं आलं. [६]मी तिकडे टक लावून ते न्याहाळलं, आणि पृथ्वीवरचे चतुष्पाद प्राणी, रानातले पशू, सरपटणारे जीव आणि आकाशातील पक्षी मला दिसले. [७]आणि माझ्याशी बोलणारा एक आवाज मी ऐकला, 'पेत्रा, ऊठ, मार आणि खा.' [८]पण मी म्हणालो, 'नको, प्रभू, कारण माझ्या मुखात कधीच काही निषिद्ध किंवा अशुद्ध गेलेलं नाही.' [९]पण तो आवाज दुसऱ्या वेळी, आकाशातून मला म्हणाला, 'देवानं शुद्ध केलं आहे त्याला निषिद्ध मानू नको.' [१०]आणि हे तीनदा झालं, आणि पुन्हा सगळं आकाशात घेतलं गेलं.

[११]"आणि बघा, त्याच वेळी, कैसरियाहून माझ्याकडे धाडलेले तीन इसम मी होतो त्या घराजवळ उभे राहिले होते. [१२]आणि आत्मा मला म्हणाला, 'तू कशाचा संशय न धरता त्यांच्याबरोबर जा.' आणखी हे सहा बंधू माझ्याबरोबर आले, आणि आम्ही त्या मनुष्याच्या घरात गेलो. [१३]त्यानं आम्हाला सांगितलं की, त्याला एक देवदूत त्याच्या घरात उभा असलेला दिसला होता; आणि तो म्हणाला, 'तू कुणाला यापोला पाठव आणि शिमोनाला बोलाव. त्याचं दुसरं नाव पेत्र आहे. [१४]तो जी वचनं तुला सांगेल त्यांकडून तुझं, आणि तुझ्या सगळ्या घराण्याचं तारण होईल.' [१५]आणि मी बोलू लागताच पवित्र आत्मा जसा प्रारंभी आपल्यावर उतरला तसाच त्यांच्यावर उतरला.

[१६]"तेव्हा प्रभूनं जे म्हटलं होतं की, 'योहान खरोखर पाण्यानं बाप्तिस्मा करी, पण तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्यानं केला जाईल,' ते त्याचं वचन मला आठवलं. [१७]आपण प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला तेव्हा देवानं आपल्याला दिलं तसंच दान जर त्यांना दिलं, तर मी देवाला अडवू शकेन असा मी कोण?"

[१८]त्यांनी जेव्हा ह्या गोष्टी ऐकल्या तेव्हा ते स्तब्ध
राहिले व देवाचे गौरव करून म्हणाले,

"तर मग देवानं परजनांनाही जीवनासाठी पश्चात्ताप
दिला आहे."

[१९]**आता स्तेफनावरून जे संकट** उद्भवले त्यामुळे
जे पांगले होते ते फेनिकेपर्यंत, कुप्रापर्यंत आणि
अंत्युखियापर्यंत केवळ यहुद्यांना वचनाची सुवार्ता सांगत
गेले; त्यांनी त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणाला ती सांगितली
नाही. [२०]पण त्यांच्यात काही कुप्राचे व कुरेनेचे लोक होते.
ते अंत्युखियास आल्यावर हेल्लेण्यांशी बोलले व त्यांनी
त्यांना प्रभू येशूची सुवार्ता सांगितली. [२१]आणि प्रभूचा हात
त्यांच्याबरोबर होता; आणि विश्वास ठेवणारा एक मोठा
गट प्रभूकडे वळला. [२२]त्यांच्याविषयीची ही बातमी
यरुशलेमच्या मंडळीच्या कानी आली; आणि त्यांनी
बर्णबाला अंत्युखियाला पाठवून दिले. [२३]तो आला व
त्याने देवाची कृपा बघितली तेव्हा त्याने आनंद केला व
त्यांनी मनाच्या निर्धाराने प्रभूला धरून रहावे म्हणून त्यांना
सर्वांना बोध केला. [२४]कारण तो चांगला मनुष्य होता व
पवित्र आत्म्याने आणि विश्वासाने भरलेला होता; आणि
पुष्कळ लोक प्रभूकडे मिळवले गेले.

[२५]मग बर्णबा शौलाचा शोध करायला तार्सला गेला.
[२६]आणि त्याचा शोध लागल्यावर त्याने त्याला
अंत्युखियास आणले; आणि असे झाले की, ते वर्षभर
मंडळीत मिसळले व त्यांनी पुष्कळ लोकांना शिकवले;
आणि शिष्यांना ख्रिस्ती हे नाव अंत्युखियात प्रथम
मिळाले.

[२७]**आणि त्या दिवसांत** यरुशलेमहून खाली
अंत्युखियात संदेष्टे आले, [२८]आणि त्यांच्यातील अगब
नावाचा एक जण उठला व आत्म्याच्या योगे त्याने प्रगट
केले की, सर्व जगभर मोठा दुष्काळ उद्भवेल. (हा
क्लौदियसच्या काळात आला.) [२९]तेव्हा शिष्यांनी,
प्रत्येकाने आपल्या शक्तीप्रमाणे, यहुदियात राहणाऱ्या
बांधवांसाठी मदत धाडायचे ठरवले. [३०]त्यांनी तसे केले,
आणि त्यांनी ती बर्णबा व शौल ह्यांच्या हाती तिकडील
वडिलांकडे पाठवली.

**१२** **आता, त्या काळात, हेरोद राजाने**
मंडळीतल्या काहींना त्रास द्यायला त्यांच्यावर
आपले हात टाकले. [२]त्याने योहानाचा भाऊ याकोब ह्याला
तरवारीने ठार मारले [३]आणि यहुदी खुश झालेत हे
बघितल्यावर तो पेत्रालाही धरायला सरसावला. (त्यावेळी
बेखमीर भाकरीचे दिवस होते.) [४]आणि त्याने त्याला
धरल्यावर तुरुंगात ठेवले; आणि त्याच्यावर पहारा
ठेवायला त्याला शिपायांच्या चार चौकड्यांच्या स्वाधीन
केले, आणि वल्हांडण सणानंतर तो त्याला लोकांपुढे
आणू इच्छीत होता. [५]म्हणून पेत्राला तुरुंगात ठेवण्यात
आले होते, पण त्याच्यासाठी मंडळीकडून आस्थेने
देवाला प्रार्थना होत होती.

[६]आणि जेव्हा हेरोद त्याला बाहेर आणणार होता
त्याच रात्री, दोन साखळ्यांनी जखडलेला पेत्र दोन
शिपायांच्या मधोमध निजला होता, आणि दारापुढे
पहारेकरी तुरुंगावर पहारा करीत होते. [७]आणि बघा,
परमेश्वराचा दूत त्याच्याजवळ आला आणि त्या खोलीत
प्रकाश प्रकाशला. त्याने पेत्राला कुशीवर मारून जागे केले
आणि म्हटले,

"लवकर ऊठ."

आणि त्याच्या साखळ्या हातांवरून गळून पडल्या.
[८]तेव्हा देवदूत त्याला म्हणाला,

"कमरबंद बांध, आणि तुझ्या वहाणांचे बंद बांध."

आणि त्याने तसे केले. मग तो त्याला म्हणतो,

"तुझा अंगरखा चढव, आणि माझ्या मागोमाग ये."

[९]तेव्हा तो बाहेर आला व त्याच्या मागोमाग गेला. तेव्हा
देवदूताकडून जे केले गेले ते खरे होते हे त्याला कळले
नव्हते, पण त्याला वाटत होते की, तो एक स्वप्न पहात
होता. [१०]त्यांनी पहिला व दुसरा पहारा ओलांडल्यावर ते
नगरात नेणाऱ्या लोखंडी दरवाजापर्यंत आले तेव्हा तो
त्यांच्यापुढे आपोआप उघडला, ते बाहेर आले व एका
रस्त्यावरून पार गेले; आणि लगेच देवदूत त्याला सोडून
गेला. [११]मग पेत्र भानावर येऊन म्हणाला,

"आता मला खरोखर समजलं की, प्रभूनं आपल्या
दूताला पाठवून, हेरोदाच्या हातून आणि यहुदी प्रजेच्या
साऱ्या अपेक्षेतून माझी सुटका केली आहे."

[१२]हे त्याला उमगताच तो मरियेच्या घरी आला. ती
ज्याला मार्क म्हणत त्या योहानाची आई होती. तेथे
पुष्कळ लोक एकत्र जमले होते व प्रार्थना करीत होते.
[१३]आणि त्याने फाटकाच्या दारावर ठोकले, तेव्हा रुदा

नावाची मुलगी तेथे कानोसा घ्यायला आली; [१४]तिने पेत्राचा आवाज ओळखला तेव्हा तिने आनंदामुळे फाटक उघडले नाही, पण ती आत पळाली, आणि पेत्र फाटकासमोर उभा आहे असे तिने सांगितले. [१५]तेव्हा ते म्हणाले,

"तू वेडी आहेस."

पण ती ठामपणे म्हणत राहिली की, तोच तो आहे. तेव्हा ते म्हणाले,

"तो त्याचा देवदूत आहे."

[१६]आणि पेत्र ठोकीत राहिला; आणि त्यांनी उघडल्यावर त्याला बघितले तेव्हा ते चकित झाले; [१७]पण त्यांनी शांत रहावे म्हणून त्याने त्यांना हाताने खुणावले, आणि प्रभूने त्याला कसे तुरुंगातून बाहेर आणले हे त्याने त्यांना सविस्तर सांगितले, आणि म्हटले,

"तुम्ही जा, आणि ह्या गोष्टी याकोबाला आणि बांधवांना सांगा. "

मग तो निघाला आणि दुसऱ्या ठिकाणी गेला.

[१८]आता दिवस उगवला तेव्हा शिपायांत मोठी खळबळ झाली की, पेत्राचे काय झाले? [१९]आणि हेरोदाने त्याचा शोध केल्यावर तो त्याला सापडला नाही, तेव्हा त्याने पहारेकऱ्यांची चौकशी केली आणि त्यांना ठार मारायची आज्ञा दिली. आणि तो यहुदियातून कैसरियाला गेला व तेथे राहिला.

[२०]आता तो सोर व सिदोन येथील रहिवाश्यांवर चिडला होता. म्हणून ते एकमताने त्याच्याकडे आले, आणि राजाचा कारभारी ब्लस्तस ह्याला वश करून घेऊन त्यांनी समेटाची याचना केली; कारण राजाच्या देशावर त्यांच्या देशाचा निर्वाह होत होता. [२१]मग एका ठरवलेल्या दिवशी हेरोदाने आपली राजवस्त्रे चढवली, तो आपल्या राजासनावर बसला व त्याने त्यांच्यापुढे भाषण केले. [२२]तेव्हा लोक ओरडून म्हणाले,

"ही देवाची वाणी आहे, मनुष्याची नाही."

[२३]आणि लगेच परमेश्वराच्या दूताने त्याच्यावर प्रहार केला, कारण त्याने देवाला गौरव दिले नाही; त्याला किड्यांनी खाल्ले व त्याने प्राण सोडला.

[२४]पण देवाचे वचन वाढत गेले व बहुगुणित झाले. [२५]आणि बर्णबा व शौल हे आपली सेवा पुरी करून यरुशलेमहून परतले, आणि ते ज्याला मार्क म्हणत त्या योहानाला त्यांनी आपल्याबरोबर घेतले.

## १३

आता, **अंत्युखियातील** मंडळीत काही शिक्षक व संदेष्टे होते. त्यांच्यात बर्णबा, ज्याला निगर म्हणत तो शिमोन, कुरेनेचा लुकियस, मांडलिक हेरोदाच्या बाळपणी त्याच्याबरोबर वाढलेला मनाएन, आणि शौल हे होते. [२]ते परमेश्वराची उपासना व उपास करीत असता पवित्र आत्मा त्यांना म्हणाला,

"मी ज्या कामासाठी बर्णबा आणि शौल ह्यांना बोलावलं आहे त्यासाठी त्यांना माझ्याकरता वेगळे करा."

[३]तेव्हा उपास व प्रार्थना केल्यावर त्यांनी त्यांच्यावर हात ठेवले आणि त्यांना लावून दिले.

[४]**म्हणून, पवित्र आत्म्याने** रवानगी केलेले असे ते सलुकियाकडे निघाले, आणि तेथून कुप्राकडे गलबताने निघाले. [५]आणि ते सलमीनात होते त्यावेळी त्यांनी यहुद्यांच्या सभास्थानात देवाच्या वचनाची घोषणा केली. आणि त्यांच्याबरोबर योहानही सेवा करायला होता. [६]आणि त्यांनी पफेपर्यंत बेट ओलांडले. तेव्हा त्यांना एक जादुगार भेटला; तो एक खोटा संदेष्टा असून तो यहुदी होता व त्याचे नाव बर्येशू होते. [७]तो ज्याच्याजवळ होता तो सिर्ग्यस पौल तेथे सुभेदार असून तो एक बुद्धिवान मनुष्य होता. त्याने बर्णबा व शौल ह्यांना बोलवून देवाचे वचन ऐकायची अपेक्षा केली. [८]पण अलूम जादूगार (ह्या अर्थाचेच ह्याचे नाव आहे) हा सुभेदाराला विश्वासापासून फिरवू पाहण्यास त्यांच्याविरुद्ध उभा राहिला. [९]तेव्हा शौल (ऊर्फ पौल) हा पवित्र आत्म्याने भरला आणि त्याने त्याच्याकडे टक लावून [१०]म्हटले,

"अरे, सर्व कपटानं आणि सर्व कुयुक्तीनं भरलेल्या, सैतानपुत्रा, सर्व नीतिमत्वाच्या वैऱ्या, तू प्रभूचे सरळ मार्ग विपरीत करणं कधी थांबवणार नाहीस काय? [११]आणि आता बघ, प्रभूचा हात तुझ्यावर आहे, आणि तू अंधळा होशील आणि काही काळ सूर्य पाहणार नाहीस."

[१२]आणि लगेच त्याच्यावर धुके आणि अंधार येऊन, त्याला हाताने धरून न्यावे म्हणून, तो इकडे तिकडे, कोणाला तरी शोधीत जाऊ लागला. आणि प्रभूविषयीच्या शिक्षणाने सुभेदार थक्क झाला असल्यामुळे, त्याने हे जे झाले ते बघितले तेव्हा त्याने विश्वास ठेवला.

[१३]**मग पौल व त्याचे सोबती** हे पफेहून गलबताने निघून पंफुलियासमोर पिर्ग्यास आले, आणि योहान त्यांच्याजवळून निघून यरुशलेमास परत गेला. [१४]पण ते

पिर्ग्याहून निघाल्यावर पिसिदियातील अंत्युखियास आले व शब्बाथ दिवशी सभास्थानात जाऊन बसले. १५मग नियमशास्त्रातील व संदेष्ट्यांतील वाचन झाल्यावर सभास्थानाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना निरोप पाठवून म्हटले,

"अहो बंधूंनो, तुमच्याजवळ लोकांसाठी काही बोधपर वचन असल्यास तुम्ही बोला."

१६तेव्हा पौल उभा राहिला, आणि त्याने हाताने खुणावल्यावर तो म्हणाला,

"अहो इस्राएलाच्या लोकांनो, आणि देवाचं भय धरणाऱ्यांनो, माझं ऐका. १७ह्या इस्राएल लोकांच्या देवानं आमच्या पूर्वजांना निवडलं. ते लोक मिसर देशात परके म्हणून राहिले असता त्यानं त्यांना मोठं केलं, आणि आपल्या उभारलेल्या बाहूनं त्यांना तेथून बाहेर आणलं. १८त्यानं अरण्यात, सुमारे चाळीस वर्षांच्या काळात त्यांची वागणूक सहन केली. १९आणि कनान देशातील सात राष्ट्रांना नष्ट केल्यावर त्यानं त्यांचा देश त्यांना वतन म्हणून सुमारे साडेचारशे वर्षं दिला. २०त्यानंतर शमुवेल संदेष्ट्यापर्यंत त्यानं त्यांना न्यायाधीश दिले.

२१"मग त्यांनी राजा मागितला, आणि देवानं त्यांना किशाचा पुत्र शौल हा बन्यामिनाच्या वंशातला मनुष्य चाळीस वर्षांपर्यंत दिला. २२आणि त्यानं त्याला दूर केलं तेव्हा त्यांचा राजा व्हायला दावीद उभा केला, आणि त्यानं त्याच्याविषयी साक्ष देऊन म्हटलं, 'इशायाचा पुत्र दावीद हा मला माझ्या मनासारखा मनुष्य मिळाला आहे; तो माझी सर्व इच्छा पूर्ण करील.' २३आणि देवानं वचनानुसार, ह्या मनुष्याच्या संतानातून, इस्राएलासाठी येशू हा तारणारा उभा केला; २४योहानानं त्याच्यापुढं इस्राएलाच्या सर्व प्रजेला पश्चात्तापाच्या बाप्तिस्म्याची आधी घोषणा केली होती. २५आणि योहान आपली धाव संपवीत आला असता त्यानं म्हटलं, 'मी कोण आहे असं तुम्हाला वाटतं? मी तो नाही. आणि बघा, माझ्या मागून एक येत आहे आणि त्याच्या पायांतल्या वहाणा सोडायला मी लायक नाही.'

२६"अहो बंधूंनो, अब्राहामाच्या संतानाचे तुम्ही वंशज, आणि जे देवाचे भय धरणारे तुमच्यात आहेत अशा तुमच्याकडे ह्या तारणाचं वचन पाठवलं गेलं आहे. २७कारण यरुशलेमात राहणाऱ्यांनी आणि त्यांच्या अधिकाऱ्यांनी त्याला न जाणून, आणि प्रत्येक शब्बाथ दिवशी वाचल्या जाणाऱ्या संदेष्ट्यांच्या घोषणाही न जाणून, त्यांनी त्याला दोषी ठरवून त्या पूर्ण केल्या; २८आणि मरणाच्या शिक्षेसाठी त्यांना काहीच कारण आढळलं नसता त्याला मरणाची शिक्षा द्यावी अशी त्यांनी पिलाताकडे मागणी केली. २९आणि त्याच्याविषयी जे लिहिलं होतं ते सगळं त्यांनी पूर्ण केल्यावर त्याला झाडावरून खाली काढलं आणि थडग्यात ठेवलं. ३०पण देवानं त्याला मेलेल्यांमधून उठवलं. ३१आणि जे त्याच्याबरोबर गालिलातून यरुशलेमास आले होते त्यांना तो पुष्कळ दिवस दिसला. ते आता लोकांना त्याचे साक्षी आहेत.

३२-३३"आम्ही तुम्हाला सुवार्ता सांगतो की, देवानं येशूला पुन्हा उठवून आमच्या पूर्वजांना दिलेलं वचन त्यांच्या मुलांकरता, म्हणजे आपल्याकरता, पूर्ण केलं आहे; कारण दुसऱ्या स्तोत्रातही लिहिलं आहे की,

'तू माझा पुत्र आहेस,
आज मी तुला जन्म दिला आहे.'

३४आणि त्यानं कुजण्याकडे परतू नये म्हणून त्यानं त्याला मेलेल्यांतून पुन्हा उठवलं; ह्याविषयी त्यानं असं म्हटलं आहे,

'मी दाविदाला दिलेले पवित्र आणि
विश्वसनीय आशीर्वाद तुम्हाला देईन.

३५म्हणून तो आणखी एका स्तोत्रात म्हणतो,

'तू आपल्या पवित्र पुरुषाला
कुजण्याचा अनुभव घेऊ देणार नाहीस.'

३६कारण दाविदानं देवाच्या इच्छेप्रमाणं आपल्या पिढीची सेवा केल्यावर तो निजला; त्याला त्याच्या पूर्वजांबरोबर ठेवलं आणि त्यानं कुजण्याचा अनुभव घेतला. ३७पण देवानं ज्याला पुन्हा उठवलं त्यानं कुजण्याचा अनुभव घेतला नाही.

३८"ह्यासाठी, अहो बंधूंनो, तुम्हाला हे विदित असो की, तुम्हाला ह्या मनुष्याद्वारे पापांच्या क्षमेची घोषणा केली जात आहे. ३९आणि मोशेच्या नियमशास्त्रानुसार तुम्ही ज्या गोष्टींपासून निर्दोषी ठरविले जाऊ शकणार नाही, त्या सर्व गोष्टींपासून ह्याच्या योगे विश्वास ठेवणारा प्रत्येक जण निर्दोषी ठरतो. ४०म्हणून जपा, नाहीतर, संदेष्ट्यांत जे सांगितलं आहे ते तुमच्यावर येईल,

४१'बघा, अवमान करणाऱ्यांनो,
आश्चर्य करा आणि नष्ट व्हा;
कारण तुमच्या दिवसांत मी एक
कार्य करीत आहे.

ते कार्य असे आहे की,
कोणी तुम्हाला त्याविषयी सांगितले,
तरी तुम्ही मुळीच विश्वास ठेवणार नाही.' "
[४२]आणि लोक बाहेर जात असता, त्यांनी
आपल्याला पुढच्या शब्बाथ दिवशी ह्या गोष्टी सांगण्यात
याव्यात अशी त्यांना विनंती केली. [४३]आता
सभास्थानातील मंडळी विखरल्यावर पुष्कळ यहुदी व
यहुदीय धर्मानुयायी पौल आणि बर्णबा ह्यांच्या मागोमाग
गेले. तेव्हा ते त्यांच्याशी बोलले आणि त्यांनी देवाच्या
कृपेत रहावे म्हणून त्यांनी त्यांचे मन वळवले.

[४४]**त्यानंतर आलेल्या शब्बाथ दिवशी** ते बहुतेक
सर्व गाव देवाचे वचन ऐकायला जमले. [४५]पण जेव्हा
यहुद्यांनी लोकांना बघितले तेव्हा ते ईर्ष्येने भरले आणि
पौल जे काही बोलला त्याला त्यांनी विरोध करून दुर्भाषण
केले.
[४६]तेव्हा पौल व बर्णबा धैर्याने बोलून त्यांना म्हणाले,
"देवाचं वचन प्रथम तुम्हाला सांगण्यात यावं हे
आवश्यक होतं; पण तुम्ही ते दूर लोटता आणि आपल्या
स्वतःला सनातन जीवनासाठी अयोग्य ठरवता, म्हणून
बघा, आम्ही परजनांकडे वळतो, [४७]कारण परमेश्वरानं
आम्हाला अशी आज्ञा दिली आहे,
'मी तुला परजनांना प्रकाश होण्यास,
पृथ्वीच्या शेवटच्या भागापर्यंत
तारणासाठी ठेवले आहे.' "
[४८]आणि परजनांनी हे ऐकले तेव्हा ते आनंदित झाले आणि
परमेश्वराच्या वचनाचे गौरव करू लागले; आणि जितके
सनातन जीवनासाठी नेमलेले होते त्यांनी विश्वास ठेवला.
[४९]आणि परमेश्वराचे वचन त्या संपूर्ण प्रांतात नेले गेले.
[५०]पण यहुद्यांनी प्रतिष्ठित भक्तिशील स्त्रियांना व
नगरातील प्रमुख पुरुषांना चिथावले, त्यांनी पौल व बर्णबा
ह्यांचा छळ आरंभला व त्यांना आपल्या हद्दीतून बाहेर
घालवले. [५१]पण त्यांनी त्यांच्यापुढे आपल्या पायांची धूळ
झटकली आणि ते इकुन्यात आले. आणि शिष्य आनंदाने
व पवित्र आत्म्याने भरले.

## १४

**आणि इकुन्यात** असे झाले की, ते दोघे
जण यहुद्यांच्या सभास्थानात बरोबर गेले,
आणि असे बोलले की, यहुद्यांतील आणि हेल्लेण्यांतील
एका मोठ्या गटाने विश्वास ठेवला. [२]पण ज्यांनी विश्वास
ठेवला नाही अशा यहुद्यांनी परजनांना चिथावले आणि
बांधवांविषयी त्यांची मने कलुषित केली. [३]म्हणून ते तेथे
दीर्घकाळ राहिले व प्रभूविषयी धैर्याने बोलले; आणि त्याने
त्यांच्या हातून चिन्हे व अद्भुते होऊ देऊन आपल्या
कृपेच्या वचनाची साक्ष दिली.
[४]पण नगरातल्या लोकांत फूट पडली; काहींनी
यहुद्यांची आणि काहींनी प्रेषितांची बाजू घेतली. [५]आणि
जेव्हा परजनांकडून, आणि त्याचप्रमाणे यहुद्यांकडून व
त्यांच्या अधिकाऱ्यांकडून त्यांची हेलना करून त्यांना
दगडमार करण्याकरता उठाव झाला [६]तेव्हा ते त्यांना
समजले, आणि ते लुस्त्र व दर्बे ह्या लुकवनियातील नगरांत
व आसपासच्या प्रांतात पळून गेले [७]आणि तेथे त्यांनी
सुवार्ता सांगितली.
[८]तेव्हा लुस्त्रात एक मनुष्य बसलेला होता; तो पायांनी
अधू होता; तो आपल्या आईच्या उदरापासून पांगळा
होता, आणि कधीच चालला नव्हता. [९]तो पौलाचे बोलणे
ऐकत असता त्याने त्याच्याकडे टक लावली; आणि तो
बरा होईल असा विश्वास त्याच्यात आहे हे बघितले
[१०]तेव्हा तो त्याला मोठ्या आवाजात म्हणाला,
"तुझ्या पायांवर नीट उभा रहा."
तेव्हा त्याने उडी मारली व तो उठून चालला.
[११]आणि पौलाने काय केले हे लोकांनी बघितले तेव्हा
त्यांनी आपले आवाज चढवून लुकवनियाच्या भाषेत
म्हटले,
"आपल्यात देव माणसासारखे होऊन खाली
आलेत."
[१२]त्यांनी बर्णबाला बृहस्पती (जुपितर) म्हटले आणि
पौलाला बुध (मर्क्युरी) म्हटले कारण तो वक्ता होता.
[१३]तेव्हा नगरापुढील बृहस्पतीचा पुजारी बैल व माळा
घेऊन वेशीजवळ आला आणि त्याची लोकांबरोबर
बलिदान करायची इच्छा होती. [१४]हे बर्णबा व पौल ह्या
प्रेषितांनी ऐकले तेव्हा त्यांनी आपले कपडे फाडले व ते
लोकांमधून धावत धावत ओरडू लागले, आणि म्हणाले,
[१५]"गड्यांनो, तुम्ही हे का करता? आम्हीदेखील
तुमच्यासारख्या भावना असलेली माणसं आहोत; आणि
तुम्ही ह्या व्यर्थ गोष्टी सोडाव्यात. आणि ज्या जिवंत देवानं
आकाश, पृथ्वी आणि समुद्र, आणि त्यांतील सर्व गोष्टी
उत्पन्न केल्या त्याच्याकडे तुम्ही वळावं म्हणून तुम्हाला
सुवार्ता सांगतो. [१६]त्यानं सर्व राष्ट्रांना पूर्वीच्या दिवसांत

त्यांच्या मार्गांनी जाऊ दिलं. [१७]तरी त्यानं स्वतःला विनासाक्ष ठेवलं नाही; म्हणजे त्यानं उपकार केले; त्यानं तुम्हाला आकाशातून पाऊस दिला, आणि पीक देणारे ऋतू देऊन अन्नानं आणि आनंदानं तुमची मनं तृप्त केली."
[१८]आणि अशा बोलण्यांनी त्यांनी मोठ्या प्रयासाने लोकांना त्यांना बलिदान करण्यापासून आवरले.

[१९]तेव्हा तेथे अंत्युखियातून व इकुन्यातून यहुदी आले आणि लोकांचे मन वळवून त्यांनी पौलाला दगडमार केला आणि त्यांना तो मेला असे वाटून, त्यांनी त्याला नगराबाहेर ओढून नेले. [२०]पण शिष्य त्याच्याभोवती जमले तेव्हा तो उठून नगरात आला. मग दुसऱ्या दिवशी तो बर्णबाबरोबर दर्बेला गेला.

[२१]**आणि त्यांनी त्या नगरात** सुवार्ता सांगून पुष्कळ जणांना शिष्य केल्यावर ते पुन्हा लुस्त्रात, तेथून इकुन्यात, आणि तेथून अंत्युखियात परतून आले. [२२]त्यांनी शिष्यांचे जीव सुस्थिर केले आणि त्यांना विश्वासात टिकून राहण्यास उत्तेजन देऊन बोध केला की, आपण पुष्कळ दुःखामधून देवाच्या राज्यात प्रवेश केला पाहिजे. [२३]आणि त्यांनी त्यांच्यासाठी प्रत्येक मंडळीत वडील नेमल्यावर त्यांनी उपास करून प्रार्थना केली, आणि ज्या प्रभूवर त्यांनी विश्वास ठेवला होता त्याच्यावर त्यांनी त्यांना सोपवले.

[२४]मग त्यांनी पिसिदियामधून प्रवास केल्यावर ते पंफुलियास आले. [२५]आणि पिर्गा येथे वचन सांगितल्यावर ते अत्तालियास खाली गेले. [२६]आणि तेथून अंत्युखियास गलबताने गेले. त्यांनी पुऱ्या केलेल्या कामासाठी त्यांना तेथपासून देवाच्या कृपेवर निरवले होते. [२७]आणि ते आल्यावर त्यांनी सर्व मंडळी एकत्र जमवून देवाने त्यांच्यासाठी जे सर्व काही केले आणि त्याने परजनांसाठी विश्वासाचे दार कसे उघडले हे त्यांनी निवेदन केले. [२८]आणि ते तेथे शिष्यांबरोबर दीर्घकाळ राहिले.

## १५

**आणि यहुदियातून** खाली आलेले कित्येक जण बांधवांना शिकवू लागले की,

"मोशेनं लावलेल्या परिपाठानुसार तुमची सुनत झाल्याशिवाय तुमचं तारण होऊ शकणार नाही."

[२]आणि पौल व बर्णबा ह्यांचा त्यांच्याशी पुष्कळ मतभेद आणि वाद झाल्यावर त्यांनी असे ठरवले की, पौल व बर्णबा ह्या दोघांनी, आणि त्यांच्याबरोबर इतर काही जणांनी ह्या प्रश्नासाठी प्रेषितांकडे आणि वडील वर्गाकडे यरुशलेमास जावे. [३]आणि मंडळीने त्यांना वाटेस लावल्यावर ते फेनिकेमधून व शोमरोनामधून जात असता ते परजनांच्या परिवर्तनाविषयी सांगत गेले, आणि त्यांनी सर्व बांधवांना मोठा आनंद घडवला. [४]आणि ते जेव्हा यरुशलेमास आले तेव्हा तेथील मंडळीने, प्रेषितांनी आणि वडिलांनी त्यांचे स्वागत केले; मग त्यांनी आपल्यासाठी देवाने जे काही केले होते ते सर्व त्यांना सांगितले, [५]पण परोश्यांच्या पंथापैकी ज्यांनी विश्वास ठेवला होता असे काही जण उठून म्हणाले,

"त्यांची सुनत करणं, आणि त्यांना मोशेचं नियमशास्त्र पाळायची आज्ञा करणं आवश्यक आहे."

[६]**मग ह्या गोष्टीवर विचार** करायला प्रेषित आणि वडील एकत्र जमले. [७]आणि पुष्कळ वादविवाद झाल्यावर पेत्र उठला व त्यांना म्हणाला,

"अहो बंधूंनो, तुम्ही जाणता की, देवानं पुष्कळ दिवसांपूर्वी तुमच्यामधून अशी निवड केली की, परजनांनी माझ्या तोंडून सुवार्तेचं वचन ऐकून विश्वास ठेवावा. [८]आणि जो देव अंतःकरणं जाणतो त्यानं त्यांना आपल्याप्रमाणंच पवित्र आत्मा देऊन त्यांच्याविषयी साक्ष दिली. [९]आणि त्यानं त्यांची अंतःकरणं विश्वासानं शुद्ध करून आपल्यात आणि त्यांच्यात भेद ठेवला नाही. [१०]म्हणून आता, आपले पूर्वज आणि आपण जे जू वाहू शकलो नाही, ते शिष्यांच्या मानेवर लादायला तुम्ही देवाची परीक्षा का करता? [११]पण आपण विश्वास ठेवतो की, जसे ते तसेच आपण प्रभू येशूच्या कृपेनं तारले जाऊ."

[१२]**तेव्हा सर्व लोक शांत राहिले** आणि बर्णबा व पौल हे देवाने आपल्याकडून परजनांत कोणकोणती चिन्हे व अद्भुते केली हे सांगत असता त्यांनी त्यांचे ऐकले.

[१३]त्यांचे बोलणे संपले तेव्हा याकोबाने उत्तर देऊन म्हटले,

"अहो बंधूंनो, माझं ऐका. [१४]देवानं आपल्या नावाकरता परजनांतून एक समाज काढायला प्रथम कशी त्यांची भेट घेतली हे शिमोनानं सांगितलं आहे. [१५]आणि ह्याच्याशी संदेष्ट्याचे शब्द जुळतात; कारण असं लिहिलं आहे की,

[१६]'ह्यानंतर मी परत येईन,
आणि दाविदाचा पडलेला डेरा
पुन्हा उभारीन,
मी त्याचे पडलेले भाग
पुन्हा उभारीन,
आणि तो नीट करीन
[१७]म्हणजे, शेष राहिलेल्यांनी
आणि ज्यांच्यावर माझं नाव घातलं आहे
अशा सर्व परजनांनी
परमेश्वराचा शोध करावा,
[१८]हे सर्व करणारा परमेश्वर हे म्हणतो.
तो हे युगादीपासून विदित करीत आहे.'

[१९]"म्हणून मी ठरवलं आहे की, जे लोक परजनांतून
देवाकडे वळले आहेत त्यांना आपण अस्वस्थ करू नये.
[२०]पण आपण त्यांना लिहावं की, मूर्तींचे विटाळ आणि
जारकर्म, मुरगळून मारलेले प्राणी आणि रक्त ह्यांपासून
त्यांनी दूर रहावं. [२१]कारण प्राचीन पिढ्यांपासून शब्बाथ
दिवशी सभास्थानांत मोशेचं वाचन करीत असल्यामुळं
प्रत्येक नगरात त्याची घोषणा करणारे आहेत."

[२२]तेव्हा सर्व मंडळीबरोबर प्रेषित आणि वडील
ह्यांना हे उचित वाटले की, पौल व बर्णबा ह्यांच्याबरोबर
आपल्यातील यहुदा ऊर्फ बर्सबा आणि सिला, ह्या
बांधवांमधील प्रमुख माणसांची निवड करून त्यांना
अंत्युखियास धाडावे. [२३]आणि त्यांनी त्यांच्या हस्ते अशा
प्रकारची पत्रे लिहिली:

प्रेषित आणि वडील ह्या बांधवांकडून;

अंत्युखिया, सूरिया व किलिकिया येथील
परजनांतील बांधवांस:

जयजय.

[२४]आम्ही असे ऐकले आहे की, आमच्यामधील
काही जणांनी, आम्ही त्यांना तशी आज्ञा दिली
नसताना, तुमचे जीव बुचकळ्यात पाडणाऱ्या
भाषणांनी तुम्हाला अस्वस्थ केले आहे. [२५-२६]म्हणून
आम्ही एकमताने ठरवले की, आपला प्रभू येशू
ख्रिस्त ह्याच्या नावाकरता ज्या माणसांनी आपले
जीव वाहिले आहेत, असे आमचे प्रिय बर्णबा व पौल
ह्यांच्याबरोबर आम्ही निवडलेल्या माणसांना धाडावे.
[२७]म्हणून आम्ही यहुदा व सिला ह्यांना पाठवले आहे.
ते आपल्या स्वतःच्या बोलण्यात ह्याच गोष्टी तुम्हाला
सांगतील. [२८]कारण पवित्र आत्म्याला व आम्हाला हे
उचित वाटले की, ह्या आवश्यक गोष्टींशिवाय
तुमच्यावर काही अधिक मोठे ओझे लादू नये; [२९]त्या
अशा की, मूर्तींना वाहिलेली अर्पणे, आणि रक्त व
मुरगळून मारलेले प्राणी, आणि जारकर्म ह्यांपासून
तुम्ही स्वतःला राखा. तुम्ही ह्यांतून स्वतःला राखाल
तर चांगले कराल.

जयजय.

[३०]मग त्यांनी त्यांना लावून दिल्यावर ते अंत्युखियास
आले, आणि त्यांनी लोकांना एकत्र जमवून ते पत्र दिले;
[३१]आणि त्यांनी ते वाचले, तेव्हा त्यातील उत्तेजनाने ते
आनंदित झाले.

[३२]यहुदा व सिला हे स्वतः संदेष्टे असल्यामुळे त्यांनी
पुष्कळ वचनांद्वारे बांधवांना बोध करून स्थिर केले.
[३३]आणि ते काही काळ तेथे राहिल्यावर ज्यांनी त्यांना
पाठविले होते त्यांच्याकडे बांधवांनी त्यांना शांतीने लावून
दिले. [३४-३५]पण पौल व बर्णबा हे दुसऱ्या कित्येक
जणांबरोबर अंत्युखियात शिकवीत व प्रभूच्या वचनाची
सुवार्ता सांगत राहिले.

[३६]आणि काही दिवसांनंतर पौल बर्णबाला
म्हणाला,

"आता आपण परत जाऊ या, आणि आपण ज्या
प्रत्येक नगरात प्रभूच्या वचनांची घोषणा केली तेथील
बांधवांची भेट घेऊन ते कसे आहेत हे पाहू या."
[३७]आणि ते ज्याला मार्क म्हणत त्या योहानाला बरोबर
घ्यावे, अशी बर्णबाची इच्छा होती. [३८]पण ज्याने त्यांना
पंफुलियापासून सोडले होते आणि जो त्यांच्याबरोबर काम
करायला गेला नाही, त्याला आता बरोबर घेणे पौलाला
बरे वाटले नाही. [३९]आणि त्यांच्यातली ईर्ष्या इतकी झाली
की, ते एकमेकांपासून वेगळे झाले. तेव्हा बर्णबाने
मार्काला घेतले व तो गलबताने कुप्राला गेला. [४०]मग
पौलाने सिलाची निवड केली, आणि बांधवांनी त्यांना
प्रभूच्या कृपेवर निरवल्यावर ते निघाले. [४१]आणि तो
सूरिया व किलिकिया प्रांतांतून मंडळ्यांना स्थिर करीत
गेला.

१६ मग तो खाली दर्बे व लुस्त्र येथे आला,
आणि बघा, तेथे एक शिष्य होता; त्याचे नाव

तिमथ्य होते. तो एका, विश्वास ठेवणाऱ्या यहुदी बाईचा
मुलगा होता, पण त्याचा बाप हेल्लेणी होता. २आणि
लुस्त्रात व इकुन्यात राहणाऱ्या सर्व बांधवांत त्याची ग्वाही
दिली जात होती. ३त्याने आपल्याबरोबर चलावे अशी
पौलाची इच्छा होती; आणि त्याने त्याला घेतले व त्या
ठिकाणच्या यहुद्यांमुळे त्याने त्याची सुनत केली; कारण
त्याचा बाप हेल्लेणी होता हे त्या सर्वांना माहीत होते.
४आणि त्या नगरातून प्रवास करताना त्यांनी त्यांना
यरुशलेममधील प्रेषितांनी आणि वडिलांनी जे निर्णय
ठरविले होते ते त्यांनी पाळावेत म्हणून नेमून दिले. ५आणि
त्यायोगे मंडळ्या विश्वासात स्थिर केल्या जाऊन दररोज
संख्येने वाढत होत्या.

६**आणि त्यांना पवित्र आत्म्याकडून** आसियात
वचन सांगण्यास प्रतिबंध झाल्यामुळे ते फ्रुगियाच्या व
गलतियाच्या सुभ्यामधून गेले; ७आणि मुसियापर्यंत
आल्यावर त्यांनी बिथुनियात जायचा प्रयत्न केला पण
येशूच्या आत्म्याने त्यांना जाऊ दिले नाही. ८तेव्हा ते
मुसियाजवळून पुढे जाऊन खाली त्रोवसास आले.
९आणि रात्री पौलाला एक दृष्टान्त दिसला;
मासेदोनियाचा एक मनुष्य उभा होता व त्याने त्याला
विनंती करून म्हटले,
"आमच्याकडे मासेदोनियास या आणि आम्हाला
साह्य करा."
१०आणि त्याने दृष्टान्त बघितला तेव्हा त्या लोकांना
सुवार्ता सांगण्यास देवाने आम्हाला बोलावले आहे असे
ठरवून आम्ही लगेच मासेदोनियास जायचा प्रयत्न केला.

११**मग आम्ही त्रोवसाकडून** गलबताने निघालो व
सरळ पल्ल्याने समथ्राकेस आलो; मग दुसऱ्या दिवशी
नियापलीस आलो, १२आणि तेथून फिलिपैस आलो. हे
मासेदोनियाच्या त्या भागातील एक प्रमुख नगर असून
वसाहतीचे ठाणे आहे. आम्ही ह्या नगरात काही दिवस
राहिलो. १३आणि शब्बाथ दिवशी, वेशीबाहेर, नदीच्या
किनाऱ्याजवळ, जेथे प्रार्थना करणे नियमशास्त्रानुसार होते
तेथे गेलो आणि बसलो व तेथे जमलेल्या स्त्रियांशी बोलू
लागलो. १४तेथे जांभळ्या वस्त्राचा व्यापार करणारी,
थुवतिरा नगरची, लुदिया नावाची एक बाई आमचे ऐकत
होती. ती देवाची उपासना करणारी होती. आणि पौलाच्या
बोलण्याकडे लक्ष देण्यास प्रभूने तिचे अंतःकरण उघडले.
१५मग तिचा व तिच्या घरच्यांचा बाप्तिस्मा झाला तेव्हा
तिने विनंती करून म्हटले,
"तुम्ही मला प्रभूवर विश्वास ठेवणारी मानता तर
माझ्या घरी येऊन रहा."
आणि तिने आम्हाला भाग पाडले.
१६आणि असे झाले की, आम्ही प्रार्थनेच्या जागेकडे
जात असता एक मुलगी आम्हाला भेटली; तिच्यात एक,
भविष्य सांगणारे भूत होते, आणि ती भविष्य सांगून
आपल्या धन्यांकडे पुष्कळ मिळकत आणीत असे. १७ती
पौलाच्या व आमच्या मागोमाग आली आणि ओरडून
म्हणाली,
"हे लोक परात्पर देवाचे दास आहेत; हे आपल्याला
तारणाचा मार्ग दाखवीत आहेत."
१८असे तिने पुष्कळ दिवस केले तेव्हा पौलाला वाईट
वाटले, आणि त्याने मागे फिरून भुताला म्हटले,
"मी तुला येशू ख्रिस्ताच्या नावानं आज्ञा करतो, तू
हिच्यामधून बाहेर नीघ."
आणि त्याच घटकेस ते तिच्यामधून बाहेर निघाले.

१९**आणि जेव्हा तिच्या धन्यांनी** बघितले की,
आपल्या मिळकतीची आशा गेली तेव्हा त्यांनी पौल व
सिला ह्यांना धरले व बाजारपेठेत अधिकाऱ्यांकडे नेले;
२०आणि त्यांना न्यायाधिशांपुढे आणले; आणि ते
म्हणाले,
"हे लोक यहुदी असून आमच्या नगराला फार त्रास
देत आहेत. २१आणि आम्ही रोमी आहोत म्हणून आम्ही
आमच्यात घेणं किंवा आचरणं योग्य नाही असे परिपाठ हे
शिकवीत आहेत."
२२तेव्हा लोक, एकजुटीने, त्यांच्याविरुद्ध उभे राहिले;
आणि न्यायाधिशांनी त्यांचे कपडे फाडून काढले व त्यांना
छड्यांनी फटके मारण्याची आज्ञा केली. २३मग त्यांना
पुष्कळ फटके लगावल्यावर त्यांनी त्यांना बंदिशाळेत
टाकले. आणि त्यांनी बंदिपालाला त्यांना सुरक्षितपणे
अटकेत ठेवायची आज्ञा दिली. २४त्याला अशी आज्ञा
मिळाल्यावर त्याने त्यांना आतल्या कोठडीत टाकले
आणि त्यांचे पाय खोड्यांत पक्के केले.
२५त्यानंतर मध्यरात्री पौल व सिला हे प्रार्थना करून
देवाची स्तोत्रे गात होते. आणि बंदिवान त्यांचे ऐकत होते.
२६तेव्हा अकस्मात् मोठा भूकंप झाला; त्यामुळे

बंदिशाळेचे पाये हादरले; आणि लगेच सर्व दारे उघडली व प्रत्येक जणाच्या बेड्या सुटल्या.

[२७]तेव्हा बंदिपाल झोपेतून उठला व बंदिशाळेची दारे उघडी बघून त्याने आपली तरवार उपसली व बंदिवान पळालेत असे समजून तो स्वतःला ठार करणार होता. [२८]पण पौल मोठ्या आवाजात ओरडून म्हणाला,

"स्वतःला अपाय करू नकोस. कारण आम्ही सगळे आत आहोत."

[२९]तेव्हा त्याने दिवा मागवून आत उडी घेतली आणि भयभीत होऊन तो पौल व सिला ह्यांच्यासमोर पडला. [३०]आणि त्याने त्यांना बाहेर आणल्यावर तो त्यांना म्हणाला,

"धनी, माझं तारण व्हावं म्हणून मी काय केलं पाहिजे?"

[३१]आणि ते म्हणाले,

"प्रभू येशूवर विश्वास ठेव, म्हणजे तुझं आणि तुझ्या कुटुंबाचं तारण होईल."

[३२]मग त्याला व त्याच्या घरातल्या सर्वांना त्यांनी प्रभूचे वचन सांगितले. [३३]आणि त्याने रात्रीच्या त्याच घटकेस त्यांना नेऊन त्यांचे वळ धुतले, आणि लगेच त्याने आणि त्याच्या सर्वांनी बाप्तिस्मा घेतला. [३४]आणि त्यांना आपल्या घरात आणून त्याने त्यांना जेवण वाढले; आणि हर्ष केला कारण त्याने व त्याच्या घरच्या सर्वांनी देवावर विश्वास ठेवला होता.

[३५]आणि सकाळ झाली तेव्हा न्यायाधिशांनी भालदारांना पाठवून निरोप दिला की, 'त्या माणसांना जाऊ दे.' [३६]बंदिपालाने हा निरोप पौलाला सांगितला,

"न्यायाधिशांनी तुम्हाला सोडायला निरोप पाठवला आहे; म्हणून आता बाहेर या आणि शांतीनं जा."

[३७]पण पौल त्याला म्हणाला,

"आम्ही रोमी आहोत, आणि त्यांनी आम्हाला दोषी ठरवल्याशिवाय, उघडपणे फटके मारून बंदिशाळेत टाकलं. आणि ते आता, गुप्त प्रकारे, आम्हाला घालवीत आहेत काय? मुळीच नाही; म्हणून त्यांनी स्वतः यावं आणि आम्हाला बाहेर काढावं."

[३८]तेव्हा भालदारांनी न्यायाधिशांना ह्या गोष्टी सांगितल्या. आणि हे रोमी आहेत हे त्यांनी ऐकले तेव्हा ते भ्याले. [३९]मग ते आले आणि त्यांनी त्यांना विनंती केली व बाहेर आणले. आणि, त्यांनी नगर सोडून जावे म्हणून याचना केली. [४०]मग ते बंदिशाळेतून बाहेर निघाले आणि लुदियेच्या घरी आले; त्यांनी बांधवांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले आणि ते निघाले.

१७ आणि त्यांनी अंफिपुलीमधून व अपुल्लोनियामधून प्रवास केल्यावर ते थेसलनिकेस आले; तेथे यहुद्यांचे सभास्थान होते. [२]तेव्हा पौल त्याच्या परिपाठाप्रमाणे तेथे त्यांच्यात जाऊ लागला. आणि त्याने तीन शब्बाथवारी, त्यांच्याबरोबर, शास्त्रलेखांवरून वादविवाद केला. [३]त्याने उलगडा करून प्रतिपादन केले की, ख्रिस्ताने सोसणे व मेलेल्यांतून पुन्हा उठणे हे अगत्य होते, 'आणि मी ज्या येशूची तुम्हाला घोषणा करतो तो ख्रिस्त आहे.' [४]आणि त्यांच्यातील काहींनी हे मानले व ते पौल आणि सिला ह्यांच्याकडे वळले. त्यांच्याबरोबर भक्तिमान हेल्लेण्यांतील एक मोठा गट होता, आणि प्रमुख स्त्रियांतीलही थोड्या नव्हत्या.

[५]पण यहुद्यांनी ईर्ष्येने प्रेरित होऊन खालच्या थरांतील टवाळ लोकांना जवळ घेतले, आणि घोळका जमवून त्यांनी नगरात गलबला केला व यासोनाच्या घरावर हल्ला करून, त्यांना लोकांत बाहेर आणण्याचा प्रयत्न केला. [६]आणि ते आढळले नाहीत तेव्हा त्यांनी यासोनाला व काही बंधूंना नगरन्यायाधिशांपुढे ओढून आणले आणि ते ओरडून म्हणाले,

"जगाची उलथापालथ करणारे हे लोक इथं पण आले आहेत, [७]आणि यासोनानं त्यांना घरात घेतलं आहे. हे सगळे जण असं सांगतात की, येशू म्हणून एक दुसरा राजा आहे, आणि हे कैसराच्या नियमाविरुद्ध वागतात."

[८]आणि त्यांनी ह्या गोष्टी ऐकल्यावर त्यांनी लोकांना व न्यायाधिशांना अस्वस्थ केले; [९]आणि त्यांनी यासोनाकडून व इतरांकडून जामीन घेतल्यावर त्यांना जाऊ दिले.

[१०]लगेच बांधवांनी पौल व सिला ह्यांना रात्री बिरुयाकडे धाडले; आणि ते तेथे आल्यावर यहुद्यांच्या सभास्थानात गेले. [११]हे थेसलनिकेच्या यहुद्यांपेक्षा अधिक मोठ्या मनाचे होते, कारण त्यांनी पूर्ण उत्सुकतेने वचन स्वीकारले आणि त्या गोष्टी अशाच आहेत काय ह्याचा त्यांनी दररोज, शास्त्रलेखांवरून पुरावा पाहिला. [१२]ह्यामुळे त्यांच्यातील पुष्कळांनी विश्वास ठेवला; त्याचप्रमाणे

हेल्लेण्यांतील प्रतिष्ठित स्त्रियांनी व पुरुषांनीही विश्वास ठेवला; तेही थोडे नव्हते.

१३पण थेसलनिकेतल्या यहुद्यांना समजले की, पौलाने बिरुयातही देवाच्या वचनाची घोषणा केली, तेव्हा ते तेथेही गेले आणि त्यांनी लोकांना चिथावले व अस्वस्थ केले. १४तेव्हा बांधवांनी लगेच पौलाला समुद्राकडे जाण्यास पाठवून दिले, पण सिला व तिमथ्य तेथेच मागे राहिले. १५आणि ज्यांनी पौलाला नेले त्यांनी त्याला अथेनैस आणले; आणि सिला व तिमथ्य ह्यांनी आपल्याकडे शक्य तितक्या लवकर यावे अशी त्यांनी त्याची आज्ञा घेतल्यावर ते निघाले.

१६आता पौल त्यांच्यासाठी अथेनैस थांबला असता, ते नगर मूर्तींनी भरले होते हे त्याने पाहिले तेव्हा त्याचा आत्मा त्याच्या अंतर्यामी प्रक्षुब्ध झाला. १७म्हणून तो सभास्थानात यहुद्यांबरोबर व भक्तिमान लोकांबरोबर, आणि दररोज जे त्याला बाजारात भेटत त्यांच्याबरोबर वादविवाद करी. १८मग एपिकूरियन पंथातले व स्तोइक पंथातले कित्येक तत्वज्ञानी त्याला विरोध करू लागले, आणि काही म्हणाले,

"ह्या बडबड्याची काय सांगायची इच्छा आहे?"

आणि दुसरे म्हणाले,

"हा परक्या देवाची घोषणा करणारा कोणी दिसतो",

कारण तो त्यांना येशू व पुनरुत्थान ह्यांची सुवार्ता सांगत होता. १९तेव्हा त्यांनी त्याला घेतले व अरियापगावर नेऊन म्हटले,

"आपण ज्याविषयी बोलत आहा ते नवं शिक्षण काय आहे हे आम्हाला कळू शकेल काय? २०कारण आपण काही अपरिचित गोष्टी आमच्या कानांवर आणीत आहा; म्हणून ह्या गोष्टींचा अर्थ काय हे आम्हाला कळावं, अशी आमची इच्छा आहे."

२१कारण सर्व अथेनैकर आणि तेथे असलेले परके एखादी नवी गोष्ट सांगण्यात किंवा ऐकण्यात वेळ घालवीत.

२२तेव्हा पौल अरियापगाच्या मध्यभागी उभा राहिला, आणि म्हणाला,

"अहो अथेनैकरांनो, मी हे सगळ्या गोष्टींत पाहतो की, तुम्ही फार भाविक आहात. २३कारण मी फिरत असता तुमची पूजास्थानं पाहिली, तेव्हा 'अज्ञात देवाला' असा कोरीव लेख असलेली एक वेदी मला आढळली. ह्याकरता, तुम्ही ज्याला न जाणता भजता त्याची मी तुम्हाला घोषणा करतो.

२४"ज्या देवानं जग आणि त्यातील सर्व उत्पन्न केलं तो आकाश आणि पृथ्वी ह्यांचा प्रभू असल्यामुळं तो हातांनी बांधलेल्या मंदिरात रहात नाही. २५आणि जणू त्याला गरज आहे म्हणून मनुष्यांच्या हातून त्याची सेवा होत नाही. कारण तो सर्वांना जीवन, प्राण, आणि सर्व काही देतो. २६आणि त्यानं एकापासून मनुष्यांची सर्व राष्ट्रं पृथ्वीच्या सर्व पृष्ठभागावर वसती करायला उत्पन्न केली; आणि त्यानं त्यांचे नियोजित काळ, आणि त्यांच्या वसतीच्या सीमा ठरवल्या, २७ह्यासाठी की, त्यांनी देवाचा शोध करावा, म्हणजे, कदाचित्, ते त्याच्यामागं चाचपडत गेल्यास तो त्यांना सापडावा; तरी आपल्यातील प्रत्येकापासून तो दूर नाही. २८कारण आपण त्याच्यात जगतो, त्याच्यात वावरतो आणि त्याच्यात आपलं अस्तित्व आहे. त्याचप्रमाणं, तुमच्या कवींपैकी कित्येक म्हणतात की, 'कारण खरोखर, आपण त्याचा वंश आहो.' २९म्हणून जर आपण देवाचा वंश आहो तर माणसाच्या कलेनं आणि कल्पनेनं रूप दिलेल्या, सोन्याच्या, रुप्याच्या आणि दगडाच्या आकृतीसारखा देव आहे असं समजू नये. ३०म्हणून ह्या अज्ञानाच्या काळांकडे देवानं दुर्लक्ष केलं आहे, पण आता तो सर्वत्र, सर्व लोकांना पश्चात्ताप करायची आज्ञा देत आहे; ३१कारण त्यानं एक दिवस नेमलेला असून, तो तेव्हा, त्यानं नेमलेल्या मनुष्याकडून नीतीनं जगाचा न्याय करील; त्यानं त्याला मृतांतून पुन्हा उठवून सर्वांना ह्याची खातरी दिली आहे."

३२त्यांनी मृतांच्या पुनरुत्थानाविषयी ऐकले तेव्हा काहींनी त्याची थट्टा केली आणि दुसरे म्हणाले,

"आम्ही तुमचं हे पुन्हा ऐकू."

३३ह्यानंतर पौल त्यांच्यामधून निघाला. ३४तरी त्यांच्यातील कित्येक जण त्याला बिलगून राहिले आणि त्यांनी विश्वास ठेवला. त्यांच्यात दियोनुश्यस हा अरियापगी मनुष्य आणि दमारीस नावाची एक बाई आणि त्यांच्याबरोबरचे दुसरेही होते.

# १८

ह्या गोष्टीनंतर तो अथेनैहून निघाला आणि करिंथला आला. २तेथे त्याला अक्विला नावाचा एक यहुदी भेटला; तो जन्माने पंतचा होता आणि आपली बायको प्रिस्किल्ला हिच्याबरोबर नुकताच

इटलीहून आला होता. (कारण क्लौदियसने सर्व यहुद्यांना
रोममधून निघून जायची आज्ञा दिली होती,) आणि तो
त्यांच्याकडे गेला. [३]आणि तो त्यांच्याच धंद्याचा
असल्यामुळे त्यांच्याबरोबर राहिला व त्याने
त्यांच्याबरोबर काम केले; ते धंद्याने तंबू बनवणारे होते.
[४]आणि त्याने सभास्थानात प्रत्येक शब्बाथ दिवशी
वादविवाद करून यहुद्यांची व हेल्लेण्यांची खातरी
पटवली.

[५]पण सिला व तिमथ्य मासेदोनियाहून खाली आले
तेव्हा पौल वचनात मग्न होऊन यहुद्यांना निक्षून साक्ष देत
राहिला की, येशू हा ख्रिस्त आहे. [६]आणि जेव्हा त्यांनी
विरोध केला व दुर्भाषण केले तेव्हा त्याने आपली वस्त्रे
झटकली व त्यांना म्हटले,

"तुमचं रक्त तुमच्या माथ्यांवर! मी निर्दोष आहे.
ह्यापुढं मी परजनांकडे जाईन."

[७]मग तो तेथून निघाला व तीत युस्तस ह्या नावाच्या एका
मनुष्याच्या घरी गेला. तो देवाचा उपासक होता. त्याचे घर
सभास्थानाच्या शेजारीच होते. [८]आणि सभास्थानाचा
अधिकारी क्रिस्पस ह्याने आपल्या घरच्या सर्वांसह प्रभूवर
विश्वास ठेवला; शिवाय पुष्कळ करिंथकरांनी ऐकले
आणि विश्वास ठेवला, आणि त्यांचा बाप्तिस्मा झाला.

[९]तेव्हा रात्री, प्रभू पौलाला दृष्टान्तात म्हणाला,

"भिऊ नको, पण बोल; आणि उगा राहू नको.
[१०]कारण मी तुझ्याबरोबर आहे आणि तुला अपाय
करायला कोणी तुझ्यावर येणार नाही; कारण ह्या नगरात
माझे पुष्कळ लोक आहेत."

[११]आणि तो त्यांच्यात देवाचे वचन शिकवीत तेथे दीड वर्ष
राहिला.

[१२]**पण गल्लियो अखयाचा अधिकारी** असताना
यहुद्यांनी एकमताने पौलाविरुद्ध उठाव केला व त्याला
न्यायासनापुढे आणून म्हटले,

[१३]"हा लोकांना नियमशास्त्रविरोधक प्रकारे देवाची
उपासना करायला शिकवतो."

[१४]आणि, पौल तोंड उघडणार होता इतक्यात गल्लियो
यहुद्यांना म्हणाला,

"अहो यहुद्यांनो, हे काही अपराधाचं किंवा दुष्ट
अत्याचाराचं प्रकरण असेल तर मी अर्थात् तुमचं ऐकलं
पाहिजे; [१५]पण जर हा शब्दांचा, नावांचा आणि तुमच्या
नियमशास्त्राचा प्रश्न असेल तर तुम्हीच पहा; कारण मी
असल्या प्रकरणात तुमचा न्यायाधीश होऊ इच्छीत नाही."
[१६]आणि त्याने त्यांना न्यायासनापुढून हाकलले. [१७]तेव्हा
सर्वांनी सभास्थानाचा अधिपती सोस्थेनेस ह्याला धरले
आणि न्यायासनापुढे मार दिला; पण गल्लियोने कोणत्याच
गोष्टीची पर्वा केली नाही.

[१८]**ह्यानंतर पौल तेथे** पुष्कळ दिवस राहिल्यावर त्याने
बांधवांची रजा घेतली, आणि तो तेथून गलबताने
सूरियाकडे निघाला. त्याच्याबरोबर प्रिस्किल्ला व
अक्विला हे निघाले व त्याचा नवस होता म्हणून त्याने
किंख्रियात डोक्यावरचे केस उतरले. [१९]आणि तो
इफिसला आला, तेथे त्याने त्यांना सोडले; पण तो स्वतः
सभास्थानात गेला व त्याने यहुद्यांबरोबर वादविवाद केला.
[२०]आणि त्यांनी त्याला आपल्याजवळ अधिक काळ
राहण्याची विनंती केली तेव्हा तो कबूल झाला नाही.
[२१]पण त्याने त्यांची रजा घेतली, आणि तो म्हणाला,

"जर देवाची इच्छा असेल तर मी तुमच्याकडे परत
येईन."

मग तो इफिसहून गलबताने निघाला.

[२२]तो कैसरियास उतरल्यावर वर गेला आणि त्याने
मंडळीला सलाम दिल्यावर तो अंत्युखियास खाली गेला;
[२३]आणि त्याने तेथे काही काळ घालविल्यावर तो
निघाला, आणि त्याने क्रमाने गलतिया प्रांतातून व
फ्रुगियातून प्रवास करून सर्व शिष्यांना स्थिर केले.

[२४]**ह्यावेळी अपुल्लो नावाचा**, एक जन्माने
अलेक्झांद्रियाचा यहुदी मनुष्य इफिसला आला; तो वक्ता
होता व शास्त्रलेखांत अधिकारी होता. [२५]त्याला प्रभूच्या
मार्गाचे शिक्षण मिळाले होते आणि तो आत्म्याने आवेशी
असल्यामुळे तो बोलत असे व प्रभूच्या गोष्टी नीट
शिकवीत असे; पण त्याला केवळ योहानाचा बाप्तिस्मा
ठाऊक होता. [२६]आणि तो सभास्थानात धैर्याने बोलू
लागला. आणि प्रिस्किल्ला व अक्विला ह्यांनी त्याचे
ऐकले तेव्हा त्यांनी त्याला आपल्याजवळ घेतले व त्याला
देवाच्या मार्गाचे अधिक नीट स्पष्टीकरण केले; [२७]आणि
त्याने जेव्हा अखयास जायचा विचार केला तेव्हा
बांधवांनी त्याला उत्तेजन दिले व शिष्यांनी त्याचे स्वागत
करावे म्हणून त्यांना लिहिले. आणि तो पोहचला तेव्हा
ज्यांनी कृपेच्या द्वारे विश्वास ठेवला होता त्यांचे फार साह्य

केले. [२८]कारण तो शास्त्रलेखांवरून, येशू हा ख्रिस्त आहे, हे दाखवीत असे; आणि मोठ्या जोरदारपणे यहुद्यांना लोकांत निरुत्तर करीत असे.

## १९

आणि असे झाले की, अपुल्लो करिंथ येथे असताना पौल वरच्या भागांतून जाऊन इफिसला आला; तेथे त्याला काही शिष्य भेटले. [२]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"तुम्ही विश्वास ठेवला तेव्हा तुम्हाला पवित्र आत्मा मिळाला काय?"

आणि ते त्याला म्हणाले,

"नाही. पवित्र आत्मा आहे, हेही आम्ही ऐकलेलं नाही."

[३]तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"मग तुम्ही कशात बाप्तिस्मा घेतला?"

आणि ते म्हणाले,

"योहानाच्या बाप्तिस्म्यात."

[४]तेव्हा पौल त्यांना म्हणाला,

"योहान खरोखर पश्चात्तापाचा बाप्तिस्मा देत असे, आणि लोकांना सांगत असे की, त्याच्यामागून येणाऱ्यावर त्यांनी विश्वास ठेवावा; म्हणजेच येशूवर."

[५]आणि त्यांनी ते ऐकले तेव्हा त्यांनी प्रभू येशूच्या नावाने बाप्तिस्मा घेतला. [६]आणि, पौलाने त्यांच्यावर हात ठेवले तेव्हा त्यांच्यावर पवित्र आत्मा आला, ते अन्य भाषांत बोलू लागले आणि संदेश देऊ लागले. [७]ते सगळे सुमारे बारा जण होते.

[८]मग तो सभास्थानात जाऊन देवाच्या राज्याच्या गोष्टींविषयी वादविवाद करीत व खातरी पटवीत तीन महिने धैर्याने बोलला. [९]पण जेव्हा कित्येक कठिण झाले आणि विश्वास न ठेवता ते त्या मार्गाविषयी लोकांपुढे वाईट बोलू लागले, तेव्हा तो त्यांच्यामधून निघाला, त्याने शिष्यांना वेगळे केले व तुरन्नाच्या पाठशाळेत तो दरदोज वादविवाद करू लागला.

[१०]हे सतत दोन वर्षे चालू राहिले; त्यामुळे आसियात राहणाऱ्या सर्व लोकांनी, यहुद्यांनी व हेल्लेण्यांनीही प्रभूचे वचन ऐकले. [११]आणि देवाने पौलाच्या हातून असाधारण चमत्कार घडविले. [१२]ह्यामुळे, जे आजारी असत त्यांच्याकडे त्याच्या अंगावरून फडके आणि कपडे नेत आणि त्यांच्यातले रोग जात व त्यांच्यातून दुष्ट आत्मे बाहेर निघत.

[१३]तेव्हा भुते काढणाऱ्या भटक्या यहुद्यांतील काही जणांनी दुष्ट आत्मे लागलेल्यांवर प्रभू येशूचे नाव घेण्यास, असे म्हणण्यास सुरुवात केली की, 'मी तुम्हाला, पौल ज्याची घोषणा करतो त्या येशूच्या नावानं शपथ घालतो.' [१४]आणि स्किवा नावाच्या एका यहुदी वरिष्ठ याजकाचे सात मुलगे होते; आणि त्यांनीही तसे केले. [१५]तेव्हा दुष्ट आत्म्याने उत्तर देऊन म्हटले, 'मी येशूला जाणतो, आणि पौलाला जाणतो, पण तुम्ही कोण?' [१६]आणि तो दुष्ट आत्मा ज्या माणसात होता त्याने त्यांच्यावर उडी घेऊन, एकाएकाला काबूत आणले आणि तो त्यांच्याविरुद्ध इतका प्रबळ झाला की, ते उघडे नागडे व जखमी होऊन त्या घरामधून बाहेर पळाले.

[१७]आणि हे इफिसात राहणाऱ्या सर्व यहुद्यांना व हेल्लेण्यांनाही माहीत झाले; तेव्हा त्या सर्वांवर दहशत पडली आणि प्रभूचे नाव थोर मानले गेले. [१८]आणि विश्वास ठेवणारे पुष्कळ जण झाले, आणि ते ज्या गोष्टी करीत असत त्या त्यांनी कबूल केल्या व सांगितल्या. [१९]जे लोक जादूटोणा करीत असत त्यांच्यातल्याही पुष्कळांनी आपली पुस्तके एकत्र आणली व ती सर्वांसमक्ष जाळली; त्यांनी त्यांच्या किंमतीची बेरीज केली; ती पन्नास हजार रुप्याच्या नाण्यांइतकी भरली. [२०]अशा प्रकारे प्रभूच्या वचनाची बळाने वाढ झाली व ते प्रबळ झाले.

[२१]**ह्या गोष्टी पूर्ण झाल्यावर** पौलाने आपल्या आत्म्यात ठरवले की, मासेदोनियातून व अखयातून प्रवास केल्यावर यरुशलेमला जावे, आणि म्हटले की,

"मी तिथं पोहचल्यावर मला रोमही बघितलं पाहिजे."

[२२]तेव्हा त्याने आपली सेवा करणाऱ्यांपैकी तिमथ्य व एरास्त ह्या दोघांना मासेदोनियास पाठविले पण तो स्वतः काही दिवस आसियात राहिला.

[२३]**त्याच वेळी, तेथे** त्या मार्गाविषयी एक मोठी खळबळ झाली. [२४]कारण, दिमित्रियस नावाचा एक सोनार अर्तमीचे रुप्याचे देव्हारे करून कारागिरांना पुष्कळ काम देत असे. [२५]त्याने त्यांना व त्याच्या धंद्यातील इतर कामकऱ्यांना एकत्र बोलवून त्यांना म्हटले,

"गड्यांनो, तुम्ही हे जाणता की, ह्या धंद्यात आपली मिळकत आहे. [२६]पण तुम्ही जाणता आणि ऐकता की, हा

पौल म्हणतो, 'जे हातांनी केले गेलेत ते देवच नाहीत.'
आणि ह्याने केवळ इफिसात नाही पण बहुतेक सर्व
आसियात लोकांचं मन वळवून त्यांना फिरवलं आहे.
२७म्हणून धोका हा आहे की, आपला धंदाच बदनामीत
जाईल असं नाही, पण महान अर्तमी देवीचं मंदिरही
काहीच नाही असं गणलं जाईल. आणि सर्व आसिया
आणि सर्व जग जिला भजत आहे तिची महती नष्ट केली
जाईल."
२८आणि त्यांनी हे ऐकले तेव्हा ते रागाने भरले आणि
ओरडून म्हणाले,

"इफिसकरांची महान अर्तमी!"

२९तेव्हा सगळे नगर घोळक्यांनी भरले; त्यांनी
पौलाचे प्रवासी-सोबती, मासेदोनियाचे गायस आणि
अरिस्तार्ख ह्यांना धरले व ते एकमताने नाटकगृहात घुसले.
३०पौल त्या लोकांत जाऊ इच्छीत असता, शिष्यांनी
त्याला जाऊ दिले नाही. ३१शिवाय त्याचे मित्र असलेल्या,
आसियाच्या अधिकाऱ्यांतील काही जणांनी त्याने
स्वतःला नाटकगृहात ढकलू नये म्हणून त्याला निरोप
धाडून तशी विनंती केली. ३२तेव्हा तेथे कोणी काही, तर
कोणी आणखी काही ओरडू लागले; कारण मंडळी
गोंधळली होती आणि बहुतेकांना ते का जमले होते हे
माहीत नव्हते. ३३पण यहुद्यांनी अलेक्झांदरला पुढे नेले,
आणि घोळक्यातील काही जण त्याच्याशी बोलले. तेव्हा
अलेक्झांदरने हाताने खुणावले, आणि लोकांना प्रत्युत्तर
द्यायचा प्रयत्न केला. ३४पण तो यहुदी आहे हे त्यांना
समजले तेव्हा ते सगळे एका आवाजात, 'इफिसकरांची
महान अर्तमी!' असे सुमारे दोन तास ओरडत राहिले.

३५मग शिरस्तेदाराने लोकांना समजावून म्हटले,

"अहो इफिसकर, हा इफिसकरांचा गाव महान
अर्तमीचा आणि स्वर्गातून पडलेल्या तिच्या मूर्तीचा
मंदिररक्षक आहे, हे न जाणणारा कोणी मनुष्य आहे काय?
३६आणि ह्या गोष्टी निर्विवाद असल्यामुळं तुम्ही शांत
असावं आणि काहीही घाईनं करू नये हे आवश्यक आहे.
३७कारण, तुम्ही ज्या लोकांना इथं आणलं आहे ते मंदिरं
लुटणारे किंवा आपल्या देवीची निंदा करणारे नाहीत.
३८म्हणून दिमेत्रियस आणि त्याच्याबरोबर असलेले
कारागीर ह्यांचा जर कोणाशी वाद असेल तर न्यायालयं
उघडी आहेत आणि न्यायाधीशही आहेत. त्यांनी
एकमेकांवर आरोप करावेत. ३९पण तुम्ही आणखी काही
विचारणार असाल तर ते रीतसर सभेत ठरवलं जाईल.
४०आपल्याला ह्या जमावाबद्दल उत्तर देता येईल असं
काहीच कारण नसल्यामुळं, आपण आजच्या उठावाबद्दल
आपल्यावर आरोप केला जाण्याच्या धोक्यात आहोत."
४१आणि असे बोलून त्याने मंडळीला लावून दिले.

२० मग गलबला थांबल्यावर पौलाने
शिष्यांस बोलवून बोध केला, आणि त्यांना
वंदन करून तो मासेदोनियाला जायला निघाला. २मग तो
त्या भागांत फिरला आणि त्याने त्यांना पुष्कळ बोध
केल्यावर तो हेल्लास प्रांतात आला, ३आणि तीन महिने
राहिला. आणि सूरियाकडे गलबताने निघणार असताना
यहुद्यांनी त्याच्याविरुद्ध कट केला, तेव्हा त्याने
मासेदोनियातून परत जायचा विचार केला; ४आणि
पुऱ्हाचा मुलगा सोपेतर बिरुयाकर, थेसलनिकेकरांपैकी
अरिस्तार्ख व सुकुंद, दर्बेचा गायस आणि तिमथ्य आणि
आसियातले तुखीक व त्रफीम हे त्याच्याबरोबर आले. ५ते
पुढे जाऊन आमच्यासाठी त्रोवसाला थांबले. ६आणि
बेखमीर भाकरींच्या दिवसांनंतर आम्ही फिलिपैहून
गलबताने निघालो, आणि पाच दिवसांत त्रोवसाला
त्यांच्याकडे आलो. तेथे आम्ही सात दिवस राहिलो.

७आणि आठवड्याच्या पहिल्या दिवशी आम्ही
भाकर मोडण्यास एकत्र जमलो. तेव्हा पौलाने त्यांना
उपदेश केला; तो सकाळी निघणार होता आणि
मध्यरात्रीपर्यंत त्याने भाषण लांबवले. ८आणि ज्या वरच्या
खोलीत ते जमले होते तेथे पुष्कळ दिवे होते.

९युतुख नावाचा एक तरुण तेथे खिडकीत बसला
होता. तो गाढ झोपेने भारावला होता; आणि पौल आणखी
उपदेश करीत असता, तो झोपेने भारावून, तिसऱ्या
मजल्यावरून खाली पडला आणि मेलेला हाती लागला.
१०तेव्हा पौल खाली गेला, त्याच्यावर पालथा पडला,
आणि त्याने त्याला कवटाळले व म्हटले,

"तुम्ही स्वतःला अस्वस्थ करू नका; कारण त्याचा
जीव त्याच्यात आहे."

११म्हणून तो पुन्हा वर आल्यावर त्याने भाकर मोडली
आणि खाल्ली व त्याने त्यांच्याशी पुष्कळ वेळ, अगदी
पहाटेपर्यंत संभाषण केल्यावर तो निघाला. १२आणि ते त्या
मुलाला जिवंत घेऊन गेले व त्यांचे फार सांत्वन झाले.

१३**आणि आम्ही गलबताकडे** खाली गेलो, आणि अस्साकडे निघालो; आणि तेथे पौलाला गलबतावर घेणार होतो, कारण तो स्वतः पायी जाणार होता म्हणून त्याने तसे सांगितले होते. १४आणि तो आम्हाला अस्साला भेटला तेव्हा आम्ही त्याला बरोबर घेतले, आणि आम्ही मितुलेनास आलो. १५आणि तेथून निघून दुसऱ्या दिवशी खियासमोर आलो, पुढच्या दिवशी सामा येथे आलो, आणि त्याच्या पुढच्या दिवशी मिलेतास आलो. १६कारण आसियात काळ न घालवता इफिसवरून पुढे जावे असे पौलाने ठरवले होते, कारण त्याला शक्य असल्यास त्याला पन्नासाव्या दिवसाच्या सणासाठी यरुशलेमला जाता यावे म्हणून तो घाई करीत होता.

१७त्याने मिलेताहून इफिसला निरोप धाडला आणि मंडळीच्या वडिलांना बोलावले. १८आणि ते त्याच्याकडे आले तेव्हा तो त्यांना म्हणाला,

"मी आसियात पाय टाकला त्या पहिल्या दिवसापासून, सर्व काळात, मी तुमच्याशी कसा झालो हे तुम्ही जाणता. १९मी मनाच्या पूर्ण लीनतेने, अश्रू गाळीत, आणि यहुद्यांच्या कटामुळे माझ्यावर आलेल्या परीक्षांत मी प्रभूची सेवा कशी केली, २०आणि तुमच्या हिताचं असलेलं काहीच मी कसं मागं ठेवलं नाही पण तुम्हाला दाखवलं आहे, आणि लोकांत आणि घरोघरी मी तुम्हाला शिकवलं आहे; २१आणि देवासमोर पश्चात्ताप करणं, आणि आपला प्रभू येशू ह्याच्यावर विश्वास ठेवणं ह्याविषयी मी यहुद्यांना आणि हेल्लेण्यांना निक्षून साक्ष दिली आहे हे तुम्ही जाणता.

२२"आणि आता बघा, मी आत्म्यानं बेड्यांत पडून यरुशलेमला जात आहे. तिथं माझ्यावर काय काय येईल हे मला माहीत नाही, २३पण पवित्र आत्मा प्रत्येक नगरात मला साक्ष देऊन सांगत आहे की, बेड्या आणि संकटं माझी वाट पहात आहेत. २४पण, मी माझी धाव, आणि प्रभू येशूकडून मला मिळालेली, देवाच्या कृपेच्या सुवार्तेची निक्षून साक्ष द्यायची सेवा मी पुरी करावी म्हणून मी माझा जीवही काही मोलाचा मानीत नाही.

२५"आणि आता बघा, मी ज्या तुमच्यात, राज्याची घोषणा करीत फिरलो ते तुम्ही सर्व जण माझं तोंड पुन्हा पाहणार नाही हे मी जाणतो. २६म्हणून आज, मी तुम्हाला निक्षून सांगतो की, मी सर्वांच्या रक्ताविषयी निर्दोष आहे. २७कारण मी देवाचा संपूर्ण मनोदय तुम्हाला सांगण्यात काही मागं ठेवलं नाही. २८म्हणून तुम्ही स्वतःकडे, आणि त्यानं जी देवाची मंडळी आपल्या रक्तानं मिळविली आहे तिचं पालन करण्यासाठी पवित्र आत्म्यानं तुम्हाला ज्यावर रक्षक म्हणून नेमलं आहे त्या सर्व कळपाकडे लक्ष द्या. २९कारण मी हे जाणतो की, मी गेल्यावर कळपाची गय न करणारे, क्रूर लांडगे तुमच्यात शिरतील. ३०आणि तुमच्यातूनच लोक उठतील, आणि आपल्यामागं शिष्यांना ओढायला ते विपरीत गोष्टी बोलतील; ३१म्हणून तुम्ही जागृत रहा आणि आठवण ठेवा की, तीन वर्षांत मी रात्रंदिवस अश्रू गाळीत, प्रत्येक जणाला बोध करायचं थांबवलं नाही.

३२"मी आता तुम्हाला देवावर आणि त्याच्या कृपेच्या वचनावर सोपवतो. ते तुमची उभारणी करायला आणि तुम्हाला, पवित्र केलेल्या सर्वांबरोबर, वतन द्यायला समर्थ आहे. ३३मी कोणाच्या चांदीसोन्याचा किंवा वस्त्राचा लोभ धरला नाही. ३४कारण तुम्ही स्वतः जाणता की, माझ्या स्वतःच्या आणि माझ्या सोबत्यांच्या गरजांसाठी ह्या हातांनी काम केलं आहे. ३५मी तुम्हाला सगळ्या गोष्टींत दाखवलं आहे की, तुम्ही असे श्रम करून जे दुर्बळ आहेत त्यांना तुम्ही कसं साह्य केलं पाहिजे, आणि प्रभू येशूनं जे म्हटलं आहे की, 'घेण्यापेक्षा देणं अधिक आशीर्वादित आहे' त्या त्याच्या शब्दांची आठवण ठेवली पाहिजे."

३६आणि असे बोलल्यावर त्याने गुडघे टेकून त्या सर्वांबरोबर प्रार्थना केली. ३७तेव्हा ते सगळे पुष्कळ रडले, आणि पौलाच्या गळ्यात पडून त्यांनी त्याचे मुके घेतले. ३८आणि 'तुम्ही माझं तोंड पुन्हा पाहणार नाही' ह्या त्याच्या शब्दांमुळे त्यांना सर्वाधिक दुःख झाले. आणि त्यांनी त्याला गलबतापर्यंत पोहचवले.

## २१

आणि असे झाले की, त्यांना सोडल्यावर आणि गलबताने निघाल्यावर आम्ही सरळ पल्ल्याने कोसापर्यंत आलो; पुढच्या दिवशी रुदासपर्यंत आणि तेथून पातऱ्यास आलो. २आणि आम्हाला फैनिकेस जाणारे गलबत मिळाल्यामुळे आम्ही त्यावर चढलो आणि निघालो. ३आता आम्हाला कुप्र दिसले, तेव्हा आम्ही ते उजवीकडे सोडले आणि आम्ही सूरियाकडे गेलो व सोरला आलो; कारण ते गलबत तेथे आपला माल उतरवणार होते. ४आणि तेथे आम्हाला शिष्य भेटले म्हणून सात दिवस राहिलो. आणि त्यांनी

आत्म्याच्या द्वारे पौलाला सांगितले की, त्याने यरुशलेमला
वर जाऊ नये.
५आणि ते दिवस पूर्ण झाल्यावर आम्ही निघालो
आणि जाऊ लागलो, तेव्हा त्या सगळ्यांनी,
बायकामुलांना बरोबर घेऊन, आम्ही नगरातून बाहेर
येईपर्यंत आम्हाला पोहचवले; आणि आम्ही किनाऱ्यावर
गुडघे टेकून प्रार्थना केली; ६आणि एकमेकांची रजा
घेतल्यावर आम्ही गलबतावर चढलो व ते घरी परतले.
७मग आम्ही सोरपासूनचा आमचा पल्ला पुरा केला व
आम्ही तोलेमैस येथे आलो; आम्ही बांधवांना सलाम
केला आणि त्यांच्याबरोबर आम्ही एक दिवस राहिलो.
८मग दुसऱ्या दिवशी आम्ही निघालो आणि कैसरियास
आलो, आणि सातांपैकी जो फिलिप सुवार्तिक तेथे होता
त्याच्या घरी जाऊन त्याच्याकडे राहिलो. ९त्याला चार
मुली होत्या; त्या कुमारिका होत्या व त्या संदेश देत
असत.
१०आणि आम्ही पुष्कळ दिवस राहिल्यानंतर अगब
नावाचा एक संदेष्टा यहुदियाहून आला. ११तो आमच्याकडे
आला असता त्याने पौलाचा कमरबंद घेतला, आणि
स्वतःचे हातपाय बांधले, आणि तो म्हणाला,

"पवित्र आत्मा हे सांगतो की, 'हा कमरबंद ज्याचा
आहे त्या माणसाला यहुदी यरुशलेमात असे बांधतील
आणि परजनांच्या हाती देतील.' "
१२आम्ही ह्या गोष्टी ऐकल्या तेव्हा त्याने यरुशलेमला वर
जाऊ नये, म्हणून आम्ही व तिथल्यांनीही त्याला विनंती
केली. १३तेव्हा पौलाने उत्तर दिले,

"तुम्ही रडून आणि माझ्या मनाचे तुकडे करून काय
करता? कारण मी बेड्यांत पडायलाच नाही, पण प्रभू
येशूच्या नावाकरता यरुशलेमात मरायलाही तयार आहे."
१४आणि तो मानीना तेव्हा आम्ही उगे राहिलो आणि
म्हणालो,

"प्रभूच्या इच्छेप्रमाणे होवो."

१५**मग त्या दिवसांनंतर** आम्ही आमचे सामान घेतले
व आम्ही यरुशलेमला वर गेलो. १६तेव्हा कैसरियातले
काही शिष्यही आमच्याबरोबर आले; आणि त्यांनी
आपल्याबरोबर कुप्राच्या नासोनाला आणले. हा एक जुना
शिष्य होता आणि त्याच्याकडे आम्ही उतरणार होतो.
१७आम्ही यरुशलेमला आलो तेव्हा बांधवांनी आमचे
आनंदाने स्वागत केले. १८मग पुढच्या दिवशी पौल
आमच्याबरोबर याकोबाकडे गेला, आणि सर्व वडील
उपस्थित होते. १९आणि त्याने त्यांना सलाम केल्यावर
देवाने त्याच्या सेवेद्वारे परजनांत कोणत्या गोष्टी केल्या त्या
सर्व त्याने त्यांना एकेक सांगितल्या.
२०हे ऐकून त्यांनी देवाचे गौरव केले आणि ते त्याला
म्हणाले,

"बंधू, तू पाहतोस की, कितीतरी शेकडोशे यहुदी
विश्वास ठेवणारे झाले आहेत, आणि ते सगळे
नियमशास्त्राविषयी आवेशी आहेत. २१आणि त्यांना
तुझ्याविषयी सांगण्यात आले आहे की, जे सर्व यहुदी
परजनांत राहतात त्यांना तू शिकवतोस की, त्यांनी मोशेचा
त्याग करावा, आणि म्हणतोस की, त्यांनी मुलांची सुनत
करू नये, आणि परिपाठानुसार चालू नये, २२तर मग
काय? कारण तू आला आहेस हे सर्वांना कळणार. २३तर
आम्ही तुला सांगतो हे कर, आमच्यात ज्यांनी नवस
केलेत असे चौघे जण आहेत. २४तू त्यांना बरोबर घे,
आणि त्यांच्याबरोबर तूपण स्वतःला शुद्ध कर, आणि
त्यांच्यासाठी डोकी मुंडण्याचा खर्च कर. आणि सर्वांना
कळेल की, तुझ्या बाबतीत त्यांना सांगण्यात आलेल्या
गोष्टी काहीच नाहीत, आणि तूपण नीट चालणारा असून,
नियमशास्त्राचे पालन करतोस. २५पण विश्वास ठेवणाऱ्या
परजनांविषयी आम्ही लिहून निर्णय दिला आहे की, त्यांनी
स्वतःला, मूर्तीला वाहिलेली अर्पणं आणि रक्त, आणि
मुरगळून मारलेले प्राणी आणि जारकर्म, ह्यांपासून जपावं."

२६**मग त्या लोकांना पौलाने** घेतले आणि दुसऱ्या
दिवशी त्यांच्याबरोबर त्याने स्वतःला शुद्ध केले; आणि
तो त्यांच्याबरोबर, त्या प्रत्येकासाठी अर्पण अर्पून
होईपर्यंत शुद्धिकरणाचे दिवस पूर्ण करण्याविषयी सविस्तर
सांगण्यास मंदिरात गेला. २७आणि ते सात दिवस पूर्ण होत
आले असता, आसियातील यहुद्यांनी त्यांना मंदिरात
पाहिले. तेव्हा त्यांनी लोकांना चिथावले आणि त्याच्यावर
हात टाकले; २८आणि ते ओरडले,

"अहो इस्राएलाचे लोकहो, धावा! हाच मनुष्य
आपल्या लोकांविरुद्ध, नियमशास्त्राविरुद्ध आणि ह्या
स्थानाविरुद्ध सगळ्या लोकांना सगळीकडे शिकवीत
असतो. आणि शिवाय, ह्यानं हेल्लेण्यांना मंदिरात आणून
हे पवित्र स्थान विटाळवलं आहे."
(२९कारण त्यांनी अगोदर त्याच्याबरोबर इफिसकर त्रफीम
ह्याला नगरात पाहिले होते आणि पौलाने त्याला मंदिरात

आणले आहे असे ते समजत होते.) [३०]तेव्हा सर्व नगर उठले, आणि लोक घोळका करून धावले; आणि त्यांनी पौलाला धरून मंदिरातून बाहेर काढले आणि दारे बंद केली गेली.

[३१]आणि ते त्याला ठार मारायला पहात असता पलटणीच्या सेनापतीकडे बातमी आली की, सर्व यरुशलेम गोंधळात आहे. [३२]त्याने लगेच शिपायांना व शतपतींना बरोबर घेतले व तो त्यांच्याकडे खाली धावला आणि त्यांनी जेव्हा सेनापतीला व शिपायांना बघितले तेव्हा पौलाला मारणे थांबवले. [३३]मग सेनापतीने पुढे पाऊल टाकून त्याला धरले आणि दोन साखळ्यांनी त्याला बांधायची आज्ञा दिली. आणि हा कोण, आणि काय करीत होता ह्याची चौकशी केली. [३४]तेव्हा गर्दीतून कोणी काही आणि कोणी काही ओरडू लागले. आणि जेव्हा त्याला त्या गलबल्याबद्दल काहीच खातरीलायक कळू शकले नाही तेव्हा त्याने त्याला गढीत नेण्याची आज्ञा दिली. [३५]आणि असे झाले की, तो पायऱ्यांवर आला तेव्हा लोकांच्या दांडगाईमुळे शिपायांनी त्याला उचलून नेले. [३६]कारण त्यांच्या मागोमाग लोकांचा घोळका 'त्याची वाट लावा' असे ओरडत येत होता.

[३७]आणि पौलाला गढीत नेत असता तो सेनापतीला म्हणाला,

"मी आपल्याशी बोलू का?"

आणि तो म्हणाला,

"तुला हेल्लेणीत बोलता येतं का? [३८]ह्या आजच्या दिवसापर्यंत ज्या मिसऱ्यानं उलथापालथ करून चार हजार खुनी लोक रानात नेले तो तूच नाहीस काय?"

[३९]पण पौल म्हणाला,

"मी किलिकियातील तार्स येथील यहुदी आहे; मी एखाद्या हलक्या नगराचा रहिवासी नाही. आणि मी आपल्याला विनवणी करतो की, मला लोकांशी बोलू द्या."

[४०]आणि त्याने परवानगी दिली तेव्हा पौल पायऱ्यांवर उभा राहिला व त्याने लोकांना आपल्या हातांनी खुणावले, आणि पुष्कळ शांतता झाली तेव्हा तो त्यांना उद्देशून इब्री भाषेत बोलू लागला व म्हणाला:

२२ "अहो बंधूहो, पितेहो, आता माझं तुम्हाला प्रत्युत्तर ऐका."

([२]आणि जेव्हा त्यांनी ऐकले की, त्यांना उद्देशून तो हे इब्री भाषेत बोलला तेव्हा त्यांनी अधिक शांतता राखली. मग तो म्हणाला,)

[३]"मी एक यहुदी मनुष्य आहे. किलिकियातील तार्स इथं जन्मलो. पण मी ह्या नगरात वाढलो. मला गमलिएलाच्या पायांपाशी आपल्या पूर्वजांच्या नियमशास्त्राच्या काटेकोर पद्धतीनं शिक्षण मिळालं आणि जसे तुम्ही सगळे आज देवाविषयी आवेशी आहात तसा मीही होतो. [४]आणि, मी ह्या मार्गाचा मरणाच्या शिक्षेपर्यंत पाठलाग केला; मी पुरुषांना आणि स्त्रियांनाही बेड्या घालून बंदिशाळेत नेलं. [५]ह्याविषयी श्रेष्ठ याजक आणि सर्व वडीलसभा माझ्या बाजूनं साक्ष देतील. मी त्यांच्याकडून बांधवांना पत्रं घेतली आणि मी दिमिष्कास जात होतो; म्हणजे तिथं होते त्यांनादेखील शिक्षा व्हावी म्हणून यरुशलेमला बांधून आणावं.

[६]"आणि असं झालं की, मी माझा प्रवास करीत दिमिष्काजवळ आलो असता, दुपारच्या सुमारास, आकाशामधून, अकस्मात्, एक मोठा प्रकाश माझ्या सभोवती चमकला, [७]आणि मी खाली पडलो; तेव्हा मला, 'शौला, शौला, तू माझा छळ का करतोस?', असं माझ्याशी बोलणारा एक आवाज ऐकू आला. [८]आणि मी उत्तर दिलं, 'प्रभू, तू कोण आहेस?' आणि तो म्हणाला, 'तू ज्याचा छळ करतोस तो नासोरी येशू मी आहे.' [९]आणि तेव्हा जे माझ्याबरोबर होते त्यांनी तो प्रकाश खरोखर पाहिला, पण जो माझ्याशी बोलला त्याचा आवाज त्यांनी ऐकला नाही. [१०]आणि मी म्हणालो, 'प्रभू, मी काय करू?' आणि प्रभू म्हणाला, 'ऊठ, आणि दिमिष्कास जा, आणि तुझ्यासाठी, तू कराव्यात म्हणून, ज्या सर्व गोष्टी नेमलेल्या आहेत त्यांविषयी तुला तिथं सांगण्यात येईल.' [११]मला त्या प्रकाशाच्या प्रखर तेजामुळं दिसेनासं झालं, तेव्हा जे माझ्याबरोबर होते त्यांनी मला हाताला धरून नेलं, आणि मी दिमिष्कास आलो.

[१२]"आणि एक हनन्या म्हणून, नियमशास्त्रानुसार धार्मिक मनुष्य तिथं होता. आणि तिथं राहणाऱ्या सर्व यहुद्यांत त्याची ग्वाही दिली जात होती. [१३]तो माझ्याजवळ येऊन उभा राहिला, आणि म्हणाला, 'बंधू शौल, तुला दृष्टी यावी.' आणि मी त्याच घटकेस त्याच्याकडे वर पाहिलं. [१४]आणि तो म्हणाला, 'आपल्या पूर्वजांच्या देवानं तुला ह्यासाठी निवडलं आहे की, तुला त्याची इच्छा कळावी, तू त्या नीतिमान पुरुषाला बघावंस आणि त्याच्या तोंडचे

शब्द ऐकावेस. १५कारण तू जे पाहिलं आहेस आणि ऐकलं
आहेस त्याविषयी तू सर्व लोकांपुढं त्याचा साक्षी होशील.
१६आणि आता का थांबतोस? ऊठ, आणि बाप्तिस्मा घे;
आणि त्याच्या नावाचा धावा करून तुझी पापं पुसून टाक.'

१७"मग असं झालं की, मी यरुशलेमला परत
आल्यावर मंदिरात प्रार्थना करीत होतो; आणि तंद्रीत
असता, १८मी त्याला बघितलं आणि तो मला म्हणाला,
'घाई कर, तू लवकर यरुशलेमच्या बाहेर नीघ; कारण ते
माझ्याविषयी तुझी साक्ष स्वीकारणार नाहीत.' १९तेव्हा मी
म्हणालो, 'प्रभू, त्यांना ठाऊक आहे की, मी तुझ्यावर
विश्वास ठेवणाऱ्यांस अटकेत घातलं, आणि प्रत्येक
सभास्थानात फटके मारवले; २०आणि तुझा साक्षी स्तेफन
ह्याचं रक्त पाडलं जात असता मीही जवळ उभा राहून
संमती देत होतो, आणि ज्यांनी त्याला ठार मारलं त्यांचे
कपडे संभाळीत होतो.' २१आणि तो म्हणाला, 'नीघ,
कारण मी तुला दूर, परजनांकडे पाठवून देईन.'

२२त्यांनी ह्या वाक्यापर्यंत त्याचे ऐकले, पण
मग आपला आवाज चढवला आणि म्हटले,

"असल्या ह्याची पृथ्वीवरून वाट लावा, कारण ह्यानं
जिवंत राहणं योग्य नाही."

२३आणि ते ओरडत असता, कपडे काढून फेकीत असता,
आणि हवेत धूळ उडवीत असता, २४सेनापतीने त्याला
गढीत घेऊन जाण्याची आज्ञा दिली; आणि ते
त्याच्याविरुद्ध इतके का ओरडत होते हे त्याला माहीत
व्हावे म्हणून त्याने त्याला फटके मारून विचारण्यास
सांगितले.

२५आणि त्यांनी त्याला वाद्यांनी बांधले तेव्हा पौल
जवळ उभ्या असलेल्या शतपतीला म्हणाला,

"आपण रोमी मनुष्याला, त्याच्यावर दोष ठेवला
नसताना, फटके मारणं योग्य आहे काय?"

२६शतपतीने हे ऐकले तेव्हा तो गेला आणि सेनापतीशी
बोलून म्हणाला,

"आपण हे काय करणार आहात? कारण हा मनुष्य
रोमी आहे."

२७तेव्हा सेनापती येऊन त्याला म्हणाला,

"मला सांग, तू रोमी आहेस काय?"

तो म्हणाला,

"हो."

२८मग सेनापतीने उत्तर दिले,

"मी हे नागरिकत्व मोठी रक्कम देऊन मिळवलं
आहे."

तेव्हा पौल म्हणाला,

"मी तर जन्मानं रोमी आहे."

२९आणि मग, जे त्याची चौकशी करणार होते ते
लगेच त्याला सोडून गेले. आणि तो रोमी आहे हे माहीत
झाल्यावर सेनापती भ्याला होता, आणि ह्याचे कारण त्याने
त्याला बांधले होते.

३०आणि यहुदी त्याच्यावर का आरोप करीत होते
ह्याविषयी त्याला काही खातरीलायक कळावे, अशी
त्याची इच्छा असल्यामुळे त्याने त्याला सकाळी सोडले,
आणि वरिष्ठ याजकांना व त्यांच्या सर्व न्यायसभेला
उपस्थित राहण्याची आज्ञा करून त्याने पौलाला खाली
आणले व त्यांच्यापुढे उभे केले.

२३ तेव्हा पौलाने न्यायसभेकडे टक लावून
म्हटले,

"अहो बंधूंनो, मी सर्वस्वी चांगल्या विवेकानं
आजवर देवासमोर वागलो आहे."

२तेव्हा श्रेष्ठ याजक हनन्या ह्याने त्याच्याजवळ जे उभे होते
त्यांना त्याच्या तोंडावर मारण्याची आज्ञा केली. ३तेव्हा
पौल त्याला म्हणाला,

"अरे पांढऱ्या भिंताड्या, देव तुला मारील. तू
नियमशास्त्राखाली माझा न्याय करायला बसतोस, आणि
नियमशास्त्राविरुद्ध मला मारायची आज्ञा देतोस."

४तेव्हा जे जवळ उभे होते ते त्याला म्हणाले,

"तू देवाच्या श्रेष्ठ याजकाची निंदा करतोस काय?"

५तेव्हा पौल म्हणाला,

"बंधूंनो, हे श्रेष्ठ याजक आहेत हे मला माहीत नव्हतं.
कारण असं लिहिलं आहे की, 'तू आपल्या लोकांच्या
अधिकाऱ्यांविषयी वाईट बोलू नकोस.' "

६पण पौलाने जेव्हा ओळखले की, तेथे एका बाजूस
सदोकी आणि दुसऱ्या बाजूस परोशी होते तेव्हा तो
न्यायसभेत ओरडून म्हणाला,

"अहो बंधूंनो, मी परोशी आहे, आणि परोश्याचा
मुलगा आहे. आणि ह्या आशेबाबत आणि मृतांच्या
पुनरुत्थानाबाबत माझी चौकशी होत आहे."

[७]आणि जेव्हा तो असे बोलला तेव्हा परोशी व सदोकी ह्यांच्यात विरोध उद्भवला आणि त्या लोकांत फूट पडली. ([८]कारण सदोकी म्हणतात की, पुनरुत्थान नाही, देवदूत नाहीत आणि आत्मा नाही; पण परोशी हे सर्व पतकरतात.) [९]तेव्हा मोठा गलबला झाला आणि परोश्यांच्या बाजूचे शास्त्री उठले, आणि विरोध करून म्हणाले,

"आम्हाला ह्याच्यात काही वाईट आढळत नाही; पण कोणी आत्मा किंवा देवदूत ह्याच्याशी बोलला असेल तर?"

[१०]आणि मोठा विरोध उद्भवला तेव्हा ते पौलाला ओढून ताणून त्याचे तुकडे करतील अशी सेनापतीला भीती वाटल्यामुळे शिपायांनी खाली जावे आणि त्याला त्यांच्यामधून बळाने घेऊन गढीत आणावे, अशी त्याने आज्ञा दिली. [११]आणि लगेच रात्री, प्रभू त्याच्याजवळ उभा राहिला आणि म्हणाला,

"धीर धर; कारण तू यरुशलेमात जशी माझ्याविषयी निक्षून साक्ष दिलीस तशी तुला रोमलादेखील दिली पाहिजे."

[१२]**आणि दिवस उगवला तेव्हा** काही यहुद्यांनी एकजूट केली, आणि त्यांनी पौलाला ठार मारीपर्यंत काही खायचे प्यायचे नाही असे म्हणून स्वतःला शपथेने बांधून घेतले. [१३]आणि ज्यांनी हा कट केला होता ते चाळिसांहून अधिक होते. [१४]मग ते वरिष्ठ याजक आणि वडील ह्यांच्याकडे येऊन म्हणाले,

"आम्ही अशा घोर शपथेनं स्वतःला बांधून घेतलं आहे की, पौलाला ठार मारीपर्यंत आम्ही काही खाणार नाही. [१५]आणि ह्यासाठी, आपण आणि न्यायसभा मिळून, जणू आपण त्याच्याविषयी अधिक नीट चौकशी करणार आहात, म्हणून सेनापतींनी उद्या सकाळी त्याला खाली आणावं असं त्यांना कळवावं, आणि तो जवळ येण्याअगोदर आम्ही त्याला ठार मारायला तयार आहोत."

[१६]ते दबा धरून बसले होते हे पौलाच्या बहिणीच्या मुलाने ऐकले, तेव्हा तो निघून गढीत गेला आणि त्याने हे पौलाला सांगितले. [१७]त्यावर पौलाने एका शतपतीला आपल्याकडे बोलवून म्हटले,

"ह्या तरुणाला सेनापतींकडे घेऊन जा. कारण ह्याला त्यांना काही सांगायचं आहे."

[१८]म्हणून त्याने त्याला बरोबर घेतले आणि सेनापतीकडे आणून म्हटले,

"बंदिवान पौलानं मला आत बोलावलं, आणि ह्या तरुणाला आपल्याकडे घेऊन जायची विनंती केली; ह्याला आपल्याशी काही बोलायचं आहे."

[१९]तेव्हा सेनापतीने त्याचा हात धरला, तो त्याच्याबरोबर एकीकडे गेला, आणि त्याने त्याला विचारले,

"तुला मला काय सांगायचं आहे?"

[२०]आणि तो म्हणाला,

"हे यहुदी एकमत झाले आहेत आणि जणू पौलाची अधिक नीट चौकशी करता यावी म्हणून आपण त्याला उद्या सकाळी न्यायसभेत आणावं, अशी ते आपल्याला विनंती करणार आहेत. [२१]पण आपण त्यांचं ऐकू नका, कारण त्यांच्यातले चाळिसांहून अधिक लोक त्याच्यावर टपलेत, आणि पौलाला ठार मारीपर्यंत काही खायचं प्यायचं नाही, अशा शपथेनं त्यांनी स्वतःला बांधून घेतलं आहे; आणि ते आता तयार असून आपल्या वचनाची प्रतीक्षा करीत आहेत."

[२२]तेव्हा सेनापतीने त्या तरुणाला लावून दिले, आणि त्याला आज्ञा दिली की,

"तू ह्या गोष्टी मला सांगितल्यास हे कोणाला सांगू नको."

[२३]**मग त्याने दोन शतपतींना** आपल्याकडे बोलवून म्हटले,

"आज रात्री तिसऱ्या ताशी कैसरियात जायला दोनशे शिपाई, सत्तर घोडेस्वार, आणि दोनशे भालेकरी तयार ठेवा; [२४]आणि त्यांना जनावरं पुरवा, म्हणजे त्यांतील एकावर पौलाला बसवून ते त्याला सुभेदार फेलिक्सकडे सुरक्षित नेतील."

[२५]आणि त्याने ह्या पद्धतीने एक पत्र लिहिले:

[२६]क्लौदियस लुसियास ह्याजकडून,
श्रेष्ठ फेलिक्स सुभेदार ह्यांस:
जयजय.

[२७]ह्या मनुष्याला यहुद्यांनी धरले होते, आणि त्यांनी त्याला ठार मारले असते; तेव्हा हा रोमी आहे हे मला कळल्यावर मी एक तुकडी घेऊन चाल केली आणि ह्याला सोडवले. [२८]आणि ते त्याच्यावर कोणत्या कारणावरून आरोप करीत होते हे मला माहीत व्हावे, अशी माझी इच्छा असल्यामुळे, मी

त्याला त्यांच्या न्यायसभेपुढे आणले. [२९]आणि मला
आढळले की, त्यांच्या स्वतःच्या नियमशास्त्रातील
प्रश्नांवरून ह्याच्यावर आरोप आणले होते; पण,
ह्याला मरणाची शिक्षा किंवा कैद व्हावी असा काही
योग्य आरोप त्याच्याविरुद्ध मांडला नव्हता असे मी
पाहिले. [३०]आणि मला त्या मनुष्याविरुद्ध कट
करण्यात आला आहे असे सांगण्यात आले तेव्हा
लगेच मी त्याला आपल्याकडे धाडले. [३१]आणि
त्याच्यावर आरोप करणाऱ्यांना त्याच्याविरुद्ध काही
बोलायचे असेल तर त्यांनी आपल्यापुढे बोलावे
अशी मी त्यांना आज्ञा देत आहे.

कुशल असो.

[३१]मग शिपायांनी पौलाला घेतले आणि त्यांना
सांगितल्याप्रमाणे अंतिपात्रीपर्यंत रात्री आणले. [३२]मग
दुसऱ्या दिवशी स्वारांनी त्याच्याबरोबर जावे म्हणून त्यांनी
त्यांना सोडले व ते गढीकडे परत निघाले. [३३]आणि ते
कैसरियास आले तेव्हा त्यांनी सुभेदारांना पत्र दिल्यावर
पौलाला त्यांच्यासमोर उभे केले.

[३४]आणि त्याने ते वाचल्यावर तो कोणत्या प्रांतातला
आहे हे विचारले व त्याला तो किलिकियातला आहे हे
समजले [३५]तेव्हा तो त्याला म्हणाला,

"तुझ्यावर आरोप करणारेही येतील तेव्हा मी तुझी
बाजू ऐकेन."

आणि त्याने त्याला हेरोदाच्या वाड्यात पहाऱ्यात
ठेवण्याची आज्ञा दिली.

२४ आणि पाच दिवसांनंतर श्रेष्ठ याजक
हनन्या हा काही वडिलांबरोबर व तिर्तुल्लस
नावाच्या वकिलाबरोबर खाली आला; आणि त्यांनी
सुभेदाराला पौलाविरुद्ध माहिती दिली. [२]मग त्याला पुढे
बोलावल्यावर तिर्तुल्लस त्याच्यावर आरोप ठेवू लागला व
म्हणाला,

"आपल्यामुळं आम्हाला मोठं स्वास्थ्य आहे; आणि
आपल्या योजनेमुळं ह्या राष्ट्रासाठी पुष्कळ सुधारणा
केल्या जात आहेत, [३]म्हणून श्रेष्ठ फेलिक्स, आम्ही सदा,
सर्व ठिकाणी, तिचं संपूर्ण कृतज्ञतेनं स्वागत करतो. [४]पण
आपल्याला अधिक अडथळा न करता, मी आपल्याला
विनंती करतो की, आपण आपल्या सहनशीलतेनं थोड्या
शब्दांत आमचं एवढं ऐकावं.

[५]"कारण आम्हाला आढळलं आहे की, हा एक
उपद्रवी मनुष्य आहे, आणि हा जगभर सर्व यहुद्यांत उठाव
चालू करीत आहे; आणि हा नासोरी पंथाचा पुढारी आहे.
[६]ह्यानं मंदिरपण भ्रष्ट करायचा प्रयत्न केला तेव्हा आम्ही
ह्याला धरलं. [७-८]ह्याच्याकडून आपण चौकशी केल्यावर
आम्ही ज्या गोष्टींविषयी ह्याच्यावर आरोप आणीत आहोत
त्या सर्व गोष्टी आपल्याला समजतील."
[९]तेव्हा यहुद्यांनी संमती दिली, आणि 'ह्या गोष्टी अशाच
आहेत' असं ते म्हणाले.

[१०]मग पौलाने, त्याला सुभेदाराने बोलण्यास
खुणावल्यावर, उत्तर दिले,

"आपण पुष्कळ वर्षांपासून ह्या राष्ट्रावर न्यायाधीश
आहात हे मला माहीत असल्यामुळं, मी अधिक आनंदानं
हे माझ्या वतीनं प्रत्युत्तर देतो. [११]कारण आपल्याला हे
समजू शकेल की, मी यरुशलेमला उपासना करायला
गेलो, त्याला अजून केवळ बारा दिवस झालेत. [१२]आणि
मी त्यांना मंदिरात, सभास्थानांत किंवा नगरात कोणत्याही
मनुष्याशी वाद करताना किंवा लोकांत उठाव करताना
आढळलो नाही. [१३]त्याचप्रमाणं, आता ते माझ्यावर ज्या
गोष्टींविषयी आरोप करीत आहेत त्या ते प्रस्थापित करू
शकत नाहीत.

[१४]"पण मी आपल्यापुढं पतकरतो की, ते ज्याला पंथ
म्हणतात त्या मार्गाला अनुसरून, नियमशास्त्रात आणि
संदेष्ट्यांत लिहिलेल्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवून, मी
माझ्या पूर्वजांच्या देवाची उपासना करतो. [१५]आणि
नीतिमानांचं तसंच अनीतिमानांचं पुनरुत्थान होईल अशी
देवाच्या ठायी माझी आशा आहे. ती तेपण पतकरतात.
[१६]आणि ह्यासाठी, देवापुढं आणि मनुष्यांपुढं माझा विवेक
निर्दोष असावा म्हणून मी झटतो.

[१७]"आणि मी आता पुष्कळ वर्षांनी माझ्या
लोकांसाठी साह्य घेऊन यावं, आणि अर्पणं करावीत
म्हणून इकडे आलो. [१८]मी ह्या गोष्टी करीत असताना
मंदिरात शुद्ध झालेला आढळलो, लोकांच्या घोळक्यात
किंवा गलबल्यात नाही. पण आसियातील काही यहुदी
तिथं होते; [१९]त्यांच्याजवळ माझ्याविरुद्ध काही असल्यास
त्यांनी स्वतः आरोप करायला इथं आपल्यासमोर येणं
आवश्यक होतं. [२०]नाहीतर, ह्यांनी स्वतः सांगावं की,
न्यायसभेपुढं, मी उभा असताना त्यांना माझ्यात काही
अपराध आढळला काय? [२१]किंवा माझ्या ह्या बोलण्यात
काय? मी त्यांच्यापुढं उभा असताना ओरडून म्हणालो

की, 'आज मृतांच्या पुनरुत्थानाविषयी माझी तुमच्यापुढं
चौकशी होत आहे.' "

२२**पण ह्या मार्गाविषयी** त्याला अधिक चांगली
माहिती असल्यामुळे फेलिक्स त्यांना म्हणाला,

"सेनापती लुसियास खाली आल्यावर मी तुमच्या
बाबतीत निर्णय करीन."
आणि त्याने त्यांना तहकुबी दिली; २३आणि एका
शतपतीला आज्ञा दिली की, पौलाला अटकेत ठेवून
मोकळीक घेऊ द्यावी, आणि त्याची सेवा करायला
त्याच्या आप्तांना मनाई होऊ नये.

२४आणि काही दिवसांनंतर फेलिक्स आपली यहुदी
पत्नी द्रुसिल्ला हिच्याबरोबर आला; आणि पौलाला
बोलवून त्याने त्याच्याकडून ख्रिस्त येशूवरील
विश्वासाविषयी ऐकले. २५मग तो नीती आणि संयमन व
पुढे येणारा न्यायनिवाडा ह्यांवर विवेचन करू लागला;
तेव्हा फेलिक्स भयभीत झाला आणि त्याला उद्देशून
म्हणाला,

"आता जा; मला वेळ असेल तेव्हा मी तुला
बोलवीन."
२६शिवाय त्याने पौलाला सोडावे म्हणून त्याला
त्याच्याकडून पैसे दिले जातील अशी तो आशा करीत
होता; आणि म्हणून तो त्याला वरचेवर बोलवून
त्याच्याशी बोलत असे.

२७पण अशी दोन वर्षे निघून गेल्यावर फेलिक्सच्या
जागी पोर्क्यस फेस्त तेथे येतो आणि यहुद्यांवर मेहरबानी
करावी अशी इच्छा धरून फेलिक्स पौलाला अटकेत मागे
ठेवतो.

२५ आता, फेस्त त्या प्रांतात आल्यावर,
तीन दिवसांनी, तो कैसरियाहून यरुशलेमला
वर गेला. २तेव्हा वरिष्ठ याजक व यहुद्यांचे प्रमुख ह्यांनी
त्याला पौलाविरुद्ध माहिती दिली; ३आणि त्याला
यरुशलेमला बोलवावे अशी त्यांनी विनंती केली व
त्याच्याविरुद्ध त्याच्या कृपेची याचना केली. म्हणजे वाटेत
दबा धरून त्याला मारता यावे. ४पण फेस्ताने उत्तर देऊन
म्हटले,

"पौल कैसरियात अटकेत आहे, आणि मी लवकरच
तिकडे जाईन. ५म्हणून तुमच्यात जे कोणी अधिकारी
असतील त्यांनी माझ्याबरोबर खाली यावं आणि ह्या
मनुष्यात काही विपरीत असल्यास त्यांनी ह्याच्यावर
आरोप करावेत."

६आणि तो त्यांच्यात फार तर आठदहा दिवस
राहिल्यावर कैसरियास खाली आला. आणि दुसऱ्या
दिवशी तो न्यायासनावर बसल्यावर त्याने पौलाला
आणण्याची आज्ञा दिली. ७आणि तो आल्यावर
यरुशलेमहून आलेले यहुदी सभोवती उभे राहिले; आणि,
ते जे सिद्ध करू शकले नाहीत, असे पुष्कळ आणि भारी
आरोप त्यांनी त्याच्यावर आणले. ८आणि पौलाने
स्वतःतर्फे उत्तर दिले,

"मी यहुद्यांच्या नियमशास्त्राविरुद्ध किंवा मंदिराविरुद्ध
किंवा कैसराविरुद्ध काही अपराध केलेला नाही."

९पण यहुद्यांवर मेहरबानी करावी अशी इच्छा धरून
फेस्ताने पौलाला उत्तर देऊन म्हटले,

"ह्या बाबतीत, यरुशलेमास वर जाऊन, तिथं
माझ्यापुढं तुझा न्याय व्हावा अशी तुझी इच्छा आहे
काय?"
१०तेव्हा पौल म्हणाला,

"मी कैसराच्या न्यायासनापुढं उभा आहे; इथं माझा
न्याय झाला पाहिजे. मी यहुद्यांचा काहीच अपराध केलेला
नाही हे आपल्याला चांगलं विदित झालं आहे. ११कारण
मी अपराधी असेन किंवा मरणाच्या शिक्षेस पात्र होईन
असं काही मी केलं असेल तर न मरणं मला नको आहे.
पण हे माझ्यावर ज्या गोष्टींचा आरोप करीत आहेत तशी
कोणतीही गोष्ट नसेल, तर कोणी मला त्यांच्या स्वाधीन
करू शकणार नाही. मी कैसराकडे दाद मागतो."
१२तेव्हा सभेची मसलत घेतल्यावर फेस्ताने उत्तर दिले,

"तू कैसराकडे दाद मागतोस? तू कैसराकडे
जाशील."

१३**मग काही दिवस गेल्यावर** राजे अग्रिपा आणि
बर्णिका ह्यांनी फेस्ताचे अभिनंदन करायला कैसरियाला
भेट दिली. १४आणि त्यांनी तेथे बरेच दिवस घालवल्यावर
फेस्ताने पौलाची बाब राजापुढे ठेवली आणि तो म्हणाला,

"फेलिक्सकडून अटकेत राहिलेला एक मनुष्य इथं
आहे. १५मी यरुशलेमास आलो तेव्हा मला यहुद्यांच्या
वरिष्ठ याजकांनी आणि वडिलांनी त्याच्याविषयी माहिती
दिली आणि त्याच्याविरुद्ध न्याय मागितला. १६मी त्यांना
उत्तर दिले की, 'ज्याच्यावर आरोप केला असेल त्या

माणसाला त्याच्यावर आरोप करणाऱ्यांपुढं प्रत्युत्तराची
संधी मिळाल्याअगोदर त्याला सोपवून द्यावं ही रोम्यांची
रीत नाही.'

[१७]"म्हणून ते इकडे आल्यावर काही विलंब न होऊ
देता, मी दुसऱ्या दिवशी न्यायासनावर बसलो. आणि ह्या
मनुष्याला घेऊन येण्याची आज्ञा केली. [१८]आणि
ह्याच्यावर आरोप करणारे उभे राहिले, तेव्हा मला
वाटल्याप्रमाणं, त्यांनी त्याच्यावर कोणत्याच वाईट
गोष्टीचा आरोप केला नाही. [१९]पण त्यांच्या धर्माविषयी,
आणि जो मेला असून पौल म्हणतो तो जिवंत आहे, अशा
एका येशूविषयी त्यांचे त्याच्याशी वाद आहेत.

[२०]"आणि ह्या गोष्टींच्या चौकशीविषयी मी साशंक
असल्यामुळं मी त्याला विचारलं की, 'तू यरुशलेमला
जायला आणि तिथं ह्या बाबतीत न्याय करून घ्यायला
तयार आहेस काय?' [२१]पण पौलानं विनंती केली की,
'मला बादशाहांच्या निवाड्यासाठी राखा.' तेव्हा मी
त्याला कैसरापुढं पाठवीपर्यंत मी त्याला अटकेत ठेवायची
आज्ञा दिली."

[२२]तेव्हा अग्रिपा फेस्ताला म्हणाला,

"मला स्वतःलापण त्या माणसाचं ऐकायला
आवडेल."

आणि तो म्हणाला,

"उद्या आपण त्याचं ऐकाल."

[२३]मग सकाळी मोठ्या थाटाने अग्रिपा व बर्णिका
आल्यानंतर, सेनापतींच्या व नगरातील प्रमुख लोकांच्या
समवेत त्यांनी न्यायालयात प्रवेश केला, तेव्हा फेस्ताने
आज्ञा दिल्याप्रमाणे पौलाला पुढे आणण्यात आले. [२४]मग
फेस्त म्हणाला,

"राजे अग्रिपा, आणि आमच्याबरोबर उपस्थित
असलेले सर्व लोकहो, आपण ह्या माणसाला पाहता;
ह्याच्याविषयी, यरुशलेमात आणि इथं यहुद्यांच्या सर्व
जमावानं ओरडून माझ्याकडे मागणी केली आहे की, ह्यानं
ह्यापुढं जिवंत राहू नये. [२५]पण ह्यानं मरणाच्या शिक्षेस
योग्य होईल असं काही केलेलं नाही हे मला दिसलं. आणि
स्वतः ह्यानं बादशाहाकडे न्याय मागितला, तेव्हा मी
ह्याला धाडावं असं ठरवलं. [२६]ह्याच्या बाबतीत मला
आपल्या महाराजांना लिहिण्यासाठी काही निश्चित
आढळलं नाही म्हणून मी त्याला आपल्या सर्वांपुढं आणि,
राजे अग्रिपा, विशेषतः आपल्यापुढं, आणलं आहे;
म्हणजे मला ही चौकशी झाल्यावर लिहिण्यासाठी काही
मिळेल. [२७]कारण, एखाद्या बंदिवानाला धाडणं आणि
त्याच्याविरुद्ध आणलेले आरोप प्रतिपादित न करणं हे
मला अयोग्य दिसतं."

२६ तेव्हा अग्रिपा पौलाला म्हणाला,
"तुला आता स्वतःविषयी बोलायची परवानगी
आहे."

तेव्हा, पौलाने हात पुढे केला आणि स्वतःतर्फे उत्तर दिले,

[२]"राजे अग्रिपा, मी स्वतःला धन्य मानतो; कारण
यहुद्यांनी माझ्यावर जे आरोप केलेत त्या सर्वांविषयी मी
आपल्यापुढं आज स्वतःतर्फे उत्तर देत आहे. [३]कारण
यहुद्यांत जे सर्व परिपाठ आणि प्रश्न आहेत त्यांत विशेषतः
आपण जाणते आहात. म्हणून मी आपल्याला विनवणी
करतो की, आपण माझं ऐकण्यासाठी मला वागवून घ्या.

[४]"माझ्या बाळपणापासून प्रथमारंभी माझ्या लोकांत
आणि यरुशलेमात, माझं आयुष्य कसं गेलं हे सर्व यहुदी
जाणतात, [५]आणि जे मला प्रारंभापासून ओळखतात ते
इच्छीत असल्यास साक्ष देतील की, मी आमच्या
धर्माच्या, सर्वांत कडक पंथाप्रमाणं परोशी म्हणून राहिलो.
[६-७]आणि देवाकडून आमच्या पूर्वजांना जे वचन प्राप्त
झालं, आणि आमचे बारा वंश एकाग्रतेने, अहोरात्र सेवा
करून, जे गाठण्याची आशा करीत आहेत त्या वचनाच्या
आशेमुळं मी आता उभा राहिलो आहे, आणि माझा न्याय
केला जात आहे; आणि राजे, त्या आशेविषयी यहुद्यांनी
माझ्यावर आरोप केले आहेत. [८]आणि, देव मृतांना
उठवतो हे आपल्यात अविश्वसनीय का म्हटलं जावं?

[९]"मी स्वतः खरोखर मानीत होतो की, नासोरी
येशूच्या नावाविरुद्ध मी पुष्कळ गोष्टी केल्या पाहिजेत.
[१०]आणि मी ही गोष्ट यरुशलेमात कृतीतही आणली; आणि
वरिष्ठ याजकांकडून अधिकार मिळवून मी पुष्कळ पवित्र
जनांना बंदिशाळेत कोंडलं, आणि त्यांना मरणाची शिक्षा
देत असता मी त्यांच्याविरुद्ध आवाज दिला. [११]आणि, मी
प्रत्येक सभास्थानात त्यांना वारंवार शिक्षा करवून त्यांना
दुर्भाषण करायला लावायचा प्रयत्न केला; आणि
त्यांच्यावर फार चवताळून, मी बाहेरच्या नगरांपर्यंतदेखील
त्यांचा पाठलाग केला. [१२]त्यानंतर, मी वरिष्ठ याजकांकडून
अधिकार आणि आदेश मिळवून दिमिष्काकडे जात होतो,
[१३]तेव्हा राजे, मी त्या वाटेवर, दुपारच्या वेळी, एक,
सूर्याच्या तेजाहून प्रखर प्रकाश आकाशातून, माझ्या आणि

माझ्याबरोबर जाणाऱ्यांच्या सभोवताली चमकताना
बघितला. १४आणि आम्ही सगळे जमिनीवर पडलो, तेव्हा
मला माझ्याशी बोलणारा आवाज ऐकू आला; तो इब्री
भाषेत मला म्हणाला, 'शौला, शौला, तू माझा छळ का
करतोस? तुला काट्यांवर लाथ मारणं कठिण आहे.'

१५"आणि मी म्हणालो, 'प्रभू, तू कोण आहेस?'
आणि तो म्हणाला, 'तू ज्याचा छळ करतोस तो येशू मी
आहे. १६तर ऊठ, आणि आपल्या पायांवर उभा रहा.
कारण मी तुला दर्शन दिलं ते ह्यासाठी की, तू ज्याकरता
मला बघितलंस, आणि मी ज्याकरता तुला दर्शन देईन त्या
सर्व गोष्टींकरता मी तुला सेवक आणि साक्षी नेमावं. १७मी
ह्या प्रजेपासून आणि परजनांपासून तुला सोडवीन.
१८त्यांच्याकडे मी आता तुला पाठवीत आहे, ते ह्यासाठी
की, तू त्यांचे डोळे उघडावेस आणि अंधारातून
प्रकाशाकडे, आणि सैतानाच्या सत्तेतून देवाकडे तू त्यांना
वळवावंस. म्हणजे त्यांना पापांची क्षमा मिळून
मझ्यावरील विश्वासानं पवित्र झालेल्या लोकांबरोबर वाटा
मिळावा.'

१९"अहो राजे अग्रिपा, म्हणून मी त्या स्वर्गीय
दर्शनाचा अवमान करायला धजलो नाही. २०पण मी प्रथम
दिमिष्कात, यरुशलेमात आणि यहुदियाच्या सर्व प्रांतात
राहणाऱ्यांना, आणि त्यानंतर परजनांना घोषणा केली की,
त्यांनी पश्चात्ताप करून देवाकडे वळावं आणि
पश्चात्तापास शोभतील अशी कामं करावीत.

२१"ह्या कारणावरून यहुद्यांनी मला मंदिरात धरलं
आणि ते मला ठार मारायच्या प्रयत्नात होते. २२म्हणून मी,
ह्या दिवसापर्यंत, देवाचं साह्य घेऊन लहानमोठ्यांना साक्ष
देत आहे, पण ज्या गोष्टी होतील म्हणून संदेष्टे आणि मोशे
म्हणाले होते त्यांशिवाय मी दुसरं काही सांगत नाही.
२३म्हणजे ख्रिस्तानं दुःख सोसावं, मेलेल्यांतून पुन्हा
उठण्यात पहिला व्हावं, आणि ह्या प्रजेला आणि परजनांना
प्रकाश दाखवावा."

२४आणि तो हे स्वतःतर्फे बोलत असता फेस्त मोठ्या
आवाजात म्हणाला,

"पौला, तू वेडा आहेस, पुष्कळ शिक्षण तुला वेड
लावीत आहे."

२५तेव्हा पौल म्हणाला,

"फेस्त महाराज, मी वेडा नाही, पण खरेपणाच्या
आणि समंजसपणाच्या गोष्टी बोलत आहे. २६कारण राजे
ह्या गोष्टी जाणतात, आणि मी त्यांच्यापुढं धैर्यानं बोलत
आहे. कारण मी मानतो की, ह्यांपैकी कोणत्याच गोष्टी
त्यांच्यापासून लपलेल्या नाहीत; कारण ही गोष्ट एका
कोपऱ्यात केलेली नाही. २७राजे अग्रिपा, आपण
संदेष्ट्यांवर विश्वास ठेवता काय? आपण विश्वास ठेवता
हे मी जाणतो."

२८तेव्हा अग्रिपा पौलाला म्हणाला,

"मी ख्रिस्ती व्हावं म्हणून थोड्या अवधीत तू माझं
मन वळवीत आहेस."

२९तेव्हा पौल म्हणाला,

"मी देवाजवळ हे मागतो की, आपणच नाही, पण
आज जे माझं ऐकत आहेत त्या सर्वांनीच, थोड्या
अवधीत किंवा जास्त अवधीत, ह्या माझ्या बेड्यांशिवाय
मी आहे तसं व्हावं."

३०तेव्हा राजे व सुभेदार आणि बर्णिका व त्यांच्याबरोबर
जे बसले होते ते लोक उठले; ३१आणि बाहेर गेल्यावर ते
आपआपल्यात बोलताना म्हणाले,

"ह्या माणसाला मरणाची शिक्षा किंवा कैद व्हावी
असं काहीच हा करीत नाही."

३२तेव्हा अग्रिपा फेस्ताला म्हणाला,

"ह्या माणसानं कैसराकडे दाद मागितली नसती तर
ह्याला सोडता आलं असतं."

२७ आणि, जेव्हा असे ठरवण्यात आले की,
आम्ही गलबताने इटलीला जावे, तेव्हा त्यांनी
पौलाला व आणखी काही बंदिवानांना बादशाही
पलटणीतील यूलियस नावाच्या एका शतपतीच्या स्वाधीन
केले. २तेव्हा आसियाच्या किनाऱ्याने जाणार असलेल्या,
अद्रिमुत्तिमच्या, एका गलबतावर आम्ही चढलो आणि
निघालो. आणि थेसलनिकेचा अरिस्तार्ख मासेदोनियाकर
हा आमच्याबरोबर होता. ३आणि दुसऱ्या दिवशी आम्ही
सिदोनास आलो. तेव्हा यूलियस पौलाशी सहानुभूतीने
वागला व त्याने त्याला त्याच्या मित्रांकडे पाहुणचार
घ्यायला जाऊ दिले. ४आणि तेथून गलबताने निघाल्यावर
वारे उलटे असल्यामुळे आम्ही कुप्राच्या आडोशाने गेलो.
५आणि किलिकियाच्या व पंफुलियाच्या समुद्रांवरून पुढे
गेलो, आणि लुकियातल्या मूऱ्हापर्यंत आलो. ६तेथे
शतपतीला इटलीस जाणारे अलेक्झांद्रियाचे एक गलबत
मिळाले; आणि त्याने आम्हाला त्यात चढवले. ७आणि
आम्ही पुष्कळ दिवस हळू हळू जात होतो, आणि मोठ्या

प्रयासाने निदासमोर आलो; तेव्हा वारा आम्हाला पुढे जाऊ देईना, म्हणून आम्ही सलमोनासमोरून क्रेताच्या आडोशाने गेलो; [८]आणि मोठ्या प्रयासाने त्याच्या जवळून जाऊन ज्याला सुंदर बंदर म्हणतात त्या ठिकाणी आलो. तेथून लसया नगर जवळ होते.

[९]आता, पुष्कळ काळ होऊन गेल्यामुळे गलबत हाकारणे धोक्याचे होते, आणि उपोषणकाळही निघून गेला होता. म्हणून पौलाने त्यांना बोध करून [१०]म्हटले,

"गड्यांनो, मी समजतो की, हा प्रवास हालअपेष्टा आणि हानी होऊन, केवळ मालाची आणि गलबताची नाही, पण आपल्या जिवांची हानी होऊन होणार आहे."

[११]पण पौलाच्या ह्या म्हणण्यापेक्षा शतपतीने तांडेलाचे व गलबताच्या धन्याचे अधिक मानले.

[१२]आणि ते बंदर हिवाळा घालवण्यास गैरसोयीचे असल्यामुळे बहुतेकांनीही सल्ला दिला की, येथून निघून कसेही फैनिकेस जाता आल्यास तेथे हिवाळा घालवावा. हे क्रेताचे बंदर असून नैऋत्येकडे आणि वायव्येकडे त्याचे तोंड आहे. [१३]आणि दक्षिण वायू हळू हळू वाहू लागला तेव्हा आपला संकल्प साधला असे ते समजले, त्यांनी तेथून नांगर उचलले व ते क्रेताच्या जवळून जाऊ लागले.

[१४]पण लवकरच त्यांच्या उलट युरकुलोन नावाचा वादळी वारा वाहू लागला; [१५]आणि जेव्हा गलबत अडवले गेले आणि वाऱ्याला तोंड देऊ शकले नाही तेव्हा आम्ही त्याला ते चालवून नेऊ दिले. [१६]आणि क्लौदा नाव असलेल्या लहान बेटाजवळून जात असता आम्ही मोठ्या प्रयासाने होडी ओढून घेऊ शकलो; [१७]आणि त्यांनी ती वर घेतल्यावर साहित्यांचा उपयोग करून गलबत खालून आवळून घेतले. आणि आपण कदाचित् सुरतीवर आदळू अशी त्यांना भीती वाटल्यामुळे त्यांनी शीड उतरले, आणि आम्ही वाहवत गेलो. [१८]आणि आम्ही फार जोराने वादळात हेलकावू लागल्यामुळे त्यांनी दुसऱ्या दिवशी भरगत टाकणे सुरू केले. [१९]आणि त्यांनी तिसऱ्या दिवशी गलबताचे अवजार आपल्या हातांनी टाकले. [२०]आणि जेव्हा पुष्कळ दिवस सूर्य किंवा तारे दिसले नाहीत व आमच्यावर मोठे वादळ राहिले, तेव्हा आमची वाचण्याची आशा हिरावली गेली.

[२१]पण पुष्कळ उपासानंतर पौल त्यांच्यात उभा राहिला आणि म्हणाला,

"गड्यांनो, तुम्ही माझं ऐकायचं असतं. तुम्ही इतकी हालअपेष्टा आणि हानी पदरी पाडून घ्यायला क्रेताहून निघायचं नसतं. [२२]आणि, आता, मी तुम्हाला विनंती करतो की, आनंदित व्हा; कारण तुमच्यात कोणाच्या जिवाचा नाश होणार नाही, पण गलबताचा होईल. [२३]कारण मी ज्याचा आहे, आणि ज्याची सेवा करतो त्या देवाचा दूत रात्री माझ्याजवळ उभा राहिला, [२४]आणि म्हणाला, 'पौला, भिऊ नको; तुला कैसरापुढं उभं राहिलं पाहिजे; आणि बघ, तुझ्याबरोबर जे गलबतावर जिवंत आहेत ते सगळेच देवानं तुला दिले आहेत.' [२५]म्हणून गड्यांनो, आनंदित व्हा. कारण मी देवावर विश्वास ठेवतो की, मला सांगितल्याप्रमाणं होईल. [२६]तरी आपल्याला एका बेटावर पडावं लागेल."

[२७]आणि चौदावी रात्र आली तेव्हा आम्ही अद्रियाच्या समुद्रावर इकडून तिकडे लोटले जात असता, सुमारे मध्यरात्रीस खलाश्यांना वाटले की, आपण कुठल्यातरी किनाऱ्याकडे नेले जात आहो. [२८]आणि त्यांनी बुडीद टाकले तेव्हा वीस वावे भरली. मग थोडे पुढे गेल्यावर त्यांनी पुन्हा बुडीद टाकले तेव्हा पंधरा वावे भरली. [२९]तेव्हा आपण कदाचित् खडकावर आदळू अशी त्यांना भीती वाटल्यामुळे त्यांनी वरामावरून चार नांगर टाकले आणि दिवस उगवावा म्हणून प्रार्थना केली.

[३०]मग ते जणू नाळीवरून नांगर टाकीत आहेत अशा बहाण्याने खलाश्यांनी खाली समुद्रात होडी सोडली व ते गलबतावरून पळणार होते; [३१]तेव्हा पौल शतपतीला म्हणाला,

"हे गलबतावर राहिले नाहीत तर तुम्ही वाचू शकणार नाही."

[३२]तेव्हा शिपायांनी होडीचे दोर कापले आणि ती पडू दिली.

[३३]आणि दिवस वर येत असता पौलाने सर्वांना अन्न घेण्याची विनंती केली व म्हटले,

"आज चौदावा दिवस आहे; तुम्ही काही न घेता, वाट पहात उपास करीत आहा. [३४]म्हणून मी तुम्हाला विनंती करतो की, तुम्ही अन्न घ्या; हे तुमच्या आरोग्यासाठी आहे. कारण, तुमच्यातील कोणाच्या डोक्यावरून एक केसदेखील गळणार नाही."

[३५]आणि असे बोलून त्याने भाकर घेतली आणि सर्वांसमक्ष देवाचे उपकार मानून तो ती खाऊ लागला. [३६]मग ते सगळे उत्तेजित झाले आणि त्यांनी अन्न

घेतले. ३७तेव्हा गलबतावर आम्ही सगळे दोनशे शहात्तर
जीव होतो.
३८आणि ते भरपूर जेवल्यावर गलबत हलके करू
लागले व गहू समुद्रात टाकू लागले. ३९मग दिवस उगवला
तेव्हा त्यांनी ती जमीन ओळखली नाही, पण त्यांनी तेथे
किनारा असलेली एक खाडी पाहिली, आणि शक्य
झाल्यास तेथपर्यंत गलबत लोटावे असा त्यांनी विचार
केला. ४०तेव्हा त्यांनी नांगर कापले आणि समुद्रात राहू
दिले; सुकाणूच्या दोऱ्या सोडल्या, आणि वारा धरायला
पुढचे शीड चढवून ते किनाऱ्याकडे निघाले. ४१आणि जेथे
दोन समुद्र मिळतात अशा ठिकाणी ते सापडले व त्यांनी
भाटीवर गलबत नेले. तेव्हा पुढची बाजू रुतली आणि
हलणार नाही अशी राहिली. पण लाटांच्या माऱ्यामुळे
मागची बाजू फुटली.
४२तेव्हा शिपायांचा बेत झाला की, कैद्यांतून कोणी
पोहून पळू नये म्हणून त्यांना मारून टाकावे. ४३पण
पौलाला वाचवायची शतपतीची इच्छा असल्यामुळे तो
त्यांच्या योजनेस आडवा आला; आणि त्याने त्यांना
आज्ञा दिली की, ज्यांना पोहता येत असेल त्यांनी प्रथम
उडी टाकून किनाऱ्यावर जावे, ४४आणि बाकीच्यांनी,
कोणी फळ्यांवर तर कोणी गलबतातील दुसऱ्या कशावर
जावे. आणि असे झाले की, ते सगळे अशा प्रकारे
किनाऱ्यापर्यंत सुखरूप गेले.

२८ **आणि आम्ही सुखरूप** आलो तेव्हा त्या
बेटाला मिलेता नाव होते हे आम्हाला समजले.
२आणि तेथील बर्बर लोकांनी आम्हाला पुष्कळ सहानुभूती
दाखवली; कारण वरून येणाऱ्या पावसामुळे व
गारठ्यामुळे त्यांनी आगटी पेटवून आमचे प्रत्येकाचे
स्वागत केले.
३आणि जेव्हा पौलाने एक काटक्यांचा भारा जमवून
त्या विस्तवावर टाकला, तेव्हा एक नागीण त्या उष्णतेतून
बाहेर आली व त्याच्या हातावर लटकली. ४ते जनावर
त्याच्या हातावर लोंबकळत होते, हे बघून ते बर्बर लोक
एकमेकांस म्हणाले,
"हा माणूस खरोखर खुनी आहे; हा समुद्रातून वाचला
असला तरी न्याय ह्याला जगू देत नाही."
५मग त्याने त्या जनावराला अग्नीत झटकून टाकले, तेव्हा
त्याला स्वतःला काहीच इजा भासली नाही. ६तरी तो
सुजेल किंवा एकदम मेलेलाच खाली पडेल अशी ते वाट
पहात होते; पण त्यांनी पुष्कळ वाट पाहिल्यावर त्याला
काही विपरीत झाले नाही हे त्यांनी पाहिले. तेव्हा त्यांनी
आपले मत बदलून म्हटले,
"हा एक देव आहे."
७तेथे, त्या जागेच्या आसपास त्या बेटावरील प्रमुख
मनुष्याची शेती होती. त्याचे नाव पुब्लियस होते. त्याने
आमचे स्वागत केले आणि त्याने मित्रभावाने तीन दिवस
आमचा पाहुणचार केला. ८आणि असे झाले की,
पुब्लियसचा बाप तापाने व आवरक्ताने आजारी होता.
पौल त्याच्याकडे आत गेला, आणि त्याने प्रार्थना केली व
त्याच्यावर आपले हात ठेवले, आणि त्याला बरे केले.
९आणि हे झाले तेव्हा त्या बेटावर ज्यांना काही आजार
होते असे बाकीचेही आले आणि बरे झाले. १०त्यांनीही
आम्हाला पुष्कळ देणग्या देऊन आमचा मान केला. आणि
आम्ही गलबताने निघालो तेव्हा त्यांनी आम्हाला
लागणाऱ्या वस्तू चढवून दिल्या.

११**आणि तीन महिन्यांनंतर** अलेक्झांद्रियाच्या एका
गलबताने आम्ही निघालो. ते त्या बेटाशी हिवाळा
घालविण्यास राहिले होते. आणि त्याला 'दुयस्कुरै' ही
निशाणी होती. १२आणि आम्ही सुराकूसला येऊन तेथे तीन
दिवस राहिलो. १३आम्ही तेथून वळसा घेतला आणि
आम्ही रेगियोनला आलो; आणि एक दिवसानंतर दक्षिण
वायू वाहू लागला व आम्ही पुढच्या दिवशी पुन्त्युलास
आलो. १४तेथे आम्हाला बांधव भेटले आणि त्यांनी
आम्हाला त्यांच्याकडे सात दिवस राहण्याची विनंती
केली. आणि मग आम्ही रोमला आलो. १५तेथील
बांधवांनी आमच्याविषयी ऐकल्यावर ते अप्पियाच्या
पेठेपर्यंत व तीन उतारशाळांपर्यंत आमच्या भेटीस आले.
पौलाने त्यांना बघून देवाचे उपकार मानले आणि धीर
घेतला.
१६आणि आम्ही रोमला आल्यावर पौलाला
त्याच्यावर पहारा करणाऱ्या शिपायाबरोबर स्वतंत्र
राहण्याची परवानगी मिळाली. १७आणि असे झाले की,
त्याने तीन दिवसांनंतर तेथे जे यहूद्यांचे प्रमुख होते त्यांना
एकत्र बोलावले, आणि ते एकत्र आले तेव्हा तो त्यांना
म्हणाला,
"अहो बंधूंनो, मी आपल्या लोकांविरुद्ध किंवा
पूर्वजांच्या परिपाठाविरुद्ध काही केलेलं नाही, तरी

यरुशलेमात, मी बंदिवान केला जाऊन रोम्यांच्या हाती दिला गेलो. [१८]आणि त्यांनी माझी चौकशी केली तेव्हा मला जाऊ द्यावं अशी त्यांची इच्छा होती. कारण माझ्या बाबतीत मरणाच्या शिक्षेला काही कारण नव्हतं. [१९]पण जेव्हा यहुदी माझ्याविरुद्ध बोलले तेव्हा मला कैसराकडे दाद मागणं भाग पडलं; पण माझ्या राष्ट्रावर आरोप करायला माझ्याजवळ काही होतं म्हणून नाही. [२०]म्हणून, ह्या कारणावरून, मी तुम्हाला भेटायला आणि तुमच्याशी बोलायला माझ्याकडे बोलावलं आहे. कारण इस्राएलाच्या आशेमुळं मी ह्या साखळीनं बांधलेला आहे."

[२१]तेव्हा ते त्याला म्हणाले,

"आम्हाला यहुदियाहून आपल्याविषयी काही पत्रं मिळालेली नाहीत, किंवा आलेल्या बंधूंपैकी कोणी काही सांगितलं नाही किंवा कोणी वाईट बोलला नाही. [२२]पण तुम्ही जे मानता ते तुमच्याकडून ऐकायची आमची इच्छा आहे, कारण ह्या पंथाविषयी आम्हाला माहीत आहे की, सर्वत्र ह्याविरुद्ध बोलण्यात येतं."

[२३]आणि त्यांनी त्याच्यासाठी एक दिवस नेमला तेव्हा पुष्कळ जण त्याच्याकडे घरी आले; आणि त्यानं देवाच्या राज्याविषयी निक्षून साक्ष देत आणि मोशेच्या नियमशास्त्रावरून व संदेष्ट्यांवरून येशूविषयी त्यांची खातरी पटवीत, त्यांना सकाळपासून संध्याकाळपर्यंत उलगडा केला. [२४]आणि ज्या गोष्टी सांगण्यात आल्या त्या काहींनी मानल्या व काहींनी त्यांवर विश्वास ठेवला नाही.

[२५]आणि त्यांचे आपसात एकमत न होऊन ते जात असता पौलाने त्यांना एक वचन सांगितले,

"यशया संदेष्ट्याच्या द्वारे, पवित्र आत्मा तुमच्या पूर्वजांना बरोबर बोलला. [२६]तो म्हणतो की,

'ह्या लोकांकडे जाऊन सांग.
तुम्ही ऐकून ऐकाल,
आणि विचार करणार नाही.
तुम्ही पाहून पहाल,
आणि ओळखणार नाही.
[२७]कारण ह्या लोकांचे मन जड झाले आहे;
कान ऐकण्यात मंद आहेत,
त्यांनी आपले डोळे मिटलेत;
म्हणजे त्यांनी डोळ्यांनी बघू नये,
कानांनी ऐकू नये,
त्यांनी मनाने विचार करू नये,
आणि वळू नये,
आणि मी त्यांना बरे करू नये.'

[२८]म्हणून तुम्हाला हे विदित होवो की, देवाचं तारण परजनांकडे पाठवलं आहे; आणि ते त्याविषयी ऐकतील."

[२९-३०]आणि तो पुरी दोन वर्षे आपल्या भाड्याच्या घरात राहिला; आणि त्याच्याकडे जे तेथे येत त्या सर्वांचे स्वागत करून [३१]तो त्यांना पूर्ण धैर्याने देवाच्या राज्याची घोषणा करी, आणि प्रभू येशू ख्रिस्ताविषयीच्या गोष्टी शिकवी. त्याला मना करणारा कोणी नव्हता.